
सोलापूर तरुण भारत
आसमंत

# 'वसुधैव कुटुम्बकम्'चा विश्वमंचावर हुंकार




**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी न्यूयॉर्कमध्ये दिलेल्या 'विविधतेतील एकता' या संदेशाने पुन्हा एकदा भारताचे जागतिक तत्त्वज्ञान अधोरेखित केले. हिंदुत्व ही सर्वसमावेशक जीवनपद्धती असून, 'वसुधैव कुटुम्बक' हा विचारच आजच्या संघर्षमय जगाला मानवतेचा आणि विश्वशांतीचा खरा मार्ग दाखवू शकतो, हाच या वैश्विक संबोधनाचा अन्वयार्थ...**

लक्ष्यवेध
**प्रतिनिधी**

अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात नुकतेच झालेले वैचारिक मंथन, संपूर्ण जगाला भारताच्या सनातन परंपरेची आणि व्यापक दृष्टिकोनाची नव्याने ओळख करून देणारे ठरले. निमित्त होते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' या भव्य कार्यक्रमात केलेले मार्गदर्शन. १८९३ साली स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेतील शिकागो येथे सर्वधर्म परिषदेत विश्वबंधुत्वाचा जो ऐतिहासिक संदेश दिला होता, नेमया त्याच विचारांची आणि मूल्यांची आधुनिक काळातील प्रगल्भ मांडणी सरसंघचालकांनी केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष साजरे करत आहे. या ऐतिहासिक टप्प्यावर, एका अत्यंत शक्तिशाली आणि शिस्तबद्ध संघटनेच्या प्रमुखाकडून जगाला मानवतेचा, एकात्मतेचा आणि विश्वशांतीचा उदात्त संदेश मिळणे, हे संपूर्ण जगासाठीच अत्यंत आशादायी. या मंचावरून ३० देशांतील १८० धर्मनेत्यांनी जाहीर केलेला पंचसूत्री कृती आराखडा आणि एकमेकांना राखी बांधून संरक्षणाचा केलेला संकल्प, खर्‍या अर्थाने जागतिक बंधुभावाचा अप्रतिम अविष्कार होता.

पाश्चिमात्य देश अमेरिकेचा उल्लेख करतात, तेव्हा तेथील बहुविधता समोर येते. तथापि, भारताच्या बाबतीत 'विविधतेतील एकता' हेच सर्वांत मोठे वैशिष्ट्य ठरते. एकता आणि विविधता या दोन्ही गोष्टी भारताच्या 'डीएनए'मध्येच आहेत, हे सरसंघचालकांचे प्रतिपादन भारताचे व्यापक चित्र जागतिक मंचावर सादर करणारे ठरले. शरीर, भाषा, संस्कृती, वेशभूषा आणि जीवनपद्धती वेगवेगळ्या असल्या, तरी प्रत्येकाच्या अंतःकरणात एकच चैतन्य आहे. विविधता हे एकतेचे खरे वैभव. त्यामुळे आपण या विविधतेचा उत्सव साजरा केला पाहिजे. जगातील अनेक संस्कृतींनी तुम्ही आमचे ऐका, तरच आम्ही तुम्हाला जगू देऊ, अशी राक्षसी प्रवृत्ती जोपासली. तथापि, भारताने 'जगा आणि जगू द्या' हाच विचार अंगीकारला. हेच खरे 'वसुधैव कुटुम्बकम्'. याच मंचावरून सरसंघचालकांनी हिंदुत्वाबाबत अत्यंत स्पष्ट विचार मांडून, अनेक गैरसमजांनाही पूर्णविराम दिला.

भारतात एकही मुस्लीम असू नये, असा विचार कुणी हिंदू करत असेल, तर तो हिंदू नाही, हे त्यांचे विधान, हिंदुत्वाची ओळख सांगणारेच. हिंदुत्व ही एक अत्यंत प्रगल्भ आणि सर्वसमावेशक जीवनपद्धती आहे. उपासनेचे मार्ग वेगवेगळे असू शकतात. मात्र, या सर्व मार्गांचे अंतिम सत्य एकच आहे, हाच हिंदू धर्माचा गाभा. विविधता स्वीकारूनही एकतेची भावना कायम ठेवणे, हीच भारतीय परंपरेची विशेषता आहे. संवाद आणि निस्वार्थ सेवाकार्य हातात हात घालून चालले पाहिजेत, यावर त्यांनी दिलेला भर महत्त्वाचाच. संघाच्या विचारधारेबाबत जे खोटे 'नॅरेटिव्ह' जाणीवपूर्वक पसरवले गेले, त्याला दिलेले हे सडेतोड उत्तर ठरावे. याच विचारमंथनातून त्यांनी धर्म आणि आधुनिक राजकारणावरही, अत्यंत मार्मिक भाष्य केले. आज धर्माची व्याख्या काही कर्मकांडांपुरतीच मर्यादित ठेवली जाते; परंतु धर्माचा खरा उद्देश सत्यापर्यंत पोहोचणे हाच आहे. जो मार्ग समाजाला जोडतो, संतुलन राखतो आणि मध्यममार्गाचा पुरस्कार करतो, तोच खरा धर्म. तसेच, आधुनिक राजकारणात मी आणि माझे या स्वार्थी भावनेपेक्षा, आपण आणि आपले ही व्यापक भावना रुजवण्याची नितांत गरज आहे. राजकीय नेतृत्वाने समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी कार्य केले पाहिजे, हा त्यांनी दिलेला मंत्रही दिशादर्शक आहे. अमेरिकेत आणि जगभरातील भारतीयांनाही त्यांनी, मोलाचा संदेश दिला. माणसाने जन्मभूमीची मूल्ये कधीही विसरू नयेत, पण ज्या देशात आपण राहतो त्या कर्मभूमीप्रतिही पूर्ण निष्ठा राखणे, हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे, हा संदेश, भारतीयांची जागतिक स्तरावरील प्रगल्भता दर्शवणारा आहे. यासोबतच, समाजाप्रति आणि पर्यावरणाप्रति असणारी कृतज्ञताही त्यांनी अधोरेखित केली. आपण जगाकडून जे काही घेतले आहे, ते जगाला परत देणे, हेच आपले कर्तव्य आहे. शेतकरी, कामगार यांच्या परिश्रमावर आपले जीवन उभे असते, याचे भान ठेवले पाहिजे. मानव जन्माचा उद्देश मानवतेच्या कल्याणासाठी आहे, हा विचारही त्यांनी मांडला.

भारतीय तत्त्वज्ञान जगाला जोडण्याची आणि मानवतेची भाषा करताना, दुसरीकडे याच कार्यक्रमाबाहेर खलिस्तान समर्थक कट्टरपंथीयांनी जो गोंधळ घातला, तो त्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचा पुरावा आहे. हे लोक पाकिस्तान आणि चीनसारख्या भारतविरोधी शक्तींच्या हातातील बाहुले आहेत. हिंदू आणि शीख समाजात दुही माजवण्याचा त्यांचा हा कुटिल डाव, अमेरिकेतील जागरूक भारतीयांनी हाणून पाडला. शत्रूच्या नाशापेक्षा त्याची शत्रुबुद्धी दूर व्हावी, हीच भारतीय संतांची शिकवण आहे.

सध्याचे जग हे युद्ध, संघर्ष, दहशतवाद आणि आर्थिक अस्थिरतेच्या उंबरठ्यावर उभे आहे. रशिया- युक्रेन, इस्रायल- 'हमास' यांच्यातील रक्तरंजित संघर्षामुळे, जागतिक शांतता धोयात आहे. अशा या संघर्षाच्या काळात संत ज्ञानेश्वरांनी मागितलेले पसायदानच जगाला तारू शकते. 'भूतां परस्परें पडो, मैत्र जीवांचें या माध्यमातूनच, दुरितांचे तिमिर जावों', हे उद्दिष्ट साध्य होणार आहे. सरसंघचालकांनी अमेरिकेच्या भूमीवरून दिलेला हा संदेश खर्‍या अर्थाने, या पसायदानाचेच प्रकटीकरण आहे. भारताच्या या संदेशाच्या आचरणातच खर्‍या अर्थाने मानवतेचे वैश्विक कल्याण सामावलेले आहे.

# मध्य आशियाच्या हृदयात मोदी



**संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'डीआरडीओ'द्वारे विकसित सर्व पारंपरिक क्षेपणास्त्र प्रणालींचे तंत्रज्ञान देशांतर्गत उत्पादनासाठी भारतीय खासगी उद्योगांना हस्तांतरित करण्यास नुकतीच मंजुरी दिली. हा निर्णय 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला बळ देणारा असून, यामुळे सैन्यदलाची ताकद वाढण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील निर्यातीलाही चालना मिळणार आहे.**

लक्ष्यवेध
**अनय जोगळेकर**

आज भारतासाठी उझबेकिस्तान मध्य आशियाचे प्रवेशद्वार बनले आहे. दोन्ही देशांतील व्यापार १ अब्ज डॉलरच्या वरती गेला असून, २०३० पर्यंत तो ५ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राष्ट्रपती शौकत मिर्झियोयेव २०१६ पासून सत्तेत असून, त्यापूर्वी ते पंतप्रधान होते. नरेंद्र मोदींचे त्यांच्याशी अत्यंत घनिष्ठ संबंध असून, दोघांची आतापर्यंत अनेकवेळा भेट झाली आहे. हे भारत आणि उझबेकिस्तानमधील राजनयिक संबंधांचे ३५वे वर्ष असून, मोदींच्या भेटीदरम्यान त्यांचा स्तर उंचावून त्यांना बृहत् सामरिक भागीदारीचा दर्जा देण्यात आला. भारत आणि उझबेकिस्तानात युरेनियम पुरवठ्याबाबत, तसेच खाणकाम क्षेत्रातील सहकार्याबाबत करार करण्यात आला. भारताची 'यूपीआय' आणि उझबेकिस्तानची 'हुमो' या पैसे पाठवण्याच्या यंत्रणांमध्ये सहकार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. उझबेकिस्तान राजधानी ताश्कंदजवळ एक नवीन शहर वसवत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अध्यक्ष मिर्झायेव यांना एक शिष्टमंडळ गुजरातमधील 'गिफ्ट सिटी'मध्ये पाठवण्याची विनंती केली.

दोन्ही देशांमध्ये बुद्धकाळापासून किंबहुना, त्यापूर्वीपासून सांस्कृतिक देवाणघेवाण होत आहे. भारतावर स्वारी करून प्रचंड उत्पात माजवणारा तैमूर लंग हा उझबेकिस्तानचा राष्ट्रीय नायक असून, त्याला तिथे 'अमिर तिमूर' असे म्हटले जाते. अयोध्येच्या श्रीराम मंदिरासह अनेक मंदिरांचा विध्वंस करणारा बाबरही मूळचा समरकंदचा होता. पण, त्याने उझबेकिस्तान सोडून भारतात राज्य स्थापन केल्यामुळे तिथे त्याला फारसा मान नाही. कालांतराने या भागावर इराणची आणि त्यानंतर झारच्या रशियाची सत्ता आली. रशियामध्ये 'लाल क्रांती' झाल्यावर मध्य आशियाई देशांचे स्वातंत्र्य घोषित करण्यात आले असले, तरी जोसेफ स्टॅलिनच्या काळात हा भाग पुन्हा एकदा रशियाला जोडला जाऊन सोव्हिएत महासंघाचा भाग झाला. याकाळात उझबेकिस्तानवरील धार्मिक ओळख पूर्णपणे पुसून टाकण्यात आली. खूप मोठ्या संख्येने रशियन लोकांना ताश्कंद आणि अन्य महत्त्वाच्या शहरांमध्ये वसवण्यात आले. नाझी जर्मनीच्या आक्रमणाच्या काळात सोव्हिएत महासंघाने आपले कारखाने देशाच्या पश्चिम भागातून पूर्व भागात स्थलांतरित केले. दुसर्‍या महायुद्धा उझबेक लोकांनी मोठ्या संख्येने प्राणांची आहुती दिली. नरेंद्र मोदींनी ताश्कंदमधील युद्ध स्मारकासही भेट दिली.

उझबेकिस्तान महाराष्ट्र आणि छत्तीसगढ एकत्रित केल्यावर होतो, साधारण तेवढ्या आकाराचा. देशाची लोकसंख्या अवघी पावणेचार कोटी. हा जगातील असा देश आहे, ज्याला समुद्रकिनारा नाही, तसेच याच्या एकाही शेजारी देशास समुद्रकिनारा नाही. मध्य आशियातील सर्व देशांशी उझबेकिस्तानची सीमा आहे. पहिल्या ते तिसर्‍या शतकादरम्यान हा प्रदेश बौद्ध धर्मीय कुशाण साम्राज्याचा भाग होता. मोदींच्या दौर्‍यामध्ये या बौद्ध वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासंबंधी भारत आणि उझबेकिस्तानमध्ये करार करण्यात आला. पुढे या भागावर पर्शियन आणि श्वेतवर्णीय हूण लोकांनी राज्य केले. सहाव्या शतकाच्या अखेरीस हा भाग तुर्कीक वंशीय लोकांच्या प्रभावाखाली आला. आठव्या शतकात अरबांनी या भागावर राज्य करताना तिथे इस्लामचा प्रसार केला. त्यानंतर हा प्रदेश पुन्हा पर्शियन आणि तुर्कीक लोकांच्या प्रभावाखाली आला. १३व्या शतकात मंगोलियातून चाल करून आलेल्या चंगेझ खानाने बुखारा आणि समरकंद यांसह सर्व महत्त्वाची शहरे उद्ध्वस्त केली. १३७० साली तैमूर लंगने आपले विशाल साम्राज्य उभारताना समरकंद येथे आपली राजधानी स्थापन केली.

भारतात आणि आशियात अनेक ठिकाणी 'क्रूरकर्मा' म्हणून ओळखला जाणारा तैमूर उझबेकिस्तानमध्ये 'राष्ट्रीय नायक' म्हणून ओळखला जातो. तैमूरच्या सहाव्या पिढीतील झहिरुद्दिन महम्मद बाबरने भारतावर आक्रमण करून मुघल साम्राज्याची स्थापना केली. बाबर उझबेकिस्तानचा असला, तरी तेथील लोकांना त्याच्याबद्दल आत्मीयता नाही. त्यानंतर १७व्या शतकात हा प्रदेश उझबेक टोळ्यांच्या आणि कालांतराने १९व्या शतकात झारच्या रशियाच्या साम्राज्याचा भाग झाला. 'लाल क्रांती'नंतर सोव्हिएत रशियामध्ये त्याची वेगळी ओळख होती. १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर उझबेकिस्तानला स्वातंत्र्य मिळाले. तुर्कीक लोकसंख्या, पर्शियन संस्कृती आणि साम्यवादी रशियाचे सुमारे सात दशके राज्य, यामुळे उझबेकिस्तानची एक वेगळी ओळख तयार झाली आहे. हा देश 'सुन्नी' मुस्लीमबहुल असला, तरी तो तितकाच आधुनिक आणि उदारमतवादी आहे. १९६६ सालच्या भूकंपानंतर राजधानी ताश्कंद नव्याने बांधली असल्यामुळे तिच्यावर सोव्हिएत रशियाच्या स्थापत्यशैलीचा प्रभाव जाणवतो. भारत आणि रशियाच्या मैत्रीपूर्ण संबंधांमुळे या भागात हिंदी चित्रपट आणि संगीत लोकप्रिय आहे. देशाची भाषा 'उझबेक' असली, तरी व्यवसाय-उद्योगासाठी रशियन भाषेचाही मोठ्या प्रमाणावर वापर होतो. सध्या या भाषात इंग्रजीबद्दल विशेष आकर्षण असून, ठिकठिकाणी इंग्रजी शिक्षणाच्या जाहिरातीही दिसतात.

उझबेकिस्तानमध्ये चीन आणि तुर्कीये आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. उझबेकिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वायू आणि खनिजसंपत्ती आहे. देशाचा पश्चिमेकडील भाग वाळवंटी असला, तरी अमु दर्या आणि सिर दर्या या नद्यांवरील सिंचन प्रकल्पांमुळे कृषी क्षेत्राचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. चीनसाठी हा भाग 'बेल्ट-रोड' प्रकल्पाचा भाग असल्याने त्यांनी पायाभूत सेवा विकास प्रकल्पांत मोठी गुंतवणूक केली आहे. अनेक भारतीय कंपन्याही उझबेकिस्तानात पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात काम करत आहेत. उझबेकिस्तानवर विविध संस्कृतींचा प्रभाव असल्यामुळे आणि साम्यवादी राजवटीतील सुमारे सात दशके अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच असल्यामुळे आपल्या ओळखीबद्दल तेथील लोकांच्यात संभ्रम जाणवतो. वयाची पन्नाशी गाठलेल्या उझबेक लोकांना मद्य पिण्यास किंवा कोणतेही भोजन करण्यास हरकत नसते. वेशभूषेच्या बाबतीतही ते मोकळेढाकळे असतात. पण, तरुण मुली अनेकदा डोयाला तुर्कीश पद्धतीची चादर लपेटतात. तरुण दाढी राखतात. 'हलाल' पद्धतीच्या जेवणाबद्दल आग्रही असतात. असे असले तरी अजूनही उझबेकिस्तानमध्ये फरगणा खोर्‍याचा अपवाद वगळता, इस्लामिक मूल तत्त्ववादाचा प्रभाव नाही. भारतासाठी या स्पर्धेत टिकून राहणे महत्त्वाचे आहे. उझबेकिस्तान हा ऑस्ट्रेलियाच्या खालोखाल पाचवा सर्वांत मोठा युरेनियम उत्पादक देश आहे. मोदींच्या ऑस्ट्रेलिया दौर्‍यादरम्यान भारताने ऑस्ट्रेलियाशीही युरेनियम पुरवठ्याबाबत करार केला होता.



'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' क्षेत्रामुळे 'सिलिकॉन चिप्स' उत्पादन आणि 'डेटा सेंटर'सारख्या क्षेत्रांना चालना मिळाली आहे. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे हायड्रोकार्बनला सशक्त पर्याय शोधणे आवश्यक आहे. भारत सौरऊर्जेच्या बाबतीत भरीव कामगिरी करत असला, तरी शाश्वत ऊर्जेसाठी अणुऊर्जेला पर्याय नाही. छोट्या 'मॉड्युलर रिअॅटर'मुळे मोठ्या अणुऊर्जा प्रकल्पांबाबत असलेला धोका मोठ्या प्रमाणावर कमी करता येतो. नरेंद्र मोदींच्या उझबेकिस्तान दौर्‍यामुळे भारताने मध्य आशियाच्या राजकारणात आणि अर्थकारणात आपल्यालाही स्वारस्य असल्याचे दाखवून दिले आहे.

# भारताविरुद्धचे हायब्रीड युद्ध आणि सत्तापालटाच्या प्रयत्नांचा प्रतिकार

राष्ट्ररक्षा

हेमंत महाजन

**भारताचा विकासरथ जसा वेगाने पुढे सरकत आहे, तसे भारताच्या शत्रूंच्या कारस्थानांमध्येही वाढ होत आहे. सध्या युद्धाचे स्वरूप बदलले असून, प्रत्यक्ष युद्धापेक्षा सत्तापालट करण्यास महत्त्व दिले जाते. यासाठी विविध माध्यमांचा वापर होतो. ती माध्यमे आणि त्याचा प्रतिकार करण्यासाठीच्या उपाययोजनांचा आढावा घेणारा हा लेख...**

स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'विकसित भारता'साठीचा सप्तधारा मंत्र देत, देशाच्या प्रगतीचा नवा रोडमॅप मांडला. उत्पादन क्षेत्रापासून 'सॉफ्ट पॉवर'पर्यंतच्या विकासाची ग्वाही देताना, 'दिमागी नक्षल्यां'वरही त्यांनी प्रहार केला. राज्याची प्रमुख अंगे लक्ष्य करण्याची रणनीती: 'हायब्रीड' युद्धातील एक गंभीर टप्पा म्हणजे, राष्ट्रीय सुरक्षाव्यवस्थेची विश्वासार्हता खिळखिळी करणे. यात पोलीस, सशस्त्र दले आणि गुप्तचर यंत्रणांविषयी जनतेच्या मनात संशय, अविश्वास आणि तिरस्कार निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. सैन्यप्रमुखांवर वैयक्तिक किंवा राजकीय स्वरूपाचे शाब्दिक हल्ले केले जातात. एखाद्या घटनेचा आधार घेऊन संपूर्ण दलाला क्रूर, पक्षपाती किंवा जातीयवादी ठरवण्याचे प्रयत्न होतात. गणवेश, पद आणि संस्थात्मक शिस्त यांच्याविषयीचा आदर कमी करण्यासाठी समाजमाध्यमे, निवडक वृत्तांकन आणि प्रचार मोहिमांचा वापर होतो.

**यासाठी पुढील तंत्रांचा वापर केला जातो:** गणवेश, पद आणि कमांडचा अवमान निर्माण करणाऱ्या मोहिमा राबवणे. सुरक्षा यंत्रणेत अंतर्गत फूट पडली असून, ती राजकीय दबावाखाली काम करत आहे किंवा बंडखोरीच्या शक्यतेच्या अफवा पसरवणे. कायदा व सुव्यवस्थेच्या कारवाईला जनतेचा शत्रू म्हणून उभे करणे. रस्त्यावरचा रोष सरकारसाठी आव्हानात्मक असतो; परंतु सुरक्षा यंत्रणा तटस्थ, निष्क्रिय किंवा संभ्रमित झाली; तर राज्याची प्रतिकार क्षमताच मोठ्या प्रमाणात कमी होते. त्यामुळे बाह्य प्रभावक्षेत्रे किंवा शत्रू सैन्याधिकारी, गुप्तचर प्रमुख आणि पोलीस नेतृत्वावर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करतात.

**पर्यायाची उभारणी :** लवचीक आघाड्या आणि तात्पुरत्या व्यवस्था जन्माला घालणे सहज होते. जेव्हा विद्यमान राजवटीला सतत बेकायदेशीर, अकार्यक्षम किंवा अस्थिर म्हणून चित्रित करण्यात यश येते, तेव्हा पर्यायी राजकीय व्यवस्था पुढे आणली जाते. ती अनेकदा विचारधारात्मकदृष्ट्या परस्परविरोधी गटांचीच आघाडी असते. परंतु, त्या आघाडीला एकत्र बांधणारा प्रमुख धागा म्हणजे विद्यमान नेतृत्वाचा विरोध. अशा व्यवस्थेला तात्पुरते सरकार, राष्ट्रीय एकात्मता सरकार किंवा लोकशाही पुनर्स्थापनेची व्यवस्था अशा आकर्षक संज्ञांनी सादर केले जाते. तथापि, तिची वैधता, कार्यक्रम, जनाधार आणि बाह्य प्रभावांपासूनची स्वायत्तता यांची काटेकोर तपासणीही आवश्यक ठरते. 'डीप स्टेट' अर्थात, परदेशी गुप्तचर, मुत्सद्दी, तंत्रज्ञान कंपन्या, वित्तीय संस्था आणि आंतरराष्ट्रीय प्रभावजाळे यांचे हितसंबंध असलेलेही, सरकारी धोरणांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करतात. सत्तांतरानंतर संरक्षण करार, आर्थिक सवलती, परराष्ट्र धोरणात वेगाने बदल होतात. म्हणूनच, सत्तापालट हा शत्रू देशांना फायदा मिळवून देणारा ठरतो. भारतासारख्या शक्तीसाठी धोरणात्मक स्वायत्तता, राष्ट्रीय हितांवर आधारित परराष्ट्र धोरण आणि स्थैर्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे दुष्प्रचार, अवैध आर्थिक प्रभाव आणि डिजिटल हस्तक्षेपांविषयी सजग राहणे आवश्यक आहे.



**भारताने 'हायब्रीड' युद्धाचा प्रतिकार कसा करावा :** भारताने 'नॅरेटिव्ह' युद्ध, 'हायब्रीड' युद्ध, दुष्प्रचार, सायबरहल्ले आणि हिंसक अराजक निर्माण करण्याच्या प्रयत्नांना तोंड देण्यासाठी सर्वंकष राष्ट्रीय रणनीती स्वीकारणे आवश्यक आहे. यात धोरण, कायदा, तंत्रज्ञान, गुप्तचर समन्वय, जनजागृती आणि संस्थात्मक विश्वासार्हता यांचा समतोल असला पाहिजे. भारताची सायबर सुरक्षा क्षमता बळकट करण्यासाठी 'सर्ट' सतत सायबर धोक्याचे इशारे देते. तसेच भारतातील सायबर घटनांमध्ये २०२२ नंतर मोठीच वाढ झाली.

**१. 'नॅरेटिव्ह'अन् 'हायब्रीड युद्ध :** भारताला माहिती, 'नॅरेटिव्ह' आणि 'हायब्रीड' युद्धासंदर्भात स्पष्ट राष्ट्रीय नीतीची गरज आहे. यामध्ये धोके, जबाबदाऱ्या, संस्थात्मक भूमिका, निर्णय प्रक्रिया आणि प्रतिसादाची मर्यादा निश्चित करणेही आवश्यक आहे. यात पुढील बाबी असाव्यात. वैचारिक स्वायत्ततेला राष्ट्रीय सुरक्षेचे उद्दिष्ट मानणे; म्हणजे नागरिकांना तथ्याधिष्ठित माहितीच्या आधारावर स्वतंत्र निर्णय घेता येणे. मुत्सद्देगिरी, अर्थकारण, माहिती, संस्कृती, समाजव्यवस्था आणि लष्कर एकात्मिक चौकटीत जोडणे. परकीय दुष्प्रभाव रोखताना माहितीचा दुरुपयोग होणार नाही, यासाठीही मर्यादा घालणे. राष्ट्रीय स्तरावर माहिती सुरक्षा समन्वय यंत्रणा, सशस्त्र दलांची माहिती युद्ध क्षमता आणि विविध मंत्रालयांत समन्वय 'प्रोटोकॉल'चा विकास करणे.

**२. कायदेशीर आणि धोरणात्मक उपाय:** कट्टरतावाद, परकीय हस्तक्षेप, डिजिटल दुष्प्रचार आणि अवैध निधीला प्रतिबंध घालण्यासाठी सक्षम कायदेशीर चौकटीची गरज आहे. भारताने यासाठी पुढील उपायांचा विचार करावा. दहशतवादविरोध, सायबर सुरक्षा, डेटा सुरक्षा, निवडणुकीतील पारदर्शकता आणि परकीय प्रभावाशी संबंधित कायद्यांमध्ये सुसंगती निर्माण करणे. 'डीपफेक', कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रचार, बॉट, बनावट ओळखी आणि दुष्प्रचारांना हाताळण्यासाठी क्षमता विकास करणे. स्वयंसेवी संस्था, माध्यमे आणि काही वकिली गटांना मिळणार्या परकीय निधीबाबत पारदर्शकतेचे नियम सुनिश्चित करणे. 'एफसीआरए' ही भारतातील परकीय निधीचा वापर नियंत्रित करणारी प्रमुख चौकट असून, तिचे प्रशासन गृह मंत्रालयाकडे आहे.

**३. सायबर अवकाश आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचे संरक्षण:** 'हायब्रीड' युद्धात वीज, दूरसंचार, बँकिंग, वाहतूक, संरक्षण नेटवर्क आणि डिजिटल सेवा लक्ष्य ठरतात. त्यामुळे सायबर सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेची अपरिहार्य बाब आहे. भारताने उपाययोजना करताना पुढील बाबींचा विचार करावा. संरक्षण, गृह, वित्त, ऊर्जा आणि दूरसंचार क्षेत्रांत रिअल-टाईम माहितीची देवाण घेवाण. रॅन्समवेअर, डेटाचोरी, पुरवठा साखळीवरील हल्ले आणि सायबर आक्रमणांसाठी नियमित सराव. स्वदेशी सायबर साधने, सुरक्षित तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे निर्माण धोका ओळखणारी प्रणाली आणि प्रशिक्षित मनुष्यबळनिर्मितीसाठी दीर्घकालीन गुंतवणूक. खासगी कंपन्या, संशोधन संस्था आणि शासकीय यंत्रणांच्या संयुक्त सरावांद्वारे कमकुवत दुवे शोधणेही आवश्यक आहे.

**४. माध्यम साक्षरता आणि वैचारिक संरक्षण:** 'नॅरेटिव्ह' युद्धाचे लक्ष्य नागरिकांचे मन असते. त्यामुळे माध्यम साक्षरता, तथ्य पडताळणी आणि भावनिक सजगता राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे घटक ठरतात. यासाठी पुढील पावले उचलणे आवश्यक आहे. शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांत माध्यम साक्षरता अभ्यासक्रमाचा समावेश करणे. नागरिकांना 'डीपफेक', दिशाभूल करणारे शीर्षक, बनावट खाते, खोटे व्हिडिओ ओळखण्याचे प्रशिक्षण देणे. जबाबदार पत्रकारिता, स्वतंत्र तथ्य पडताळणी आणि सार्वजनिक माहितीची वेळेवर उपलब्धता करून देणे. तसेच दूरदर्शन, रेडिओ, स्थानिक भाषा माध्यमे आणि डिजिटल मंचांद्वारे व्यापक जनजागृती मोहिमा राबवणे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०'मध्ये माध्यम साक्षरतेला महत्त्व देण्यात आले आहे. 'एनसीआरटी'नेही यावर प्रशिक्षण उपक्रमांचे आयोजन केले आहे.

**५. धोरणात्मक संदेशवहन आणि राष्ट्रीय 'नॅरेटिव्ह':** 'नॅरेटिव्ह' युद्ध जिंकण्यासाठी केवळ खोट्या प्रचाराला प्रतिक्रिया देणे पुरेसे नसून, स्वतःची क्षमता, सांस्कृतिक सामर्थ्य, वैज्ञानिक प्रगती आणि राष्ट्रीय सुरक्षिततेची भूमिका स्पष्ट आणि तथ्याधिष्ठित रीतीने मांडली पाहिजे. भारताचे मत आंतरराष्ट्रीय पातळीवर मांडणाऱ्या वाहिन्यांमध्ये वाढ झाली पाहिजे. परराष्ट्र मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय आणि माहिती यंत्रणांच्या संदेशवहनाला मुत्सद्देगिरी, साहित्य, चित्रपट, डिजिटल माध्यमे आणि भारतीय भाषांशी जोडणे. दहशतवादविरोधी कारवाया, आपत्ती निवारण, मानवतावादी मदत, तांत्रिक प्रगती आणि विकासकार्यांचा संयमी आणि विश्वासार्ह प्रचार करणे.

**६. गुप्तचर माहितीवर काम करणे आणि हिंसक अराजकाला प्रतिबंध घालणे :** शांततापूर्ण निदर्शने हा लोकशाहीचा वैध भाग. मात्र, नियोजित हिंसा, डिजिटल चिथावणी, अफवा आणि परकीय निधीच्या गैरवापरातून अराजकता पसरवण्याचे प्रयत्न वेगळ्या स्वरूपाचे असतात. यातील भेद स्पष्टपणे ओळखणे अत्यावश्यक आहे. यासाठी पुढील पावले उचलणे आवश्यक आहे. विविध माहितीस्रोतांमध्ये कायद्याच्या आधारे समन्वय निर्माण करणे. हिंसक जमावबंदी, खोट्या डिजिटल मोहिमा, परकीय निधीवर अंकुश ठेवणे आणि संशयास्पद माहितीचे त्वरित निदान करणे. पोलीस व निमलष्करी दलांना गर्दीचे मानसशास्त्र, संवादकौशल्य, प्रमाणात बलप्रयोग आणि पुराव्याधारित हस्तक्षेपाचे प्रशिक्षण देणे. निदर्शनांच्या काळात 'बॉडी- कॅम', त्वरित निवेदन आणि पारदर्शक चौकशीचा वापर करून अफवांची शक्यता कमी करणे.

**७. आंतरराष्ट्रीय भागीदारी आणि नियम:** सायबरहल्ले, 'बॉट नेटवर्क', 'डीपफेक' यांना सीमा नसतात. त्यामुळे भारताने विश्वासू भागीदारांबरोबर डिजिटल मंचांवरील पारदर्शकतेसाठी, आंतरराष्ट्रीय नियम विकसित करण्यात सक्रिय योगदान द्यावे.यासाठी पुढील पावले उचलणे आवश्यक आहे.

सायबर धोके, दुष्प्रचार आणि 'बॉट नेटवर्क' यांबाबत वेळेवर माहितीची देवाणघेवाण. सामाजिक माध्यम मंचांकडून राजकीय जाहिराती, कृत्रिमरीत्या प्रसार आणि राज्यपुरस्कृत प्रचाराबाबत अधिक पारदर्शकतेची मागणी. परकीय हस्तक्षेपाचे मुत्सद्दी सादरीकरण आणि कारवाई. (पान ६ वर)

---

पोरकी पोरं

डॉ. तुषार सावरकर

# सहभागाचा हक्क : मुलांचं मत कुठे ऐकलं जातं?

**घरात एखादा मोठा निर्णय घेतला जातो. नवीन शहरात स्थलांतर करायचं, शाळा बदलायची, घर घ्यायचं, आई- वडिलांनी वेगळं राहायचं की नाही किंवा मुलाला निवासी शाळेत पाठवायचं या सगळ्या निर्णयांचा परिणाम ज्याच्यावर होणार असतो, त्या मुलालाच अनेकदा विचारलं जात नाही. त्याच्याकडून अपेक्षा असते ती केवळ निर्णय स्वीकारण्याची. 'तू अजून लहान आहेस', 'तुला काय समजतं?', 'मोठ्यांनी घेतलेला निर्णय तुझ्या भल्यासाठीच आहे' ही वाक्यं अनेक मुलांच्या आयुष्याचा भाग बनतात. प्रश्न असा आहे की, मुलांना खरंच काही समजत नाही की आपण त्यांचं म्हणणं ऐकण्याची सवयच लावून घेतलेली नाही?**



लोकशाहीची सुरुवात मतदानापासून होत नाही; ती संवादापासून होते. संवादाचा पहिला धडा घरात मिळतो. जर एखाद्या मुलाचं मत घरातच ऐकलं जात नसेल तर उद्याचा जबाबदार, आत्मविश्वासू आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणारा नागरिक घडेल, अशी अपेक्षा कशी ठेवायची? मुलांच्या सहभागाच्या हक्काला आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पष्ट मान्यता मिळाली आहे. 'युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑन द राईट्स ऑफ द चाईल्ड' च्या कलम १२ मध्ये प्रत्येक मुलाला त्याच्यावर परिणाम करणार्या बाबींमध्ये स्वतःचं मत व्यक्त करण्याचा आणि त्या मताला त्याच्या वय व परिपक्वतेनुसार योग्य महत्त्व देण्याचा अधिकार मान्य करण्यात आला आहे. कलम १३ मुलांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देते, तर कलम १५ शांततापूर्ण संघटनांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार मान्य करते. भारताने हा करार १९९२ मध्ये स्वीकारला. म्हणजेच मुलांचं मत ऐकणं ही केवळ नैतिक अपेक्षा नाही, तर आंतरराष्ट्रीय बांधिलकीही आहे.

भारतीय संविधानात 'सहभागाचा हक्क' या नावाने स्वतंत्र तरतूद नसली, तरी कलम १९ मधील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कलम २१ मधील सन्मानाने जगण्याचा अधिकार, कलम २१-अ मधील शिक्षणाचा अधिकार आणि राज्याच्या धोरण निर्देशक तत्त्वांतील बालकांच्या हिताविषयीच्या तरतुदी यांमधून मुलांच्या सन्मानपूर्वक सहभागाचा विचार दिसून येतो. राष्ट्रीय बाल धोरण, २०१३ मध्येही मुलांच्या मताला महत्त्व देण्यावर भर देण्यात आला आहे. मात्र, वास्तव वेगळं आहे. आपल्या समाजात मुलांना प्रेम मिळतं, संरक्षणही मिळतं; पण निर्णय प्रक्रियेत स्थान फार कमी मिळतं. कुटुंबात मुलांना काय शिकायचं, कोणता छंद जोपासायचा, कोणत्या शाळेत जायचं, कोणत्या स्पर्धा परीक्षा द्यायच्या, कोणाशी मैत्री ठेवायची, मोबाईल वापरायचा की नाही- बहुतेक निर्णय मोठी माणसं घेतात. अनेक पालकांचा हेतू मुलांचं भलं करण्याचाच असतो; पण भल्याच्या नावाखाली मुलांचा आवाज दाबला गेला, तर त्यातून आत्मविश्वासाऐवजी अवलंबित्व निर्माण होतं.

मुलांचं मत ऐकणं म्हणजे प्रत्येक मागणी मान्य करणं नव्हे. सहभागाचा अर्थ हट्टाला शरण जाणं नाही. सहभागाचा अर्थ म्हणजे मुलाला समजावून सांगणं, त्याचं म्हणणं ऐकणं, प्रश्न विचारण्याची मुभा देणं आणि निर्णयामागील कारणं त्याला समजून सांगणं. मत विचारणं आणि निर्णय घेण्याची संपूर्ण जबाबदारी मुलावर टाकणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. या सूक्ष्म फरकाची जाणीव समाजाला होणं आवश्यक आहे. शाळा ही लोकशाहीची पहिली प्रयोगशाळा असायला हवी. अनेक शाळांमध्ये विद्यार्थी परिषद, विद्यार्थी संसद, वर्ग प्रतिनिधी, बालसभा अशा संकल्पना अस्तित्वात आहेत. परंतु अनेक ठिकाणी या उपक्रमांचं स्वरूप औपचारिकतेपलीकडे जात नाही. शाळेचे नियम, स्वच्छता, ग्रंथालय, क्रीडा, मानसिक आरोग्य, छेडछाड, शालेय वातावरण अशा विषयांवर विद्यार्थ्यांचं मत नियमितपणे जाणून घेण्याची संस्कृती अजून व्यापक झालेली नाही. विद्यार्थ्यांना 'शिस्त पाळणारे' म्हणून पाहण्यापेक्षा 'जबाबदार सहभागी' म्हणून पाहण्याची गरज आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थिकेंद्रित शिक्षण, चिकित्सक विचार, संवाद आणि अनुभवाधारित शिक्षणावर भर देतं. या धोरणाचा आत्माच असा आहे की, विद्यार्थी हा केवळ ज्ञानाचा ग्राहक नसून शिक्षण प्रक्रियेतील सक्रिय भागीदार आहे. ही संकल्पना प्रत्यक्ष वर्गखोलीत कितपत उतरते, हा प्रश्न अजूनही उभाच आहे. मुलांच्या सहभागाचा सर्वाधिक महत्त्वाचा पैलू न्यायव्यवस्थेत दिसून येतो. पालकांचा घटस्फोट, दत्त प्रक्रिया, पालकत्वाचा प्रश्न, संस्थात्मक संगोपन, बालकल्याण समितीसमोरील प्रकरणं किंवा ज्युवेनाईल जस्टिस ( बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अंतर्गत येणार्या अनेक प्रकरणांमध्ये मुलांचं मत ऐकणं आवश्यक मानलं जातं. पॉक्सो कायदा, २०१२ देखील बालस्नेही चौकशी आणि मुलांच्या सन्मानाचं संरक्षण करण्यावर भर देतो. तरीही प्रत्यक्ष व्यवहारात अनेक निर्णय प्रौढांच्या सोयीने घेतले जातात. मुलांचा आवाज कागदोपत्री नोंदविला जातो; पण निर्णयात त्याचं प्रतिबिंब नेहमीच दिसतं असं नाही. समाजातील सर्व मुलांना समान संधी मिळते, असंही नाही. दिव्यांग मुलं, आदिवासी भागातील मुलं, रस्त्यावरची मुलं, बालगृहातील मुलं, स्थलांतरित कुटुंबांतील मुलं आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुलांचा आवाज अधिकच क्षीण असतो. अनेक वेळा त्यांना स्वतःचे हक्क काय आहेत, हेच माहीत नसतं. संयुक्त राष्ट्रांच्या विविध अहवालांमध्ये मुलांना त्यांच्या हक्कांविषयी माहिती देण्याचं महत्त्व वारंवार अधोरेखित करण्यात आलं आहे. हक्कांची माहिती नसताना सहभागाचा हक्क प्रभावीपणे वापरता येत नाही. भारतात काही सकारात्मक प्रयोगही झाले आहेत. राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशातील काही आदिवासी भागांमध्ये सामाजिक संस्थांच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या बाल पंचायत किंवा बाल संसद या उपक्रमांनी मुलांना स्थानिक प्रश्नांवर बोलण्याची संधी दिली आहे. पिण्याचं पाणी, शाळेतील स्वच्छतागृह, पोषण, बालविवाह, शाळाबाह्य मुलं अशा प्रश्नांवर मुलांनी मांडलेले मुद्दे ग्रामपंचायती आणि प्रशासनापर्यंत पोहोचल्याची उदाहरणं आहेत. या प्रयोगांनी (पान ६ वर)

---

कथा

डॉ. राहुल भोसले

# गुंता



नेहाचं हल्ली कुठंच लक्ष लागत नव्हतं. गेली चार दिवस बाल्कनीत एकातांत मनातल्या मनात अस्वस्थ पणे काही विचार करीत येरझाऱ्या मारत होती. तिच्या चेहऱ्यावरचं हसू मावळलं होतं. ती इन्फोसिस कंपनीत असिस्टंट ॲडमीन म्हणून अडीच वर्षापूर्वी रुजू झाली होती. सुमारे आठवडाभर घरूनच होम वर्क करायची.

अलिकडे नेहाच्या वागण्याने घरातले सर्वजण चिंताग्रस्त झाले होते. नेहाचं २२ व्या वर्षी तीन वर्षांपूर्वीच संजय कावरे यांच्याशी विवाह झाला होता. संजय एका नावाजलेल्या इलेक्ट्रॉनिक शोरूममध्ये सेल्स सुपरवायझर म्हणून १५ वर्षे कार्यरत होता. संजय नेहापेक्षा आठ वर्षांनी मोठा होता. लग्नाला तीन वर्ष उलटली तरी घरात पाळणा हलला नव्हता. एकीकडे नेहाचा पती क्षणिक मोहापायी शोरूममधल्या एका स्त्रीच्या जाळ्यात अडकला होता. त्याचं संसारावरचं लक्ष उडालं होतं. पेईंग गेस्टसारखा घरात राहयचा. वृद्ध सासू- सासरे आपल्या मुलाच्या विचित्र वागण्यामुळे हैराण झाले होते. नेहानं सासू-सासर्यांची देखभाल करण्यासाठी चाळिशी ओलाडलेल्या माया नावाच्या महिलेला घरी चोवीस तास ठेवले होते. मायाबाई घरातलं सर्व काही पाहायच्या. नेहाच्या चांगल्या कार्यपद्धतीमुळे कंपनीने कामाची दखल घेऊन तिचा कंपनीचे एच. आर. प्रशांत महापुरे यांच्या हस्ते उचित सन्मान केला होता. प्रशांतने नुकतीच पंचविशी पार केलेली... अविवाहित. अलिकडे दोघांची कंपनीच्या कामानिमित्ताने वारंवार भेटी, चर्चा होऊ लागल्या. प्रशांत राजबिंडा ऐन तारुण्यात पदार्पण केलेलं. अगदी सहज बोलता बोलता हातवारे करायचा. नेहा शांतपणे त्याच्या सुक्ष्म हालचाली टिपायची. खरं तर नेहाला तो आवडला होता; पण काही गोष्टी आपल्या हातात नसतात. याचं भान आल्यामुळं तिनं या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला.

प्रशांतला महत्त्वाच्या कॉन्फरन्स मिटिंगसाठी नियोजन करण्यासाठी नेहाशी संपर्क करावा लागत असे. कंपनीतून घरी जायला उशीर झाल्यास प्रशांत स्वतः नेहाला आपल्या गाडीतून घरपोच सोडायला जात असे. नेहाचा ही स्वभाव प्रशांतला मनापासून भावला. दिवसांगणीक दोघांची जवळीक वाढू लागली. नकळत एका हळव्या क्षणी मनाने एकरूप झाले.

कंपनीच्या निमित्ताने दरवर्षी सहल आयोजित केली जाते. यंदा गोव्याला सहल जाणार होती. नेहानं सर्व तयारी केली. चार दिवसांचा प्रवास होता. आदल्या दिवशी घरकाम करण्याच्या मायाबाईंना महत्त्वाच्या सूचना दिल्या. सासू-सासऱ्यांना सहलीला जाते म्हणून सांगितले. त्यांनी आनंदाने संमती दिली. पती संजयच्या कानावर घालता क्षणीच तो म्हणाला, 'कायमची गेलीस तरी चालेल..' त्याच्या या उद्धट वागण्याकडे दुर्लक्ष केलं खरं; पण आता खरंच आपल्याला वेगळं होण्याचा निर्णय घ्यावा लागेल. अलिकडे आपला पती मर्यादेपलीकडे त्रास देतोय, या साऱ्या जंजाळातून मुक्त होण्यासाठी फेरविचार केला.

दुसरा दिवस उजाडला... सर्व आटोपून भल्या पहाटे सहलीला जाण्यासाठी घराबाहेर पडली. काही अंतरावर पोहोचताच रिक्षा मिळाली. पुढच्या अर्ध्या तासात कंपनीत पोहोचली. तिनं वेळीच निश्चय केला, कसल्या परिस्थितीत पती संजयला सोडचिठ्ठी द्यायची. कारण तो प्रमाणाबाहेर व्यसनाधीन झाला होता. एका प्रायव्हेट ट्रॅव्हल्सने प्रवासाला सुरुवात झाली. गाडीमध्ये नेहाला नेमकी प्रशांतच्या शेजारी बसण्यासाठी जागा मिळाली. मनातून तिला आनंदच झाला होता. त्याच्या परिसस्पर्शाने सुखावली. गोव्याच्या रम्य सागरकिनारी नेहाचं मन रमून गेलं. सोबत प्रशांत होता. तो नेहाचा सेल्फी काढण्यात दंग होता. तेवढ्यात नेहाचा एका सेल्फी प्रसंगी पाय घसरला आणि पाण्याच्या लाटांसोबत नेहा वाहत चालली. क्षणात मागचा- पुढचा विचार न करता प्रशांत पाण्यात उतरला. त्याला पोहता येत होतं. अर्धा कोसभर नेहा पाण्याच्या प्रवाही लाटांसोबत पुढे सरकली होती. प्रशांतने कौशल्याने तिचा पाठमोऱ्या बाजूने जाऊन जोरात तिच्या पायाला ओढले. खेचता... खेचता एका दगडापर्यंत नेले अन् अलगद पाण्याच्या प्रवाहातून बाहेर काढले. नाका-तोंडात पाणी गेल्याने नेहाचा श्वास गुदमरला होता. प्रशांतने ताबडतोब तिच्या छातीवर दाब दिला. पाणी बाहेर पडताच ती शुध्दीवर आली. स्थिरस्थावर झाल्यावर प्रशांतचे आभार मानू लागली.

तिसऱ्या दिवशी प्रवासात नेहा प्रशांतला म्हणाली, सर, एक बोलू का? मला तुमच्यासोबत महत्त्वाचं बोलायचंय... प्रशांत व्हॉट्सॲप पाहण्यात हरवून गेला होता. तिनं झोपेतून जागं करावं तसं त्याला हाताने स्पर्श केला. तिच्या बोलण्याकडं त्याचं लक्ष नव्हतं. हं.. हं.. बोला ना मॅडम, काही हवंय का? तिनं पुन्हा तोच प्रश्न केला. ते ऐकताच प्रशांत उद्गारला, नक्कीच! दोघांनी एकमेकांना होकार देऊन पुढचा मार्ग मोकळा केला. प्रेमापोटी दोघांच्या वयातलं अंतर असूनही विचार केला नाही. नेहा त्याच्यापेक्षा चार वर्षांनी मोठी होती. प्रशांतला स्वतःची सर्व हकीकत सांगितल्यावर आपल्या नवर्याला पुढच्या १५ दिवसात वकिलामार्फत सोडचिठ्ठीचा प्रस्ताव पाठवला. महिनाभरात दोघे पती-पत्नी नात्यातून अलिप्त झाले. वृद्ध आई-वडिलांना वार्यावर सोडून संजय, ज्या बाईबरोबर संबंध होते, तिच्यासोबत पळून गेला. नेहाने थोडे दिवस त्यांचा चांगला सांभाळ केला. संजयचे वडील एकाकी मुलाच्या बेजबाबदार वर्तणुकीमुळे वृद्धावस्थेत मरण पावले. आठवडाभरात त्याच्या आईनं दवाखान्यात शेवटचा श्वास घेतला. नेहाला फार दुःख झाले. प्रशांतचे आई-वडील तो लहान असतानाच एका अपघातात मरण पावले होते. प्रशांत अनाथालयात लहानाचा मोठा झाला होता. प्रशांत-नेहा आपल्या विचारांशी सहमत झाले. आत्मविश्वास, तडजोड करत विवाह करण्याचे ठरले. नेहाचे आई-वडील बाहेरच्या देशात होते. त्यांना फोनवरून सर्व वस्तुस्थिती सांगितली. त्यांनी पुनर्विवाहासाठी शुभेच्छा दिल्या.

....आणि तो दिवस येऊन ठेपला....

लग्न रजिस्टर पद्धतीने पार पडले. दोघांच्या बाजूने कंपनीतला मित्र परिवार होता. (पान ६ वर)

# भारतात फिरताना... मार्को पोलो

वळणावरच्या नोंदी

**स्वाती काळे**

मार्को पोलोची निरीक्षणशक्ती जबरदस्त होती. त्याने १२ व्या शतकातील भारतीय लोकांच्या बारीक- सारीक सवयी टिपल्या आहेत. तो म्हणतो की, येथे सामुद्रिक शास्त्राचे अनेक जाणकार आहेत. पुरुष किंवा स्त्रीच्या चेहर्याकडे किंवा बाह्य रूपाकडे पाहून त्यांचा स्वभाव चांगला की वाईट ठरवण्याची कला लोकांना अवगत आहे. पशुपक्ष्यांच्या संकेतांचे ज्ञान त्यांना आहे. एखादा मनुष्य प्रवासाला निघतो. वाटेत कोणी शिंकला तर तो जागीच बसतो. पुढे जात नाही.

दुसऱ्यांदा शिंकला तर मात्र तो पुढे जातो. दिवसाची एक घटिका अशुभ असते. उदाहरणार्थ, सोमवारी सकाळी ७ वाजेनंतरची वेळ, मंगळवारी सकाळी ९ वाजेनंतरची वेळ, बुधवारी दुपारनंतरचा पहिला तास अशुभ समजला जातो. माणसाच्या पडणार्या सावलीवरून अशुभ वेळ ठरवली जाते. मूल जन्माला आल्यावर त्याच्या जन्मवेळेची नोंद ठेवली जाते आणि ज्योतिषी त्याच्या आयुष्याबद्दल भाकीत वर्तवतात.

काठीने एक वर्तुळ काढतो. जोपर्यंत तो माणूस कर्ज फेडण्याची हमी देत नाही तोपर्यंत त्या वर्तुळातून त्याला बाहेर पडता येत नाही. एकदा तर राजाच एका परदेशी व्यापाऱ्याचे देणे लागत होता. न्यायाधीशाने घोड्यावर बसलेल्या राजाभोवती वर्तुळ काढले. जेव्हा राजाने पैसे देण्याची व्यवस्था केली तेव्हाच त्याला घोड्यासकट वर्तुळाच्या बाहेर येता आले.

आंध्रप्रदेशनंतर तो 'लार' किंवा 'लाट' प्रदेशाविषयी लिहितो. हा प्रदेश म्हणजे सध्याचे उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात. जाणकार म्हणतात, कदाचित तो मैसूर प्रदेशाबद्दल बोलत असावा. त्याने सांगितलेल्या माहितीनुसार या प्रदेशातील ब्राह्मण सगळ्यात चांगले व्यापारी आहेत. ते कधीही खोटे बोलत नाहीत. शाकाहारी आहेत आणि दारू पीत नाहीत. कदाचित ब्राह्मण आणि बनिया या शब्दांमध्ये मार्को पोलोने गल्लत केली असावी, असा कयास आहे.

कन्याकुमारीबद्दल लिहिताना तो म्हणतो की, जावा बेटापासून अदृश्य झालेला ध्रुवतारा कन्याकुमारीत पोहोचल्यावर दिसायला लागतो. या किनारपट्टीवर समुद्री चाच्यांपासून सतत धोका असतो. येथे किर्र जंगल आहे आणि समुद्र धोकादायक आहे. इराणच्या आखातातून आणि चीनच्या वेगवेगळ्या बंदरांमधून येथे जहाजे



माबारहून (तामिळनाडूचा कोरोमंडल किनारा) उत्तरेकडे एक हजार मैल प्रवास केल्यावर 'मोटुपल्ली' हे (आत्ताचा आंध्रप्रदेश) राज्य येते. या राज्यात 'रुद्रमादेवी' नावाची हुशार आणि धोरणी राणी राज्य करते. पती निधनानंतर तिने ४० वर्षे यशस्वीपणे राज्य चालविले. प्रजेचे तिच्यावर फार प्रेम आहे.

मार्को पोलो म्हणतो, या राज्यातील लोक मूर्तिपूजक असून त्यांना कोणताही कर द्यावा लागत नाही. भात, मासे आणि फळे यावर ते जगतात. या राज्यात उच्च दर्जाचे हिरे मिळतात. संपूर्ण जगात असे हिरे शोधून मिळणार नाहीत. येथे अनेक पर्वतरांगा आहेत. पावसाळ्यातले पाणी वेगाने दर्यांमधून आणि गुहांमधून खाली येते. पाऊस ओसरतो आणि माणसे हिरे शोधण्यासाठी दर्यांमध्ये आणि पर्वतरांगांमध्ये जातात. पण गुहेमध्ये दडून बसलेले प्रचंड आकाराचे विषारी साप त्यांना चावतात. तेथे जाणे धोकादायक असते. त्यामुळे माणसे मांसाचे तुकडे दरीत फेकतात. या मांसाच्या तुकड्यांवर अनेक हिरे चिकटून राहतात. पर्वतरांगांवर घिरट्या घालणाऱ्या श्वेत गरुडांना दरीच्या तळाशी पडलेले मांस दिसते. ते खाली येऊन आपल्या पंजात मांस घेऊन जातात. त्यानंतर माणसे गरुडाच्या दिशेने धावू लागतात. गरुड घाबरून मांस सोडून देतात आणि माणसांना हिरे गवसतात किंवा गरुडांच्या विष्ठेतही माणसांना हिरे सापडतात.

भारतीय लोकांच्या पान चघळण्याच्या सवयीविषयीही त्याने लिहिलेले आहे. पानाला तो 'तांबूर' म्हणतो. जर अपमान करायचा असेल तर पानाचा रस ते तोंडावर थुंकतात. कर्जफेड चुकवणाऱ्यांना शिक्षा होते, असे तो म्हणतो. एखादा माणूस कर्जबाजारी होऊन कर्जफेडीची टाळाटाळ करू लागला तर न्यायाधीश त्याच्याभोवती

येतात. समुद्री चाचे व्यापारी जहाजांना घेरून ताब्यात घेतात. गुजरातमध्येही समुद्री चाच्यांनी उच्छाद मांडला आहे. व्यापारी गलबते ताब्यात घेतल्यावर 'तामरिन्दी' हा पदार्थ ते जहाजावरील व्यापाऱ्यांना प्यायला लावतात.

समुद्राच्या पाण्यात चिंच मिसळून केलेला हा पदार्थ प्यायल्यावर एक जोरदार उलटी होते. जर चाच्यांच्या भीतीने रत्ने गिळली असतील तर ती सगळी बाहेर पडतात. गुजरातमध्ये मिरी, नीळ, कापूस आणि सुंठ मोठ्या प्रमाणावर पिकतो. १२ वर्षांपर्यंत कापूस कापड तयार करण्यासाठी वापरतात. त्यानंतरचे उत्पादन दुलया किंवा गाद्या बनवण्यासाठी वापरतात. कापसाची झाडे येथे २० वर्षांपर्यंत टिकतात आणि सहा फूट वाढतात. येथील लोकांची स्वतःची वेगळी भाषा आहे. राजा सार्वभौम आहे. येथे मिरी, सुंठ, कापूस आणि नीळ या पदार्थांची व्यापारपेठ मोठी आहे.

कोल्लम म्हणजेच क्विलोन हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरचे बंदर आहे. येथे अतिशय दर्जेदार सुंठ आणि मिरी होते. येथे मिरीची रोपे लावून त्याची पद्धतशीर मशागत केली जाते. मे ते जुलै या तीन महिन्यात मिरीची लागवड केली जाते. येथे उत्तम प्रकारचे 'कोल्लम ब्राझील' नावाचे लाकूड होते. प्राण्यांविषयी लिहिताना तो म्हणतो की, येथे काळे चित्ते, बिबटे भरपूर प्रमाणात दिसतात. प्राण्यांप्रमाणेच पक्ष्यांचीही येथे विपुलता आहे. पांढरेशुभ्र पोपटांचे थवे मन मोहून टाकतात.

कोकण राज्याचे वर्णन त्याने 'किंगडम ऑफ ताना' म्हणजे ठाणे राज्य असे केले आहे. तो म्हणतो, येथील लोक मूर्तिपूजक आहे आणि त्यांची स्वतःची अशी खास भाषा आहे. येथे पांढर्या मिरी आणि मसाल्यांची निर्मिती होत नाही.

(पान ६ वर)

# गेट-टु-गेदर रिझोल्युशन

यशस्वी आयुष्य जगण्याचा प्रत्येकाचा मार्ग वेगळा असतो. यशस्वी आयुष्याच्या प्रत्येकाच्या व्याख्या वेगवेगळ्या असतात. असे असले, तरी जो आनंदी आयुष्य जगतो व ज्याला आयुष्याच्या विविध क्षणांमध्ये आनंद शोधता येतो तो यशस्वी आयुष्य जगतो, असे सर्वसाधारणपणे आपल्याला म्हणता येईल. अर्थात आपले आयुष्य बरेच वेळा आपल्या सभोवताली असलेल्या समूहाच्या अस्तित्वावरही अवलंबून असते. काही लोक समूहामध्ये त्रयस्थ राहतात तर काही या समूहाचा उपयोग सर्वांच्या आयुष्याला अर्थ निर्माण करून देण्यासाठी करतात. मुळात दृष्टिकोन सकारात्मक असेल तर आपल्याला प्रत्येक क्षणाला यशस्वी आयुष्याच्या दिशेने पडणाऱ्या पावलामध्ये परावर्तित करता येऊ शकते.



एक असाच सुंदर प्रयत्न मला बघायला मिळाला आणि तो प्रयत्न किती परिणामकारक ठरतो आहे हे कळल्यानंतर माझा त्याबद्दलचा आनंद द्विगुणित झाला आहे. सध्या सगळीकडे शाळेतील किंवा महाविद्यालयातील जुन्या बॅचेसच्या रियुनियनचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात व्हायला लागले आहेत. ही एक अतिशय चांगली बाब आहे. २५ किंवा ५० वर्षांनतर शाळेतील सर्व सवंगडी परत एकदा एकत्र भेटणार आणि काही वर्षांपूर्वी एकत्र घालविलेला काळ पुन्हा अनुभवणार. असल्या कार्यक्रमांत फार धमाल असते. फार जुने मित्र- मैत्रिणी एकत्र भेटून पुन्हा जुन्या आठवणींना उजाळा देतात. मुळात हे कार्यक्रम मनःस्वीच असतात. त्या जुन्या काळात केलेली मैत्री ही निखळ मैत्री असते. कसलाही स्वार्थ किंवा फायदा मनात न ठेवता सहजतेने परंतु घट्ट झालेली मैत्री पुन्हा अनेक वर्षांनंतर पुनः रुज्जीवित करणे हा एक अपूर्व सोहळाच असतो. असल्या कार्यक्रमाचे पॅटर्न ठरलेले असतात. एकत्र यायचे, मजा करायची, फोटो काढायचे, एकमेकांची माहिती घ्यायची, काही पैसे गोळा करून शाळेला एखादी भेट वस्तू द्यायची, जुन्या शिक्षकांचा सत्कार करायचा, व्हॉट्स ॲपचा ग्रुप बनवायचा, एकमेकांना जोक्स शेअर करायचे आणि दरवर्षी नक्की भेटायचे असे ठरवायचे. अशा पद्धतीने हे सोहळे साजरे केले जातात.

सर्वांच्या भेटी होतात असे नाही, परंतु काही जण भेटतात. हे जे काही केले जाते ते खरोखरंच छान आहे. अनेक वर्षांच्या जुन्या मित्र- मैत्रिणी भेटणे हीच मुळात पर्वणी असते. परंतु या साचेबंद कार्यक्रमासोबत आपल्याला काही अजून वेगळे व मैत्रीची भावना खऱ्या अर्थाने सिद्ध करणारी काही बाब करता येऊ शकते, असा प्रयत्न एका ग्रुपने केलेला कळला. त्यांनी या अशा प्रकारच्या रियुनियनमध्ये आयोजित केलेला एक अभिनव उपक्रम फार आवडला. काही लोक हे जीवनातील क्षणांना यशस्वी जीवन जगण्याच्या संधीमध्ये परावर्तित करतात असे जे मी लिहिले त्याचा खराखुरा प्रत्यय आणणारा तो उपक्रम होता. मैत्री केवळ व्हॉट्सॲपवर मेसेजेस शेअर करण्यासाठी नसते किंवा एखाद्या रियुनियनच्या कार्यक्रमात सहभागी होण्यापुरती नसते तर अनेक वर्षांच्या भेटीनंतरही एकमेकाच्या जीवनाला भरभक्कम आधार देण्यासाठी मैत्रीचा उपयोग होऊ शकतो, हे त्या उपक्रमाने सिद्ध केले. त्या रियुनियनमध्ये बाकी सर्व कार्यक्रम ठरल्याप्रमाणे झाले; एक कार्यक्रम मात्र सर्वांना आश्चर्यात टाकणारा होता. सर्वांनी आपआपला परिचय द्यायचा, आपल्या परिवारासंबंधी सांगायचे,

गेल्या २५ वर्षांचा कालावधी कसा गेला हे सांगायचे; सोबतच शेवटी अगदी बिनधास्तपणे कोणती व्यसने लागली हे देखील सांगायचे. सगळेच मित्र मंडळी असल्याने प्रत्येकाने मोकळेपणाने बोलावे असे अपेक्षित होते. घडलेदेखील तसेच. प्रत्येक जण मनमोकळेपणाने सांगू लागला. त्या जवळपास ७० मित्रमंडळींपैकी २५ लोकांना वेगवेगळी व्यसने होती. कुणाला तंबाखूचे व्यसन लागले होते, कुणी कसल्याशा पुड्या खायचा, कुणाला दारूचे व्यसन होते तर कुणाला लॉटरीचे व्यसन होते. प्रत्येकाने मोकळेपणाने आपापली व्यसने कबूल केली. ती कबुली देत असताना, खरे तर हे चांगले नाही, पण त्याशिवाय आता भागत नाही हे देखील सांगितले. त्या सगळ्यांमधील ऋणानुबंध इतके छान होते की, लोकांपासून लपविली जाणारी गोष्ट त्या सर्वांनी मनमोकळेपणाने कबूल केली. ही कबुली झाल्यानंतर त्यावरचा उपाय त्या उपक्रमाच्या कल्पक आयोजकांनी विचार करून ठेवला होता. त्यांनी एक अफलातून रिझोल्युशन केले. त्यांनी ज्यांना ही व्यसने होती त्यांच्यासोबत इतर दोन दोन लोकांच्या जोड्या लावल्या. त्यांना एकमेकांचे मोबाईल नंबर घ्यायला लावले आणि त्या दोघांनी ज्याला व्यसन आहे त्या मित्राचे व्यसन वारंवार फोन करून, त्याला त्यापासून परावृत्त करून थांबविण्याचा प्रयत्न करायचा असे ठरले. ज्याला व्यसन आहे त्याने आपल्या मित्र- मैत्रिणींच्या पाठपुराव्याचा आदर करायचा व व्यसनापासून मुक्ती मिळविण्यासाठी प्रयत्न करायचा, असेही त्या रियुनियन रिझोल्युशनमध्ये ठरले. यासाठी कालमर्यादा ठरविण्यात आली. एक वर्षात हे प्रयत्न करायचे आणि एक वर्षानंतर परत एकदा सर्वांनी भेटून आपल्या व्यसनांबाबत स्थिती विषद करायची. अत्यंत कल्पकतेने व मैत्रीतील दृढ प्रेमभाव साक्षीला ठेवून हा उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाचे केवळ चार महिन्यातील फलित जेव्हा माझ्या एका मित्राने सांगितले तेव्हा माझा विश्वास बसला की मैत्रीचे नाते हे अतिशय श्रेष्ठ दर्जाचे नाते असते आणि मैत्रीच्या आधारे जीवनात आमूलाग्र बदल घडू शकतात. सतत तंबाखू खाण्याची सवय असलेल्या व त्यासाठी तंबाखू आणि चुन्याची डबीच बाळगणाऱ्या माझ्या मित्राने केवळ तीन महिन्यात तंबाखू खाणे पूर्णपणे बंद केले. त्याच्या मागे असलेल्या एक मित्र व एका मैत्रिणीच्या जोडीने अत्यंत प्रभावीपणे व हळूहळू त्याचा मागोवा घेऊन, त्याला व्यसन सोडण्यासाठी प्रोत्साहन देऊन तीन महिन्यात त्याचे तंबाखू खाणे बंद केले. तो मित्र अत्यंत अभिमानाने सांगत होता की, त्याच्या त्या रियुनियनच्या कार्यक्रमात करण्यात आलेल्या रिझोल्युशनमुळे जवळपास सर्वच जणांची व्यसने संपली आहेत व काहींची आटोक्यात आहेत. कुणी दिवसाकाठी १०-१० पुड्या खायचा; तो आता केवळ एकच पुडी खातोय. कुणाची रोजची दारूची पार्टी आता रविवारपर्यंत मर्यादित झालीय. कुणाची लॉटरीची सवय कायमची बंद झालीय. अर्थात हे सारे घडण्यासाठी स्वतः त्या व्यक्तीचे व त्याचा पाठपुरावा करणार्या त्याच्या मित्रांचे बरोबरीचे योगदान आहे. मित्रांच्या परस्पर सहकार्याने हे घडू शकले ही बाब महत्त्वाची आहे. कल्पना छोटीशी होती, पण अतिशय उपयुक्त ठरली. मैत्रीच्या त्या मेळाव्याचे फलित इतके सुंदर व उपयोगी राहू शकते, याचा अंदाज कदाचित त्या कल्पक मंडळींनाही सुरुवातीला आला नव्हता. परंतु योग्य पद्धतीने कल्पकता वापरून मैत्रीच्या मेळाव्याचा उपयोग चांगले आयुष्य जगण्यासाठी प्रेरक ठरू शकतो, हे त्यांनी सिद्ध केले. माणूस जेव्हा अशा प्रकारे स्वतःच्या सीमित वर्तुळाच्या पलीकडे जाऊन आपल्या मेंदूतील कल्पकतेला संधी देतो आणि आपल्या प्रामाणिक मनोभूमिकांची त्याला जोड देतो तेव्हा खरी निर्मिती होऊ शकते. चांगल्या जगाची निर्मिती ही याच प्रकारे व आपल्यापैकी प्रत्येकाच्या ठायी असलेली कल्पकता सकारात्मकतेने वापरल्यासच होऊ शकते, हे सिद्ध करणारे हे रियुनियन रिझोल्युशन आपल्याला आपल्या पद्धतीने व आपल्यासोबतच इतरांचेही आयुष्य आनंदमयी करण्यासाठी वापरता येईल?

# काव्यरीती किंवा शैली (उत्तरार्ध)

वेध

**श्रीरंग श्री. हिर्लेकर**

विश्वनाथांनी आपल्या साहित्यदर्पण या ग्रंथात पूर्वीच्या सर्व आचार्यांच्या मताचा परामर्ष घेत त्यांचे सुसंघटित विवेचन तर केलेच; पण 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' म्हणजे ज्या वाक्यात रसाची अनुभूती असेल तेच काव्य असे सांगितले. केवळ अलंकारिक शब्दांची सुंदर रचना म्हणजे काव्य नव्हे.

**विश्वनाथांचा रससिद्धांतः**

**रसनिष्पत्तीः** क्रिया, भावना आणि अनुभूतीतून वाणी प्रवाहित होताना रस निर्माण होत असेल तरच तिला काव्य म्हणावे. भरतमुनी सूत्रच सांगतात' विभावानुभाव व्यभिचारिसंयोगात् रसनिष्पत्तिः।' म्हणजे विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या संयोगातून रस उत्पन्न होतो. अर्थात स्थायीभावाचीही आवश्यकता असते. तो रसिकाच्या अंतरंगात वसतो. उदा. प्रेम या स्थायीभावाची कल्पना केल्यास-

१) विभाव- प्रिय व्यक्ती, तिचे दर्शन, वातावरण इ. प्रेम जागवणारी कारणे. २) अनुभाव हास्य, नेत्रांची चंचलता, लज्जा, हावभाव इ. त्या भावाची बाह्य अभिव्यक्ती आणि ३ ) व्यभिचारी भाव औत्सुक्य, स्मरण, चिंता, लज्जा, हर्ष इ. येणारे-जाणारे सहाय्यकारी भाव. या सर्वांचा एकत्रित अनुभव रसिकाच्या अंतःकरणातील स्थायीभावाला उद्दीपित करतो आणि परिणामतः शृंगाररसाची अनुभूती येते. 'वाक्य रसात्मकं काव्यम्' या व्याख्येचा गाभा हा असा आहे. काव्यातील शब्दांनी फक्त अर्थ सांगू नये तर त्यांनी रसिकाच्या अंतःकरणातील सुप्तावस्थेतील स्थायीभावाला चेतवून त्याला रसानुभवात भिजवावे.

अर्थात रसिकाच्या अंतःकरणात विशिष्ट स्थायीभाव असणे आवश्यक आहे. तोच नसेल तर शून्यातून रसोत्पत्ती अशक्य आहे. उदा. शृंगार रसाच्या अनुभूतीसाठी रसिकाच्या चित्तात रती हा स्थायीभाव असावा. काव्यातील नायक-नायिका, त्यांचे दर्शन, संवाद, विरह, मिलन इत्यादी विभाव सुप्तावस्थेतील रतीला जागृत करतात. मूळ साहित्यशास्त्रात ८ रस आणि नंतर समाविष्ट झालेला नववा शांत आणि त्या सर्वांचे संबंधित स्थायीभाव असे सांगितले आहेत.

१) शृंगार- रती, २) हास्य- हास, ३) करुण- शोक, ४ ) रौद्र- क्रोध, ५) वीर- उत्साह, ६) भयानक- भीती, ७) बीभत्स- जुगुप्सा, ८) अद्भुत- विस्मय, ९) शांत- शम. याचा अर्थ एकटा कवी रसोत्पत्ती निर्माण करतो असे नसून त्याची साहित्यकृती रसिकाच्या अंतःकरणातील मुळातच असलेल्या स्थायीभावाला उद्दीपित करते, असे म्हणणे योग्य. सूत्ररूपात सांगावयाचे तर विभाव हा बाह्य, अंतरंगात वसतो तो भाव आणि अनुभवास येतो तोस. काव्याच्या विभावादिकांच्या परिणामाने सहृदयी अंतःकरणात रस उत्पन्न होतो. भरतमुनींच्या रसनिष्पत्तीची प्रक्रिया ही अशी आहे. कवी, काव्य आणि श्रोत्याची सहृदयता यांचा त्रिवेणी संगम होणे आवश्यक आहे. म्हणून माउली सांगतात-

**म्हणौनि संवादाचा सुवावो ढळे।**
**तरी हृदयाकाश सारस्वते वोळें।**
**आणि श्रोता दुश्चिता तरि वितुळे।**
**मांडिला रसु।**।९-२८ ।।

श्रोत्या- वक्त्यात सुसंवादाचा सुवास दरवळावा. त्याच्या अंतरंगात सारस्वताचे मेघ दाटून यावेत. त्यासाठी श्रोत्याने वक्त्याशी सहृदयी म्हणजे तादात्म्य व्हावे. त्याने दुश्चित्त म्हणजे विचलित होऊ नये. अन्यथा कवीने मांडलेला काव्यरस वितळून पातळ होईल. पुढे असेही म्हणतात-

**अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये।**
**परि तें हातवटी चंद्री की आहे।**
**म्हणौनि वक्तृता तो वक्ता नोहे।**
**श्रोतेनिविण।।।**



पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशामुळे चंद्रकांत मणी पाझरतो. यात चंद्राइतकाच मणीसुद्धा महत्त्वाचा. कारण पाझरण्याची क्षमता- झरा हा तर त्या मण्यातच दडलेला असतो. तसे जाणत्या श्रोत्यांच्या उपस्थितीतच उत्तम वक्तृत्व किंवा काव्य प्रसवते. एकदा तर ज्यांच्या कृपेने ज्ञानवृक्षाचे बीजारोपण झाले त्या निवृत्तिनाथांना उद्देशून ते विनंती करतात की, इकडे आपल्या अवधानमृताच्या सिंचनाने याला पुष्ट करावे.

**सारस्वताचे गोड। तुम्हीच लावले झाड।**
**तरी अवधानामृते वाढ। सिंचोनी कीजे।।**

कधी एकच साहित्यकृती भिन्न संस्कारांच्या श्रोत्यांना निरनिराळी रसानुभूती देते. उदा. पौर्णिमेचे वर्णन करताना कवीने त्याच्यावरील डागाचेही सुंदर वर्णन केले. ते वाचताना एकाचा गोबर्या बाळाच्या गालावर आईने दृष्ट लागू नये म्हणून लावलेला काजळाचा ठिपका आठवून वात्सल्यभाव जागवला. दुसर्याच्या मनी मात्र रमणीच्या गौर उरोजावरील काळे अग्र आठवून श्रृंगार रस उत्पन्न झाला. चंद्राचे सौंदर्य दोघांनाही सारखेच समजले. रससिद्धांत येथेही लागतो.

एकाच प्रतिमेने दोन रसिकांच्या मनात दोन भिन्न रस जरी उत्पन्न झाले असले, तरी ते काव्य निकृष्ट ठरत नाही. कारण रस हा काही कवीने शब्दात भरलेला पदार्थ नाही. तो विभाव, अनुभाव, व्यभिचारीभाव यांच्या अनुकूल संयोगाने रसिकांच्या चित्तात प्रकट होतो.

व्यक्तिगत पूर्वसंस्कारानुसार त्याच्या आलंबनाचे भावनुभव वेगळे असू शकतात. रसोत्पत्ती होणे महत्त्वाचे. सहृदय श्रोता कवीच्या मनातील भावाशी तन्मय होऊन काव्य समजून घेतो. '**अरसिकेषु काव्यनिवेदम्ः**' कधी एखाद्या गानसभेत श्रोत्यांपैकी एखादा भलत्याच जागेवर कौतुकाच्या माना डोलावतो तेव्हा त्या तपस्वी गायकाचा आणि संपूर्ण सभेचा रसभंग होतो.

कधी तर प्रत्यक्ष गोपालनंदनाच्या तोंडून सर्व उपनिषदांचे सार असे गीतामृत प्रसवत असताना, त्यातील विभूतियोगातील आणि नंतरचे कोणी कधी अनुभवले नाही अशा विश्वरूपदर्शनातील नऊ रसांच्या वाक्गंगेत संजय आणि अर्जुन आनंदाने स्नान करत असता अंध धृतराष्ट्र मात्र डबक्यात डुंबणार्या रेड्यासारखा मख्खच राहिला.

## ही वाट वेगळी...

रानामध्ये चालत असता फुटल्या दोन्ही वाटा
एक पावले मळलेली अन् दुसरीवरती काटा
दिसते आहे एक त्यातली गर्दीने फुललेली
एकाकी अन् उगाच भासे दुसरी हिरमुसलेली..
काय करावे मला सुचेना वाट कोणती निवडू
सरावलेली अथवा दुसरी अनोळखी ती पकडू
मनात आले चला बघूया वाट वाकडी तिकडी
रोज फिराया जाऊ लागलो अशी वाढली गोडी..
वाटेवरती सुंदर सुंदर फुले उमलली होती
रंगबिरंगी फुलपाखरे मधुरस प्राशित होती
एकटाच मी त्या वाटेने भटकत विहरत होतो
स्वतःलाच परि भाग्यवान मी मोठा समजत होतो..
आता वाटे वळणावरती माघारी बघताना
पायामध्ये रुतली काटे पुन्हा पुन्हा स्मरताना
बरेच झाले नाही गेलो त्या सोप्या वाटेने
मला कधीही स्फुरले नसते आनंदाचे गाणे..

**देवेंद्र जोशी**

## गौरीनंदना

वनायका, आरंभी तुज वंदना,
गणेशा, लंबोदरा गौरीनंदना।।धृ।।
निराकार ॐकार स्वरूपा
विद्यादानी तू बुद्धिदाता
नीलकंठासुता गजानना हेरंबा
तू दैत्य निकंदना
गणाधीशा, कमळे अर्पिली
विघ्नहर्ता, दुर्वांकुरे वाहिली
लाल तिलक मोरया, लाविला
मान तुझा प्रथम, पूजेला
भक्तिकल्लोळ चतुर्थीस गाती
जीवनात उजळती फुलवाती
करुणाकरा, हे महागणपती
कृपा करा हे विद्यापती जयघोष
गर्जती आसमंती
सकल देवांचा तू अधिपती
मोरयाबाप्पा, तू मंगलमूर्ती
नमन तुझ्या चरणी, गणपती

**अमोल तपास्े**



# बदलते हवामान संकट अन् अन्नसुरक्षेची लढाई

**विकासाच्या नावाखाली निसर्गाचा अतिरेकी ऱ्हास सुरू राहिल्यास त्याची सर्वाधिक किंमत शेती आणि सर्वसामान्य माणसाला मोजावी लागेल. हवामानाचा बदल हा केवळ पर्यावरणवाद्यांचा विषय नाही, तर प्रत्येक नागरिकांच्या ताटातील अन्नाशी जोडलेला विषय आहे. त्यामुळे सरकार, उद्योग, शास्त्रज्ञ, शेतकरी आणि सामान्य नागरिक या सर्वांनी एकत्रीतपणे जबाबदारी स्विकारण्याची गरज आहे.**



पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**

पृथ्वीवरील हवामानाचा समतोल बिघडत चालला आहे. त्याचे परिणाम आता केवळ वैज्ञानिक अहवालांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. जगातील प्रत्येक देश, प्रत्येक समाज आणि प्रत्येक नागरिक त्याचे परिणाम प्रत्यक्ष अनुभवत आहे. उष्णतेच्या विक्रमी लाटा, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दीर्घकालीन दुष्काळ, हिमनद्या वितळणे, समुद्राच्या पाण्याची वाढणारी पातळी आणि नैसर्गिक आपत्तींची वाढती तीव्रता ही आता अपवादात्मक घटना राहिलेली नाही. या सर्व घटनांमुळे सर्वाधिक धोक्यात आली आहे, ती म्हणजे शेती आणि त्यातून निर्माण होणारी अन्नसुरक्षा.

जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना अन्नधान्य उत्पादनावरच संकट ओढवू लागले, तर त्याचे परिणाम केवळ अर्थव्यवस्थेवर नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय स्थैर्यावरही होणार आहेत. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलामागे मानवी हस्तक्षेप हा प्रमुख घटक असल्याचे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाले आहे. औद्योगिकीकरण, जीवाश्म इंधनाचा वाढता वापर, जंगलतोड, शहरीकरण, अनियंत्रित औद्योगिक विस्तार आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिरेकी वापर यामुळे वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. परिणामी, पृथ्वीचे तापमान वाढत असून निसर्गाचे संपूर्ण चक्र विस्कळीत होत आहे. विकासाच्या स्पर्धेत मानवाने निसर्गाशी केलेल्या सततच्या छेडछाडीची किंमत आता संपूर्ण जगाला मोजावी लागत आहे. भारतात या संकटाची तीव्रता अधिक गंभीर आहे. कारण देशातील मोठी लोकसंख्या आजही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे.

भारतीय शेतीचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे मान्सूनवर असलेले अवलंबित्व. पावसाचा योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात होणारा वर्षाव हा शेतीच्या यशाचा मूलभूत आधार आहे; मात्र गेल्या काही वर्षांमध्ये मान्सूनचा स्वभावच बदलला आहे. कधी पाऊस उशिरा सुरू होतो, कधी मध्येच खंड पडतो तर कधी काही तासांमध्ये महिनाभराचा पाऊस कोसळतो. परिणामी, पेरणी, वाढ, फुलोरा आणि कापणी या शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर अनिश्चितता निर्माण झाली आहे. अवकाळी पाऊस आणि गारपीट यामुळे फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. उन्हाळ्यातील विक्रमी तापमानामुळे ऊस, भाजीपाला, कडधान्ये आणि फळपिकांवर परिणाम होत आहे. दुसरीकडे अतिवृष्टीमुळे भात, सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्याला आता निसर्गाचा अंदाज घेणे अवघड झाले आहे.

पूर्वीच्या अनुभवावर आधारित शेतीचे गणित हवामान बदलामुळे पूर्णपणे बदलले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने इशारा दिला आहे की, वाढते तापमान, दुष्काळ, पूर आणि जमिनीची घटणारी सुपीकता यामुळे जगातील अनेक भागांमधील शेती गंभीर संकटात सापडू शकते. मध्यपूर्वेतील अनेक देशांमध्ये अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे; परंतु ही समस्या केवळ त्या प्रदेशापुरती मर्यादित नाही. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील विकसनशील देशांनाही या संकटाचा मोठा फटका बसणार आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी ही चेतावणी अत्यंत महत्त्वाची आहे.

आंतरसरकारी हवामान बदल पॅनेलच्या अहवालानुसार २०४० पर्यंत पृथ्वीचे तापमान १.५ अंश सेल्सियसने वाढल्यास पिकांच्या उत्पादनक्षमतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. पुढे २०५० पर्यंत ८ कोटींहून अधिक लोकांना उपासमारीचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याचा अर्थ हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न राहिला नसून अन्नसाखळी, पोषण आणि मानवी आरोग्याशी संबंधित जागतिक संकट बनला आहे. शेतीची उत्पादकता अनेक नैसर्गिक घटकांवर अवलंबून असते. जमिनीची सुपीकता, पाण्याची उपलब्धता, योग्य तापमान, आर्द्रता आणि कीडरोगांचे नियंत्रण या सर्व घटकांचा समतोल आवश्यक असतो.

हवामान बदलामुळे या प्रत्येक घटकावर परिणाम होत आहे. तापमान वाढल्यामुळे जमिनीतील ओलावा कमी होत आहे. पाण्याचे बाष्पीभवन वाढत आहे. परिणामी, सिंचनाची गरज वाढते आणि भूजलावरचा ताण अधिक वाढतो. अनेक भागांमध्ये भूजलाची पातळी धोकादायकरीत्या खाली गेली आहे. नद्यांमधील पाण्याचा प्रवाह कमी होत असून हिमालयातील हिमनद्यांचे वेगाने वितळणे भविष्यातील जलसंकटाची स्पष्ट चाहूल देत आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार या शतकाच्या अखेरीस पृथ्वीचे तापमान ३.७ ते ४.८ अंश सेल्सियसपर्यंत वाढू शकते. ही वाढ शेतीसाठी अत्यंत घातक ठरू शकते.

गहू, बार्ली, मोहरी, बटाटा यांसारखी थंड हवामानातील पिके मोठ्या प्रमाणावर प्रभावित होतील. उष्णतेमुळे मका, भात आणि ज्वारीसारख्या पिकांमध्ये दाणे भरण्याची प्रक्रिया कमी होईल. परिणामी उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर वाढत्या तापमानामुळे अनेक नवीन किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे शेतीचा खर्च वाढेल आणि उत्पादन घटेल.

भारतातील हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम लहान आणि सीमांत शेतकर्‍यांवर होत आहे. त्यांच्या शेतीचे क्षेत्र कमी असल्यामुळे एक- दोन हंगामांचे नुकसानही त्यांना आर्थिक संकटात ढकलते. वाढता उत्पादन खर्च, अनिश्चित बाजारभाव आणि नैसर्गिक आपत्ती या तिहेरी संकटामुळे शेतीचे अर्थकारण दिवसेंदिवस कमकुवत होत आहे. त्यामुळे अनेक तरुण शेती सोडून शहरांकडे स्थलांतर करत आहेत. ही परिस्थिती दीर्घकाळ कायम राहिली, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होऊ शकतात. हवामान बदलामुळे मातीच्या गुणवत्तेवरही गंभीर परिणाम होत आहे.

वाढत्या तापमानामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होत आहे. नैसर्गिक नायट्रोजनची उपलब्धता घटत असल्यामुळे रासायनिक खतांचा वापर वाढत आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता आणखी कमी होत आहे. हे एक दुष्टचक्र तयार झाले आहे. अधिक उत्पादनासाठी अधिक रासायनिक घटक वापरले जातात. त्यामुळे मातीची गुणवत्ता अधिक खालावते. आज जगातील बहुतांश देश हवामान बदलाचा सामना करत असले, तरी त्याची तीव्रता विकसनशील देशांमध्ये अधिक आहे. कारण या देशांमध्ये शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांची संख्या मोठी आहे. हवामान बदलामुळे केवळ अन्नधान्याचे उत्पादन कमी होत नाही, तर ग्रामीण रोजगार, पिण्याचे पाणी, पशुधन, आरोग्य आणि स्थानिक अर्थव्यवस्था यावरही व्यापक परिणाम होतो.

२०५० पर्यंत जगाची लोकसंख्या साडेनऊ अब्जांहून अधिक होण्याचा अंदाज आहे. या वाढत्या लोकसंख्येच्या अन्नाची गरज भागवण्यासाठी सुमारे ७० टक्के अधिक अन्नधान्य उत्पादन करावे लागेल; मात्र हवामान बदलामुळे शेतीची उत्पादकता घटत असेल, तर ही गरज पूर्ण करणे अत्यंत कठीण होईल. परिणामी अन्नधान्याच्या किमती वाढतील, महागाई वाढेल आणि गरीब देशांमध्ये उपासमार आणि कुपोषणाचे प्रमाणही वाढू शकते. या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ शेतकऱ्यांवर जबाबदारी टाकून चालणार नाही. सरकार, संशोधन संस्था, उद्योग, आंतरराष्ट्रीय संघटना आणि सामान्य नागरिक या सर्वांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे. हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धती विकसित करणे, कमी पाण्यात येणाऱ्या वाणांचा प्रसार, सूक्ष्म सिंचनाचा विस्तार, जलसंधारण, मृदासंवर्धन, सेंद्रिय शेती, हवामानाचा अचूक अंदाज आणि प्रभावी पीक विमा व्यवस्था यांना प्राधान्य द्यावे लागेल. त्याचबरोबर शेतकर्‍यांना योग्य बाजारभाव, प्रक्रिया उद्योग आणि साठवण सुविधाही उपलब्ध करून द्याव्या लागतील. जागतिक स्तरावरही कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी अधिक कठोर धोरणांची आवश्यकता आहे. विकसित देशांनी ऐतिहासिक जबाबदारी स्वीकारून विकसनशील देशांना हरित तंत्रज्ञान, हवामान वित्त आणि संशोधनासाठी अधिक मदत करणे आवश्यक आहे. हवामान बदलावर केवळ परिषदांमध्ये चर्चा करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृतीची गरज आहे. भारतानेही विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल साधणारे धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. ऊर्जा, हरित उद्योग, वृक्षारोपण, जलसंधारण आणि शाश्वत शेती यांना प्राधान्य द्यावे लागेल. हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणारी कृषी व्यवस्था निर्माण केली नाही, तर देशाच्या अन्नसुरक्षेसमोर मोठे संकट उभे राहू शकते.

(लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

## अक्षर गोंदण

एकेकाळी...

**वीरेंद्र सोनवणे**

आदिम काळापासून आजच्या क्षणापर्यंत माणसाच्या जीवनात अनेक स्थित्यंतरं घडलीघडत आहेत. येणारा प्रत्येक क्षण नवा आणि जाणारा जुना. काल जे नवं वाटत होतं ते आज जुनं आणि आज जे नवं वाटत आहे ते उद्या जुनं असेल, हे निश्चित.

रोज नव्या तंत्राचा शोध आणि जुनं तंत्र अद्ययावत होतच आहे. अधिकाधिक नवं, निर्दोष, परिपूर्ण, सहज, सोपं, सुविधाजनक असं तंत्रज्ञान. तंत्रज्ञानानं स्थित्यंतर घडवलं आणि या स्थित्यंतरासह वेळोवेळी जीवन बदलत गेलं.

गेल्या काही वर्षांत कितीतरी अविश्वसनीय बदल घडले, अशा बदलांची आधी कल्पनाही केली नव्हती. काल- शेकडो, हजारो वर्षांपूर्वी काय घडलं, ही जिज्ञासा माणसाच्या जगण्याच्या आरंभापर्यंत घेऊन जाते. विकसनाच्या एकेका टप्प्यावर माणसाची प्रगती आणि त्याला स्फुरलेले शोध थक्क करणारे आहेत. जे आपल्या मनात आहे ते इतरांपर्यंत पोचवण्याची गरज आणि मीं आदिम आहे. हे भाषेमुळे शक्य झालं. भाषा भावना व्यक्त करण्याचं माध्यम झाली आणि माणसाला भावनिक आधार मिळाला. पण, भाषा हे माध्यम प्रत्यक्ष होतं. समोर नसलेल्यापर्यंत आपल्या मनातलं पोचवायचं यासाठी ते सांगणं जतन करून ठेवणं भाग होतं. यातून चित्रलिपी, सांकेतिक चिन्हं आणि लिपी स्फुरली. जे बोलायचं-सांगायचं आहे ते व्यक्त करणारी चिन्हं निर्माण आणि निश्चित होऊन लिपी विकसित झाली.

लिपीनं जीवन बदलवलंच, पण त्याचबरोबर ती माणसाच्या जगण्याच्या चिरंतनत्वाचं साधन ठरली. माणसानं जी भव्य निर्माणं केली ती लिपी लेवून सजली. माणसाचं हे सांगणं पुढच्या अनंत पिढ्यांपर्यंत नेण्याची जबाबदारी दगडांनी स्वीकारली. ही जबाबदारी घेईल असं दुसरं समर्थ आणि चिरंजीव माध्यम दुसरं नव्हतंच. ती अक्षरं दगडांनी आपल्या भाळी कोरून-रेखून घेतली आणि त्या अक्षरांच्या अर्थाचं पुढचा अनंत काळ निर्वहन करणे, हेच त्या दगडांचं प्राक्तन ठरलं. हे लेख म्हणजे शिलालेख.

इतिहास-गतकाळ जाणण्याचं विश्वासार्ह साधन. शिलालेखांतून अनेक महत्त्वाचे संदर्भ ज्ञात झाले आहेत. चित्रलिपी- लिपीचं निर्माण आणि शिलालेख यात बराच मोठा कालखंड आहे. शिलालेख दिसतात प्रत्यक्ष मंदिरांत, मंदिरांवरील शिल्पांकनात किंवा मंदिर परिसरात. अनेक किल्ल्यांतही शिलालेख असतात. मंदिरं आणि किल्ल्यांच्याही आधीपासूनचे शिलालेख शैलगृहांत म्हणजे लेण्यांत दिसतात. अगदी छोट्या काही शब्दांच्या, एका ओळीच्या ते संपूर्ण भिंतभराच्या आकाराचा असे शिलालेख संपूर्ण महाराष्ट्रात दिसतात. निर्माणांचे कर्ते-राज्यकर्ते, राजाज्ञा, दानाचे उल्लेख शिलालेखांतून आढळतात. काही शिलालेखांत काळाचाही निर्देश असतो. असे कालदर्शक शिलालेख अत्यंत महत्त्वाचे. या शिलालेखांतून त्या कालखंडावर विशेष प्रकाश पडतो. जतन केले गेलेले शिलालेख भाग्यवान. पण, अनेक शिलालेख आजही रानावनात पडून आहेत. ऊन, वारा, पावसामुळे ती अक्षरं झिजून गेलीत. असे अनेक महत्त्वाचे संदर्भ पुसल्या गेलेत, पण वर्तमानाला त्याची खंत नाही. लेख छोटा असो किंवा खूप मोठा, त्याचं महत्त्व मात्र कमीजास्त होत नाही. तो त्या काळी, आजपासून शेकडो वर्षे आधी कोणीतरी लिहिला आहे, कोरलेला आहे, हेच जास्त महत्त्वाचं. अस्पष्ट आणि




झिजलेल्या अनेक लेखांतून बरेचदा काही बोध होत नाही, पण म्हणून ते लेख कमी महत्त्वाचे ठरत नाहीत.

शिलालेखांची भाषा, अक्षरं, लिखाणाची पद्धती, भौगोलिक उल्लेख, राज्यकर्त्यांचे उल्लेख, कालदर्शक उल्लेख, घटना यांवरून शिलालेखाचा काळ ठरतो. शास्त्रशुद्ध वाचन महत्त्वाचं. काळ बहुतांश विक्रम संवत्सर किंवा शक कालगणनेनुसार असतो. अनेकदा ज्या शिळेवर शिलालेख आहे तीच भंगल्यानं सर्व संदर्भ व्यवस्थित लागत नाहीत. आडवाटेला आणि विशेष वर्दळ नसलेल्या स्थानी असलेले शिलालेख अनावश्यक मानवी हस्तक्षेपानंही क्षतिग्रस्त होतात. मंदिरातले लेख जीर्णोद्धार आणि रंगलेपनानं विद्रुप होतात, संदर्भ हरवून बसतात. काहींना शेंदूरलेपनाचीही बाधा होते. नव्या जागी बसवण्याच्या अट्टहासात सिमेंटचाही संसर्ग होतो आणि एक महत्त्वाचा संदर्भ कायमचा नष्ट होतो, जो नंतर कधीच बोलू शकत नाही. अशा अबोल लेखांची संख्याही मोठी आहे. मुख्य अडचण असते ती भाषेची. शिलालेखाची प्राचीन लिपी वाचता न आल्यानं त्याचं महत्त्व समजत नाही आणि मग तो दुर्लक्षित असा पडून राहतो. त्यातही जर शिलालेख असलेली शिळा जर सुटी असेल तर अनेकदा तिचं स्थानांतर होत राहतं. यानंही लेखाचं नुकसान होतं. बाह्य भागात असलेले अनेक लेख वर्षानुवर्षे ऊन, वारा, पावसात आहेत.

शेकडो वर्षांत ती अक्षरं मौन झालीत. 'इथं एक शिलालेख होता,' अशी परिस्थिती. यवतमाळ-चंद्रपूर जिल्ह्याच्या सीमेवरच्या संगमावरच्या जुगाद नावाच्या गावी असलेल्या भव्य शिवमंदिरावरचा शिलालेख, यवतमाळ-अमरावती मार्गावरच्या नांदगाव खंडेश्वर मंदिरातला लेख, चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रावतीच्या नागमंदिरातला लेख, चंडिकामंदिरातला लेख, पांढरकवडा- माहूर मार्गावरच्या उनकेश्वर मंदिरातला लेख, रामटेकच्या नृसिंह मंदिरातले लेख हे विदर्भातले खास लेख. लेखन, चित्र, संभाषण असं काहीही डीलिट झालं, पुसलं गेलं तर ते आज सहज परत मिळवता येतं, असं तंत्रज्ञान उपलब्ध आहे. जे त्या शिळांच्या कपाळी लिहिलं गेलं ते सांभाळून, सतत वर्तमानाला सांगत राहायचं, हेच आपलं विधिलिखित त्या सगळ्या शिळांनी ठरवलं आणि ते तंतोतंत पाळलंही. फक्त वर्तमानच असमर्थ ठरतोय् ती अक्षरं वाचायला. ती सारी अक्षरं दिसतात, त्यांचा स्पर्शही होतो, पण त्यांना जे सांगायचं आहे ते मात्र पोचत नाही. शेकडो वर्षांपूर्वी आपल्यासारख्याच कोणातरी माणसानं ही अक्षरं कोरलीत, त्यांचा जिवंत स्पर्श एका संवेदनेच्या सहवेदनेच्या पातळीवर जाणवतो. ती संवेदना- सहवेदना भेटत नसल्यानं हे सारे लेख अबोल झालेत. त्यांचं ते सांगणं पुन्हा परत मिळवण्याचं आणि समजून घेण्याचं कोणतंच तंत्रज्ञान आज वर्तमानाजवळ नाही.



## चक्रव्यूह



कथा

**कमलाकर हणवंते**

महेशला खरंखरं सांगितल्याशिवाय आपल्या मनातलं शल्य कमी होणार नाही की आपल्याला मन:शांतीसुद्धा मिळणार नाही. मागील दोन वर्षांपासून आपण महेशसोबत फुलांच्या झोपाळ्यावरून झोके घेत आहोत, स्वागत-सत्कार समारंभात भरभरून कौतुक करून घेत आहोत, परंतु आपण एकदातरी डोळे भरून महेशकडे बघितलं? जेव्हा केव्हा बघायची तेव्हा आपली नजर खाली झुकायची. पश्चात्तापामुळे डोळ्यांतून अश्रू गळायचे. तेव्हा वाटायचं, महेशला खरं ते सांगून मोकळे व्हावे, तेव्हा ओठात शब्दंही गोळा व्हायचे, परंतु तोंडातून एकही शब्द बाहेर पडत नसे. आज मात्र काही झाले तरी खरं तेच महेशला सांगावं...'' माला या विचारांत तळमळत असता पहाटपक्ष्यांचा कलकलाट सुरू झाला.

सकाळची वेळ होती. वातावरणात प्रसन्नता होती. सकाळची सर्व कामे आटोपून महेश वर्तमानपत्र वाचत सोफ्यावर बसून होता. घरात ये-जा करीत असता ती दृढनिश्चयाने महेशच्या शेजारी सोफ्यावर बसली. महेशशी बोलण्याचा अनेकदा प्रयत्न करूनही तिच्या मुखावाटे एकही शब्द बाहेर पडला नाही. आता माला सोफ्याच्या मागे उभी राहून महेशच्या खांद्यावर हात ठेवून हळुवारपणे म्हणाली, ''अहो, तुम्हाला चहा हवा का?'' खरेतर ही वेळ महेशची ऑफिसला जायची होती. त्यामुळे मालाचे म्हणणे ऐकून महेशला नवलही वाटलं. तो मनातल्या मनात हसलासुद्धा! ''पान वाढलं. अन्न गार होतेय्. जेवायला चला.'' असा महेशला आग्रह करणारी माला यापूर्वी अशी कधीच वागली नव्हती. याचाच विचार करीत महेश म्हणाला,''माला, अशी खाली काय बघतेय? दहा वाजून गेले आहेत, पान वाढायचे सोडून हे काय भलतेच बोलते तू!'' म्हणतच महेश सोफ्यावरून उठला. मालाच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''तुझी प्रकृती ठीक आहे ना?'' महेशचे बोलणे ऐकून मालाला भडभडून आले. हुंदके देत ती कळवळून म्हणाली, ''अहो, तुम्ही आज सुटी घ्या ना!'' तसा महेश मनावरचे ओझे कमी झाल्यागत उत्साह-आनंदात म्हणाला, ''अहो रडूबाई, आधी डोळे पुसा बघू, घेतो मी आज सुटी!''

आता महेश कार चालवीत शहरातील विविध स्थळांची माहिती सांगत होता. पण, मालाचे लक्ष महेशच्या बोलण्याकडे नव्हतेच. महेशला कसे सांगावे, त्या शब्दांची ती मनातल्या मनात जुळवाजुळव करीत होती. तशात कार शहरातील अलिशान रेस्टॉरंटजवळ थांबली. आता दोघेही रेस्टॉरंटची एकेक पायरी चढत जेवणाच्या टेबलाजवळ आले होते. दोन वर्षांत एकदासुद्धा आपण महेशला खरंखरं सांगितलेलं नाही. का? महेश घटस्फोट देईल, या भीतिपोटीच ना! नेमके त्याच वेळी स्पीकरवर 'जिंदगी उसी की है, जो किसी का हो गया, प्यार मेंही खो गया!' हे गाणे सुरू होते. आता वेटरने टेबलावर दोन ताटे लावली होती. माला न जेवता खाली मान घालून विचार करीत होती. हे महेशच्या लक्षात येताच तो हसून प्रेमाने म्हणाला, ''माला जेव ना!''

''हं, हो! तुम्ही जेवा ना!''

''माला, मघापासून बघतो, तू न जेवता कसलातरी विचार करीत आहेस?'' ''नाही हो!'' ''नाही कसे? तुझ्याच म्हणण्याप्रमाणे सुटी घेतली, शहरभर फिरलोय. जेवणाचा बेतही तुझाच होता ना? काही चुकलंय का माला माझं?'' ''नाही हो, तुमचं काहीच चुकलं नाही.''''हो ना, मग तू जेवत का नाहीस!''

आता माला एकेक घास पोटात ढकलत असली, तरी तिच्या मनात सारखे विचार सुरू होते. लग्न झाल्याबरोबर महेशला दुसऱ्याच दिवशी खरंखरं सांगायला पाहिजे होतं. परंतु, आज-उद्या सांगू, असे करताकरता दोन वर्षे मागे पडली आहेत. या विचारांतच मालास जोराचा ठसका लागला. ''माला, भाजी तिखट आहे. गोड खा ना!'' हसू आवरत महेश म्हणाला.

''माझं झालं हो, तुम्ही जेवा ना सावकाश!''

''माला, मघापासून बघतोय. तुला, मला जे काही सांगायचे आहे ते तू मला सांगत का नाहीस? मला वाटतं, आपण दोन वर्षांत एकमेकांना सांगायचं काहीच बाकी ठेवलं नाही. उलट, मी रात्री-बेरात्री घरी यायचो, केव्हाही बाहेर जायचो. तू मात्र माझं हसत हसत स्वागत करायची. प्रणयरम्यक्षणीसुद्धा मी तुझ्या मनाचा मुळीच विचार करीत नव्हतो. माला, मला वाटतं मीच तुझा...'' महेशच्या तोंडावर हात ठेवून तळमळीने माला म्हणाली, ''मी फक्त पत्नीची भूमिका निभावीत होते हो! ते जाऊ द्या. आपण याविषयी कुठेतरी एकान्तात बसून बोलू या.'' आता ते दोघेही समुद्रकिनारी आले होते. सायंकाळ व्हायची होती. सूर्याची सोनेरी किरणे समुद्रभर पसरली होती. अशा नयनमनोहारी आल्हाददायक वातावरणात ते दोघे समुद्राकाठच्या वाळूवर बसले होते. महेश सनसेट बघण्यात दंग होता. माला वाळूवर बोटाने रेघोट्या ओढण्यात गर्क होती. सनसेट बघता बघताच अत्यानंदात महेश म्हणाला, ''माला, बघ किती सुंदर दिसतो सूर्य!'' तोच धीर एकवटून एका दमात माला म्हणाली, ''अहो, पत्नी म्हणून मी तुम्हाला कधीच अपत्यसुख देउच शकत नाही.'' तेव्हा महेश नुसता तिच्याकडे बघून हसला.

''अहो, हसू नका हो...! मालास पुढे बोलू न देता आता महेश जरासा चिडून-रागावून म्हणाला- ''माला, सनसेटसारखे विलोभनीय दृश्य बघायचे सोडून तू तारतम्य नसल्यासारखे काय बोलतेय?'' रडत, आक्रोश करीत कळवळून माला म्हणाली,


''अहो, खरं तेच बोलतेय मी.'' ''नाही माला, तू माझ्याशी खोटे बोलतेय.'' बोलता बोलताच महेशही भावविव्हळ झाला होता. ''नाही हो, आपलं लग्न झाल्याबरोबर तुम्हाला खरं सांगायला पाहिजे होतं. चुकलं माझं. मला क्षमा करा.'' महेश न रागावता, चल-बिचल न होता शांतपणे मालाच्या डोळ्यांतील अश्रू पुसत म्हणाला, ''माला, आता कुठे आपल्या लग्नास जेमतेम दोन वर्षे झाली आहेत. पुढील पाच-दहा वर्षांनंतर मूल होऊ शकते.'' आता मालाने डोळ्यांतील अश्रू पुसून स्वत:ला सावरले अन् करारीपणे एकेका शब्दांवर जोर देत म्हणाली, ''अहो, आपलं लग्न होण्यापूर्वी एकदा नव्हे, तीनदा डॉक्टरकडे गेले होते. माझ्यात मूल होण्याचे एकसुद्धा लक्षण नाही. खरेतर मला लग्नच करायचे नव्हते, परंतु तेव्हा केविलवाण्या झालेल्या तुमच्या चेहऱ्याकडे बघून लग्न करण्यास तयार झाले.'' मालाच्या मनातील मळभ दूर झाल्यामुळे आता तिच्या चेहऱ्यावर तेज आले होते अन् महेशची चक्रव्यूहात अडकल्यागत दशा झाली होती. तोच त्याला तो दिवस आठवला. त्या दिवसांत जे घडलं होतं ते एखाद्या चित्रफितीसारखं त्याच्या नजरेसमोरून सरकलं. ''माला,मनाविरुद्ध माझ्याखातीर तू माझ्याशी लग्न केलं हे खरं आहे. तुला मूल होणार नाही, हे खरंतर तू मला सांगितलं...'' एकेक शब्द तोलून- मापूनबोलत असता महेश धीरगंभीरपणे म्हणाला, ''आपण एखादं मूल दत्तक घेऊ, त्यास तुझी संमती असेल, असे मी गृहीत धरतो.'' महेशच्या तोंडचे अखेरचे वाक्य मालाच्या कानी पडताच ती हसत, डोळ्यांतील अश्रू पुसत अत्यानंदात महेशला बिलगली...

कीर्तिरूपांच्या आठवकथा

## डॉ. रमा गोळवलकर

'वाल्मीकि रामायणात 'युद्धकांड' या शेवटच्या भागातील १११ सर्गात रावणवधानंतर मंदोदरीचा शोक १२८ श्लोकांत वर्णिला आहे. त्या आधी या महाकाव्यात कधीही तिचा पुसटसाही उल्लेखही येत नाही. परंतु स्त्री पंचकात तिचं नाव आवर्जून आहे. अहिल्या, द्रौपदी, कुंती आणि तारा या चार स्त्रियांसह तिचं नाव नित्य घेतलं तर पुरुषांच्या महापातकांचा नाश होतो, असा एक श्लोक आहे. अहिल्येविषयीच्या लेखात हीच पाच नावं असलेला श्लोक उद्धृत केला, त्यावेळी अनेक सुज्ञ वाचकांनी त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं. त्या पाच नावांचा खुलासा करण्यापासूनच या लेखाची सुरुवात करू या...

अहिल्या, द्रौपदी, कुंती, तारा आणि मंदोदरी या पाचही स्त्रियांचं चरित्र विचारात घेतलं असता पुढील तपशील स्पष्ट होतो. अहिल्येनं गौतम आणि देवराज इंद्र या दोन पुरुषांशी संबंध ठेवला. द्रौपदी पाच पांडवांची पत्नी होती. कुंतीनं सूर्य, यम, वायू आणि इंद्र या चार देवतांपासून पुत्रप्राप्ती करवून घेतली. मंदोदरी आधी रावण आणि त्याच्या वधानंतर राजा झालेल्या बिभीषणाशी विवाह करून लंकेची साम्राज्ञी म्हणून वावरली. तारा ही किष्किंधेची राणी आणि वानर राजा वालीची पत्नी होती. विधवा झाल्यानंतर तिनं वालीचा धाकटा भाऊ सुग्रीवाशी विवाह केला. या सर्वच स्त्रियांनी एकाहून अधिक पुरुषांशी संबंध ठेवले तरीही या पंचकाचं स्मरण केल्यानं ना ('नृ' चे प्रथमा एकवचन) म्हणजे पुरुषाच्या महापापांचा नाश होतो, असा तो श्लोक आहे.




काळाच्या ओघात कधीतरी या पाच स्त्रियांतील कुंतीचं नाव वगळून त्यात रावणासारख्या सर्वार्थानं बलाढ्य, यशस्वी, विद्वान पुरुषाशी संबंध ठेवण्याची संधी असूनही केवळ आणि केवळ वनवासी श्रीरामाशीच एकनिष्ठ असलेल्या सीतेचं नाव घुसडण्यात आलं. हा सीतेच्या पातिव्रत्यावर थेट अन्याय आहे तसंच 'पंचक' म्हणजे पाचांचा समूह. 'पंचकं ना स्मरेन्नित्यं' चं 'पंचकन्या स्मरेन्नित्यं' असा अपभ्रंश झाला. 'कन्या' या शब्दाचा अर्थ होतो- बालिका किंवा अविवाहित युवती, कुमारिका. या पाचही स्त्रिया विवाहित होत्या. त्यामुळे या श्लोकात 'पंचकन्या' हा शब्द अयोग्य आहे.

तर, अशा या स्त्री पंचकातली एक असलेली मंदोदरी. रावणाची बलदंड राजसी देहयष्टी, त्याच्या भौतिक समृद्धीचं द्योतक असलेली सोन्याची लंका, आयुर्वेदापासून संगीत आणि काव्यशास्त्रापर्यंत; युद्धशास्त्रापासून विमान उड्डयनतंत्रापर्यंत सर्वच क्षेत्रात असलेला त्याचा अधिकार, नर्मदा नदीच्या दक्षिणेच्या संपूर्ण प्रदेशावर असलेली त्याची राजसत्ता, अघोरी शिवभक्ती, त्याचा तामसी पराक्रम या सगळ्या आवेगी व्यक्तिमत्त्वाला पूरक असलेलं मंदोदरीचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व आहे; मात्र स्वतंत्र, संयत आणि सौम्य. तिचे पिता असुरराज मय हे मध्यभारतातल्या मंदसोर नगर राजधानी असलेल्या प्रांतावर त्यांचं राज्य होतं. मयासुरानं दोन सर्वस्वी वेगळ्या ज्ञानशाखांवर प्रभुत्व मिळवलं होतं.

भारतात 'सूर्यसिद्धांत' हा खगोलशास्त्राचा अतिशय प्रगाढ ग्रंथ मयासुरानं रचला आहे. त्यात खगोलीय निरीक्षणांच्या आधारे योग्य ते बदल करण्याचं स्वातंत्र्य पुढच्या पिढ्यांच्या विद्वान खगोलशास्त्रज्ञांना देण्यात आलं आहे. त्यानुसार त्यातला एक बदल आजपासून जवळपास १२ हजार वर्षांपूर्वी केला असल्याचं सिद्ध झालेलं आहे. म्हणजे हा ग्रंथ त्याआधीपासून अस्तित्वात होता; आणि कालांतरानं बदललेल्या खगोलीय परिस्थितीनुरूप योग्य ते बदल करण्यात आले. त्यानं रचलेला दुसरा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ आहे 'मयमतम्!' भारतीय वास्तुशास्त्राचा पायाभूत शास्त्रीय ग्रंथ म्हणून याची मान्यता आजही अबाधित आहे.

तमिळ भाषेत पारंपरिक वास्तुकला आणि शिल्पशास्त्राचा मूळ प्रवर्तक म्हणून 'मयन' या नावानं त्यांचं पूजन करतात. त्यांना 'मयनर' आणि 'मयमुनी' असंही संबोधन आहे. पांडवांसाठी मयसभा निर्माण करणारे म्हणून मयासुराचं नाव महाभारतातदेखील येतं. मयासुराचा विवाह हेमा नावाच्या स्वर्गीच्या अप्सरेशी झाला. त्यातून मायावी आणि दुंदुभी हे दोन पुत्र तशाच मंदोदरी आणि धन्यमालिनी या दोन कन्या जन्मल्या. अशा दिग्गज माता-पित्याची मुलगी म्हणून मंदोदरीचं संगोपन किती उच्च अभिरुची आणि सकलविद्या कलांनी प्रचुर अशा वातावरणात झालं असावं, याची कल्पना करता येऊ शकते.

मंदोदरीचा शब्दशः अर्थ आहे. जिचं उदर म्हणजे पोट अतिशय सडपातळ आहे अशी. म्हणजेच कमनीय कटी असलेली. त्यातून तिच्या शारीरिक सौंदर्याचं वैशिष्ट्य स्पष्ट होतं. अप्रतिम लावण्यासोबतच ती तिच्या नैतिक आणि बौद्धिक संपन्नतेकरिता सर्वत्र प्रसिद्ध होती. परिस्थितीचा सर्वांगीण आढावा घेऊन त्यावर निर्णय घेण्याची तिची क्षमता आणि स्पष्टवक्ता स्वभाव यामुळे ती रावणाला अधर्मी आचरण न करण्याविषयी वेळोवेळी सल्ला देते.

रावणापासून मंदोदरीला मेघनाद उपाख्य इंद्रजीत, अक्षयकुमार, अतिकाया असे तीन अतिशय पराक्रमी पुत्र झालेत. हे तिघेही राम-रावण युद्धात धारातीर्थी पडले. रावणाच्या मृत्यूची वार्ता ऐकून मंदोदरी रणभूमीवर येते. पतीच्या निधनाविषयी शोक व्यक्त करताना तिचे उद्गार वाल्मीकि रामायणात येतात. त्यातल्या काही श्लोकांचं शब्दशः भाषांतर आहे. 'जन्स्थानात राक्षस सेनेनं वेढलेल्या खराचा वध रामानं केल्याचं ऐकल्यानंतरच तो कोणी साधा मानव नाही हे कळलं होतं.

हनुमंत ज्यावेळी लंकेत शिरला आणि त्यानं आपला प्रताप दाखवला त्यावेळीदेखील आपण अस्वस्थ झालो होतो. रामाशी कोणतेही वैर ओढावून घेऊ नका, हा माझा सल्ला तुम्ही ऐकला नाही. त्यामुळेच तुमच्यावर ही वाईट वेळ आलेली आहे. हे राक्षसपुंगवा, संपत्ती, शरीर आणि आप्तजन यांच्या विनाशासाठीच तुला अचानक सीतेविषयी आसक्ती निर्माण झाली. हे दुष्टमति, अरुंधती (ब्रह्मर्षी वसिष्ठ पत्नी) आणि रोहिणी (चंद्रपत्नी) यांच्यासारखीच (साध्वी) असलेल्या सीतेला बलपूर्वक पळवून आणलंस, हे तिच्यावर अन्यायकारकच होतं. पापी कृत्याचं फळ असंच भयंकर असतं. शुभ कर्माची फळं नेहमीच शुभ असतात. बिभीषण त्याच्या सत्कृत्याचे आणि तू तुझ्या दुष्कृत्याचे परिणाम भोगतो आहेस.'

आयुष्यभर रावणाला परोपरीनं भरभरून साथ दिली तरी सीतेवर झालेल्या अन्यायाचा तिनं वेळोवेळी निषेधच केला. रावणा, तू चुकलास हे पदोपदी सांगितलं. रावणासारख्यांच्या अनैतिक कृत्याचा कडाडून विरोध करणाऱ्या महाराणी मंदोदरीची ही आठव कथा.

बोली आणि संस्कृती

## प्रा. अजय देशपांडे




# चिऊताई आणि तिची गोष्ट आठवताना...

'चिऊताई चिऊताई दार उघड...' ही चिऊ- काऊची लोककथा प्राचीन आहे. गोष्ट आपल्या बालपणातील एक मौलिक आठवण आहे. चक्रधरांनी धानाईसा नावाच्या लहानशा मुलीला कावळ्याची आणि साळेची कथा सांगितली होती लीळाचरित्रात ही कथा आहे.

**सर्वज्ञे म्हणीतलें: काउळेयाचें घर सेणाचें: साळेचें घर मेणाचें': पाउस पडे: काउळेयाचे घर वाहात जाए: साळेचे घर उरे: साळे आपलेया घराआंतु रीगौनि म्हणे: काउळेया काउळेया: कानु कीं डोळा: ऐसें तीनि वेळां उचारिलें: मग तो थाया बीसरली: तेविचि हा गा: हा संसारी आंतु:**

चिऊताई चिऊताईऽऽऽ दार उघड! ओल्याचिंब कावळ्याने चिऊताईला आवाज दिला. थांब! माझ्या बाळाला आंघोळ घालू दे!... ही चिऊ-काऊची गोष्ट पूर्वी लहान मुलांच्या जगण्याचा एक भाग होत असे. आता साठीकडे झुकणाऱ्या किंवा साठी ओलांडलेल्या सर्वांना बालपणीच्या साऱ्या गोष्टी आठवतात. दरवाज्याजवळची चिमण्यांची वर्दळ अन् घराच्या कौलांवरची कावळ्यांची सावध बैठकही आठवते.

अवतीभवतीच्या आयाबायाही आठवतात अन् ती चिमुकली पोरंही आठवतात. चिमण्यांना दाणे खाऊ घालत, चिमुकल्यांना चिऊ काऊचा घास भरवणाऱ्या माउल्या आठवतात अन् ती 'चिऊताई चिऊताईऽऽऽ दार उघड!' ही कथा सांगत भर पावसाळ्यात मुलांना आईने घातलेली आंघोळही आठवते. हे सारे आठवतानाच एका क्षणात एक घर आठवते. तिथे चिमण्यांची खूप वर्दळ आहे, आई आहे, पण ज्याला गोष्ट सांगावी ते मूल मात्र नाही; कालपरवापर्यंत ते मूल, आई, चिमण्या, कावळे, घर सारे काही होते, आजही ते सारे काही आहे, तस्सेच आहे, पण मूल नाही. आपल्याला ती आई आठवते, ते मूलही आठवते. त्या साऱ्या कथा आठवतात. आपल्या बालपणीचं अख्खं भावविश्व आठवते आणि अशा अस्वस्थ वेळी कवी भालचंद्र नेमाडे यांची एक कविता मनाचा ताबा घेते.

**पाठीशी भिंत तुझ्या भिंतीवर**
**चिमण्यांचा खोपा, बाई**
**हलका आहे खांदा तोवर**
**घे भिंतीला पोतेरे, डोळे रिते पुन्हा गर्द नको**
**पुन्हा नको असू.**
**सुख रांगून गेले, अजून घरभर**
**उगा पाळणा भरून हिंदळती लय आहे**
**आहे चिमणी चिमणी मागे, वेचील**
**दुपार दुपार उंबरठाभर निबोलके पण खांबांचे**
**त्यांचे झाले, उभ्या भिंतीचे झाले.**
**डोळ्यांचा भार नको पदराला, बाई**
**तुझ्या पदराचे पोत टिको.....**

कवी भालचंद्र नेमाडे यांची ही एक सुंदर कविता आहे कवितेतील चिमणीचे नाते लोकसाहित्यातील चिमणीच्या कथेशी आहे. चिमणीच्या कथेत तिचे 'आईपण' व्यक्त झाले आहे. पाऊस येत असताना, तिच्या घरट्याबाहेर कावळा 'चिऊताई चिऊताईऽऽऽ दार उघड...' म्हणतो, तेव्हा चिमणी तिच्या बाळाला आंघोळ घालीत आहे. लोककथेतील ही चिमणी कुटुंबवत्सल माता आहे. खोप्याचा संदर्भ तिचे सृजनप्रक्रियेत गढून जाणे दर्शविणारा आहे, तर चिमणी जागी, वेचील दुपार उंबरठाभर निबोलके पण. खांबांचे' या ओळी खोप्यातील पिलांच्या संगोपनाचा संदर्भ देणाऱ्या आहेत. कवितेतील बाईचे मूल मेले आहे-

**'सुख रांगून गेले, अजून घरभर उगी पाळणाभरून हिंदळती लय आहे'**. या ओळी मूल मेल्यानंतरच्या अबोल दुःखाचे सूचन करणाऱ्या आहेत.

भिंतीवर चिमणीचा खोपा आहे आणि भिंतीचे घर आहे. खोपा आणि घर हे सृजनप्रक्रियेचे सहोदर असणारे घटक आहेत, भिंतीला पोतेरे घेणे म्हणजे दुःख विसरून दैनंदिन जगण्याला सुरुवात एवढेच नव्हे, तर नव्याने नव्या जगण्याला सुरुवात करणे होय. पहिल्या सहा ओळींमध्ये दुःख विसरण्यासाठी सांत्वन आहे, पण त्यानंतरच्या पाच ओळींमध्ये शोकात्मक जाणिवेचा शब्दांत न मावणारा परीघ अवतरला आहे. भिंतीला पोतेरे घेण्याची क्रिया प्राचीन लोकगीतांमध्ये दुःख विसरण्याच्या प्रक्रियेशी तादात्म्य पावणारी आहे.

कवितेतील भिंतीला पोतेरे घेण्याच्या प्रक्रियेचे उपयोजन दुःख विसरणे, सांत्वन आणि जीवनशैलीच्या नूतनीकरणाशी अनुबंध राखणारे आहे. खोपा व भिंत हे दोन्ही घटक घर या प्राचीन आदिबंधातील शृंगार, सृजन, प्रजनन, वात्सल्य, संगोपन आदींचे सूचन करणारे आहे. 'उंबरठा' या शब्दाचे उपयोजन आई, मूल आणि अंगण यांच्यातील अनुबंध सूचित करीत असतानाच अंगणातील दाणे टिपणार्या चिमणीचे घरटे उंबरठ्याआतील घरात असल्याचेही दर्शविले आहे. परिणामी खोपा, चिमणी, तिची पिले आणि घर, आई व तिचे बाळ असे घर, माता, वात्सल्य या तीन घटकांचे साहचर्य कवितेत आहे. ज्या बाईचे मूल मेले आहे, तिचे सांत्वन आहेच. पण, नव्या जगण्याचे आणि शब्दातीत दुःख व्यक्त न करण्याच्या बाईच्या सामर्थ्याचेही येथे सूचन केले आहे.

'पोतेरे आणि पदराचे पोत' हे दोन शब्द जीवनशैलीच्या नूतनीकरणाचे, सृजनशीलतेचे आणि वात्सल्यभावनेचे संसूचन करणारे आहेत. पदर लज्जारक्षणासाठी, पदर बाळाला दूध पाजताना त्याच्या अंगावर पांघरण्यासाठी आणि 'पदराचे पोत' हे शब्द आदिम काम्यप्रेरणा आणि आदिम वात्सल्यभावना यांचे ताणेबाणे दर्शविण्यासाठी येथे आले आहेत. 'डोळ्यांचा भार नको पदराला' हे शब्द सांत्वनपर आहेत आणि 'बाई तुझ्या पदराचे पोत टिको' हे शब्द सृजनशील काम्यप्रेरणा आणि आदिम वात्सल्यभाव दोन्ही अधोरेखित करणारे आहेत. सृजनशीलत्व आणि मातृत्व या दोन्ही प्रकाशतत्त्वांचा स्त्रीच्या ठायी असणारा साहचर्यभाव या कवितेत सूचकपणे दाखविला आहे. स्त्रीच्या सृजनशील काम्यभावाचा आणि संस्कारशील मातृत्वभावाचा येथे गौरव केला आहे. या कवितेच्या अंतरंगात लोकगीताची लय भिनलेली आहे. मूल मरण पावलेल्या आईचा निःशब्द दुःखावेग, घरातील खांबांचे, भिंतीचे, उंबरठ्याचे निबोलकेपण आणि (पान ६ वर)

वेधक

## अजय तिवारी

# सायबर चोरट्यांना दणका

**डिजिटल व्यवहारांनी भारताची अर्थव्यवस्था वेगवान, पारदर्शक आणि सर्वसमावेशक केली; त्याच वेगाने सायबर गुन्ह्यांचे जाळेही विस्तारले. अलिकडील केंद्र सरकारच्या व्यापक कारवाईने या गुन्हेगारी साखळीवर आघात केला आहे. ही घटना केवळ गुन्हेगारांविरोधातील यश नसून सुरक्षित डिजिटल भारताच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. त्याचाच हा खास वेध...**



गेल्या दशकात भारतात डिजिटल क्रांतीने अभूतपूर्व वेग घेतला आहे. यूपीआय, इंटरनेट बँकिंग, ऑनलाईन खरेदी, डिजिटल कर्ज, मोबाईल वॉलेट आणि ई-शासन सेवांमुळे व्यवहार अधिक सोपे, जलद आणि पारदर्शक झाले. आज ग्रामीण भागातील सामान्य नागरिकापासून मोठ्या उद्योगांपर्यंत प्रत्येक घटक डिजिटल व्यवस्थेचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र, तंत्रज्ञान जितके प्रगत झाले, तितके त्याचा गैरवापर करणारे गुन्हेगारही अधिक संघटित, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जोडले गेले आहेत. परिणामी सायबर गुन्हे हे केवळ संगणक हॅकिंगपुरते मर्यादित राहिले नाहीत; ते आता आर्थिक, सामाजिक आणि मानसिक शोषणाचे मोठे माध्यम बनले आहेत. आज डिजिटल अटक, बनावट केवायसी अद्ययावत करण्याचे संदेश, बँक अधिकाऱ्यांच्या नावाने फोन, गुंतवणुकीवर अवास्तव परताव्याचे आमिष, ट्रेडिंग ॲप्स, सोशल मीडियावरील बनावट जाहिराती, ऑनलाईन नोकरीच्या ऑफर, टेलिग्राम व व्हॉट्सप गटांद्वारे फसवणूक, म्युल बँक खाती, बनावट सिमकार्ड, क्यूआर कोड स्कॅम, स्क्रीन शेअरिंग ॲप्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आवाज व व्हिडीओची बनावट निर्मिती अशा अनेक माध्यमांमधून नागरिकांना लक्ष्य केले जात आहे. काही मिनिटांत लाखो रुपयांची फसवणूक होणे आता दुर्मिळ राहिलेले नाही. सायबर गुन्ह्यांचे सर्वात धोकादायक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सीमा नसते. एका राज्यात बसलेला गुन्हेगार दुसऱ्या राज्यातील नागरिकाला फसवतो तर त्यामागील सर्व्हर आणि आर्थिक व्यवहार तिसऱ्या देशातून नियंत्रित होत असतात. त्यामुळे सायबर गुन्ह्यांविरुद्धची लढाई ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून तंत्रज्ञान, बँकिंग व्यवस्था, दूरसंचार कंपन्या आणि नागरिक यांच्या संयुक्त सहभागातूनच जिंकता येणारी राष्ट्रीय मोहीम ठरते. आता या गुन्ह्यांना आव्हान मिळत आहे.

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या धोक्याची गंभीर दखल घेत केंद्र सरकारने भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र, सायबर फ्रॉड मिटिगेशन सेंटर, राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल आणि १९३० हेल्पलाईन यांसारख्या यंत्रणा अधिक सक्षम केल्या आहेत. विविध राज्यांच्या पोलिसांशी समन्वय साधत अलिकडे देशभरात मोठी संयुक्त कारवाई करण्यात आली. या मोहिमेत म्युल बँक खाती, बनावट सिमकार्ड, डिजिटल अटक, गुंतवणूक आणि ट्रेडिंग फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर प्रहार करण्यात आला. लाखो सिमकार्ड आणि आयएमईआय क्रमांक निष्क्रिय करण्यात आले, तर हजारो संशयित बँक खाती गोठवून कोट्यवधी रुपयांचे व्यवहार रोखण्यात यश मिळाले. दुसरीकडे महाराष्ट्र सायबर विभागानेही जिल्हानिहाय सायबर पोलिस ठाण्यांचे जाळे मजबूत केले असून शाळा, महाविद्यालये, उद्योग संस्था आणि ग्रामपंचायत स्तरावर जनजागृती मोहीम राबविली आहे. सोशल मीडियाद्वारे सतर्कतेचे संदेश, नागरिकांसाठी प्रशिक्षण, डिजिटल सुरक्षा कार्यशाळा आणि तक्रार नोंदविण्याच्या सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. गुन्हा घडल्यानंतर कारवाई करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच तो होण्यापूर्वी नागरिकांना सावध करणे ही शासनाची व्यापक भूमिका आज दिसून येत आहे.

सायबर फसवणूक टाळण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे जागरूकता. कोणत्याही परिस्थितीत ओटीपी, सीव्हीव्ही, एटीएम पिन, नेटबँकिंग संकेतशब्द किंवा यूपीआय पिन कोणालाही सांगू नये. बँक, पोलिस, न्यायालय किंवा सरकारी अधिकारी फोनवरून आर्थिक माहिती मागत नाहीत, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. डिजिटल अटक, केवायसी अद्ययावत करणे, वीज बिल, पार्सल अडकल्याची सूचना किंवा नोकरीच्या नावाखाली येणाऱ्या संदेशांची सत्यता अधिकृत संकेतस्थळावरून पडताळावी. अनोळखी लिंक, क्यूआर कोड किंवा स्क्रीन शेअरिंग ॲप डाऊनलोड करण्याचे टाळावे. मोबाईल आणि संगणकावरील सुरक्षा अद्ययावत ठेवावी. संशयास्पद व्यवहार दिसताच तातडीने बँकेशी संपर्क साधून १९३० क्रमांकाच्या हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी. वेळेवर दिलेली माहिती अनेकदा फसवलेली रक्कम परत मिळवण्यास मदत करते. सायबर सुरक्षितता ही केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिक जबाबदारीदेखील आहे.

घरातील ज्येष्ठ नागरिक महिला आणि विद्यार्थ्यांना डिजिटल फसवणुकीच्या नव्या पद्धतींबाबत नियमित माहिती देणे आवश्यक आहे. प्रत्येक व्यवहारासाठी मजबूत आणि वेगळे संकेतशब्द वापरणे, दोनस्तरीय प्रमाणीकरण सुरू ठेवणे, अधिकृत ॲप स्टोअरमधूनच ॲप्स डाउनलोड करणे आणि सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती मर्यादित प्रमाणात शेअर करणे ही सवय अंगीकारली पाहिजे. सायबर चोरटे सोशल मीडिया, बनावट गुंतवणूक ॲप्स, टेलिग्राम-व्हॉट्सॲप गट, डेटा लीक, फिशिंग लिंक आणि बनावट ग्राहक सेवा केंद्रांच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची वैयक्तिक आणि आर्थिक माहिती मिळवतात. त्यानंतर कृत्रिम बुद्धिमत्ता, बनावट ट्रेडिंग प्लॅटफॉर्म आणि विश्वासार्ह कंपन्यांच्या नावाचा गैरवापर करून जास्त परताव्याचे आमिष दाखवले जाते. एकदा विश्वास संपादन झाला की, टप्प्याटप्प्याने मोठी रक्कम उकळून गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक केली जाते. आज सायबर गुन्हेगार कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) मोठ्या प्रमाणावर वापर करून फसवणुकीचे नवे मार्ग शोधत आहेत. एआयच्या मदतीने बनावट आवाज, डीपफेक व्हिडीओ, विश्वासार्ह वाटणारे ई-मेल आणि संदेश तसेच गुंतवणूकदारांच्या आवडीनिवडींनुसार वैयक्तिक आमिषे तयार केली जातात. सोशल मीडियावरील माहितीचे विश्लेषण करून संभाव्य बळी निवडले जातात आणि त्यांच्याशी विश्वासाचे नाते निर्माण केले जाते. अशा फसवणुकीपासून बचावासाठी कोणत्याही गुंतवणुकीची माहिती केवळ अधिकृत संकेतस्थळावरून पडताळून पाहावी, अनोळखी लिंक, ॲप किंवा टेलिग्राम गटांवर विश्वास ठेवू नये, व्हिडीओ किंवा आवाज खरा आहे असे गृहीत धरू नये. संशयास्पद व्यवहार अथवा संदेश आढळताच त्वरित १९३० हेल्पलाईन किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदविणे हीच सर्वात प्रभावी खबरदारी ठरते.

अलिकडील कारवाईने शासनाची इच्छाशक्ती आणि यंत्रणांची समन्वय क्षमता स्पष्ट केली असली, तरी सायबर गुन्हे हे बदलणारे आव्हान आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डीपफेक, क्रिप्टोकरन्सी आणि डार्क वेबचा वापर करून गुन्हेगार नवीन पद्धती शोधत आहेत. त्याला उत्तर देण्यासाठी तपास यंत्रणांना अत्याधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि जलद न्यायप्रक्रियेची जोड आवश्यक आहे. संशयास्पद व्यवहारांचे रिअल टाईम विश्लेषण, बनावट खात्यांवर त्वरित निर्बंध आणि आंतरराष्ट्रीय संस्थांशी समन्वय या बाबींवर सातत्याने भर दिला पाहिजे. त्याचबरोबर शालेय अभ्यासक्रमात सायबर साक्षरतेचा समावेश करून पुढील पिढीला सुरक्षित डिजिटल वर्तनाचे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रतिबंध, जनजागृती आणि कठोर अंमलबजावणी या तिन्ही घटकांचा समतोल राखल्याशिवाय सायबर गुन्ह्यांविरुद्धची लढाई दीर्घकाळ यशस्वी होणार नाही. भारताचा डिजिटल प्रवास जितका वेगवान होत आहे, तितकीच सायबर सुरक्षिततेची गरज अधिक तीव्र होत आहे. केंद्र सरकारच्या अलिकडील संयुक्त कारवाईने संघटित सायबर गुन्हेगारीविरुद्ध निर्णायक संदेश दिला आहे. लाखो सिमकार्ड निष्क्रिय करणे, संशयित बँक खाती गोठवणे, फसवणुकीच्या साखळ्या उद्ध्वस्त करणे आणि नागरिकांच्या हजारो कोटी रुपयांचे संरक्षण करणे ही निश्चितच उल्लेखनीय कामगिरी आहे. परंतु हा एक दीर्घ संघर्ष आहे. यापुढील काळात गुन्हेगार सतत नवे मार्ग शोधतील; त्यामुळे शासनालाही तितक्याच वेगाने तंत्रज्ञान, कायदे आणि तपास यंत्रणा अद्ययावत ठेवाव्या लागतील. त्याच वेळी प्रत्येक नागरिकाने डिजिटल व्यवहार करताना विवेक, संयम आणि जागरूकता यांचा अवलंब करणे आवश्यक आहे. सुरक्षित डिजिटल भारत ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक बांधिलकी आहे. प्रशासनाची कठोर कारवाई, तंत्रज्ञानाची सक्षम साथ आणि जागरूक समाज यांचा संगम घडला तरच डिजिटल अर्थव्यवस्थेची विश्वासार्हता टिकेल आणि भारताची डिजिटल प्रगती सुरक्षित, सर्वसमावेशक आणि शाश्वत बनेल.

# ग्रहसंकेत

## (रविवार, ६ सप्टेंबर ते शनिवार, १२ सप्टेंबर २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

* **रविवार, ६ सप्टेंबर-** आदित्य पूजन, हरिमंदिर हत्तरगी येथे महाप्रसाद * **सोमवार, ७ सप्टेंबर-** चौथा सोमवार, अजा एकादशी, शिवामूठ (गहू), पर्युषण पर्यारंभ (चतुर्थ पक्ष), शिवपूजन, सिध्देश्वर यात्रा सिध्दनकेरी (मंगळवेढा), श्रीपाद श्रीवल्लभ जयंती पिठापूर * **मंगळवार, ८ सप्टेंबर-** साक्षरता दिवस, भौमप्रदोष, मंगळागौरी पूजन, स्वामी स्वरुपानंद पुण्यतिथी पावस, संत सेना महाराज पुण्यतिथी, तुकाई यात्रा इटकरे (ता. वाळवा) पर्युषण पर्यारंभ (पाचवमी पक्ष) * **बुधवार, ९ सप्टेंबर-** शिवरात्री, बुध पूजन, स्वामी वरदानंद भारती पुण्यतिथी गोरटा (नांदेड), अंगदबाबा पुण्यतिथी बोरगाव निघोट (मुर्तिजापूर), नारायण महाराज पुण्यदिन नारायणपूर * **गुरुवार, १० सप्टेंबर-** दर्श पिठोरी, अमावास्या (सकाळी १०.३३ नंतर), मातृदिन, पोळा, वृषभ पूजन, मातृदिन, दर्भाहरण, अन्वाधान, बृहस्पती पूजन, अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथी (तिथीप्रमाणे), काळम्मादेवी यात्रा हसूर, रामकृष्ण क्षीरसागर महाराज पुण्यतिथी सोलापूर * **शुक्रवार, ११** सप्टेंबर- इष्टि, प्रतिपदा श्राध्द, अमावास्या स.८.५६ पर्यंत, जरा- जिवंतिका पूजन, महालक्ष्मी उत्सव पेठवडगाव * **शनिवार, १२ सप्टेंबर-** सामश्रवणी, मौनव्रतारंभ, भाद्रपद मासारंभ

**मुहूर्त:-** * **साखरपुडा-** १२ सप्टेंबर * **बारसे-** ८ सप्टेंबर(१५ पर्यंत) १२ सप्टेंबर * **जावळ-** ७ सप्टेंबर * **गृहप्रवेश-** ७ सप्टेंबर, १२ सप्टेंबर

### मेष :- सौख्य लाभेल

प्राप्तीपेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक असतो. राशी स्वामी मंगळ तृत्तीयात असल्याने प्रयत्नातून विविध कार्यात यश मिळवाल व आनंदी व्हाल. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. अडचणी कमी होत जातील. प्रगतीच्या संधी लाभतील. शुभ ता. ७, १२

### वृषभ:- चिकाटीने प्रगती

तडजोड हे आयुष्याचे दुसरं नाव आहे. धनात मंगळ तर लाभात शनि त्यामुळे कोठे ना कुठे तडजोड करूनच प्रश्न मिटवावेत. वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक प्रगती चिकाटीने होईल. भाग्यवृद्धिंगत करणार्या घटना घडतील. जनसंपर्क वाढेल. फार दगदग करू नका. अनावश्यक खर्च टाळावा. प्रगती होत जाईल. कलागुणांचा विकास होईल. शुभ ता. ८, १२

### मिथुन:- रागावर नियंत्रण मिळवावे

जीवन क्रांती हळूहळू घडते. एका क्षणात नाही. राशीत मंगळ तर लाभात शनि त्यामुळे संघर्षातून प्रगती घडेल. ज्ञानदान, बँक, विमा, शेअर मार्केट अशा क्षेत्रात प्रगतीचा टप्पा गाठू शकाल. अडचणींवर मात कराल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. गुढ शास्त्रात प्रगती घडेल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. ६, ७

### कर्क:- आत्मचिंतन घडेल

परीक्षा म्हणजे स्वतःमध्ये डोकावून पाण्याची संधी. धनात रवि तर व्ययात मंगळ त्यामुळे विविध समस्या उद्भवण्याची शक्यता आहे. या समस्यातून आत्मचिंतन घडणार आहे. व्यक्तिमत्त्वाचा विकास होत जाईल. सुखस्थानी मंगळ असल्याने सुखदायी घटनाही घडतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल. शुभ ता. ७, ८

### सिंह:- आत्मविश्वासाने रहावे

जगात अशक्य असे काहीच नाही, प्रयत्न हवेत. राशी स्वामी रवि राशीतच आहे. त्यामुळे आत्मविश्वासाने या नव्या सप्ताहाची वाटचाल करावी. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. वैद्यकीय, अभियांत्रिकी क्षेत्रात अनुकूलता वाढेल. अडचणींची चिंता नको. वेळीच मार्गही निघत जाईल. शुभ ता. ६, १२

### कन्या:- नव्या विचारांना चालना

मनापासून केलेली प्रार्थना फलदायी होते. शुभ ग्रहांबरोबरच सध्या पापग्रहांचेही प्राबल्य आपल्या राशीवर आहे. अंगच्या हुशारीने मार्गक्रमण करीत रहा. लाभस्थ उंचीचा गुरु आर्थिक समस्या सोडविणारा आहे. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. प्रगतीच्या घटना घडतील. दगदग टाळावी. शुभ ता. ७, ८

### तुला:- नव्या कामांना गती

संघर्ष ही यशाची पहिली पायरी आहे. अपयश आले तरी प्रयत्न थांबवू नका. राशी स्वामी शुक्रामुळे, कर्मस्थ गुरुमुळे चांगलेच मार्गक्रमण करू शकाल. नव्या कामांना गती मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. गुंतवणूक विचाराणे करावी. उष्णतेपासून त्रास संभवतो. स्पर्धांमध्ये यश मिळेल. सुसंधी लाभतील. शुभ ता. ८, १२

### वृश्चिक:- मतभेद टाळावेत

प्रत्येक क्षणांत आनंद शोधावा. क्षण पुन्हा येत नसतो. राशी स्वामी मंगळ अष्टमात आहे. त्यामुळे सहज साध्य काही नाही. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. वाहतूक, कमिशनवर चालणाऱ्या व्यवसायात प्रगती होईल. भागीदारीच्या व्यवसायात मतभेदाचे प्रसंग टाळावेत. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. दुर्लक्ष नको. शुभ ता. ७, ८

### धनु:- माणसे पारखून घ्या

कष्टाशिवाय यश मिळत नाही. चौथा शनि तर सातवा मंगळ त्यामुळे कार्यसिद्धीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. पत्रकारिता क्षेत्रात असणाऱ्यांना चांगल्या संधी लाभतील. फार दगदग करू नका. सामंजस्याने रहावे. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. माणसे पारखून घ्या, फसवणूक संभवते. शुभ ता. ७, १२

### मकर:- संघर्ष करावा लागेल

कठीण प्रसंगातही शांत रहावे. धनात राहू, अष्टमात रवि त्यामुळे आर्थिक प्रगतीसाठी संघर्ष करावा लागेल. आपले प्राक्तन कित्येकदा आपणच चांगल्या काळात निर्माण केलेले असते. त्यामुळे येणार्या कठीण प्रसंगाला शांततेने सामोरे जावे लागेल. खाद्यपदार्थ, गृहसजावट, अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. शुभ ता. १२

### कुंभ:- चिकाटीने प्रगती

चुकांमधून शिकणे हे यशाचे खरे रहस्य आहे. राशी स्वामी शनि धनस्थानी, राशीत राहू त्यामुळे चिकाटीने प्रगती घडेल. अंगच्या कलागुणांचा विकास होईल. फार दगदग करू नका. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष नको. यांत्रीक क्षेत्रात अनुकूलता राहील. कलागुणांचा विकास होईल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. शुभ ता. ७, १२

### मीन:- दूरचे प्रवास नकोत

ज्ञान हीच खरी संपत्ती आहे. राशी स्वामी गुरु पंचमात. त्यामुळे अनुभव व जपलेले हितसंबंध यातून चांगले मार्गक्रमण करू शकाल. चौथा मंगळ दगदग वाढविणार आहे. दूरचे प्रवास नकोतच. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या कामाला गती देऊ शकाल. शुक्रामुळे आर्थिक समस्यातून मार्ग निघेल. शुभ ता. २३, २४

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

# भारताविरुद्धचे हायब्रीड युद्ध...

**८. संस्थात्मक सामर्थ्य आणि लोकशाही कणखरता :** सत्तापालटाच्या किंवा अस्थिरतेच्या कोणत्याही प्रयत्नाविरुद्धचा सर्वांत प्रभावी संरक्षणात्मक उपाय म्हणजे मजबूत, पारदर्शक आणि विश्वासार्ह लोकशाही संस्था. भारताने निवडणूक, न्यायालय, संसद, नियामक आणि सुरक्षा संस्थांची क्षमतावृद्धी करणे आवश्यक आहे. सुरक्षा दले, गुप्तचर यंत्रणा आणि पोलीस यांनी व्यावसायिकता आणि जनविश्वास जपणेही तितकेच महत्त्वाचे. सर्वसमावेशक आर्थिक विकास, रोजगारनिर्मिती, प्रादेशिक समतोल, सामाजिक न्याय आणि स्थानिक तक्रार- निवारणांमुळे, असंतोषाची वैध कारणे कमी होतात. नागरिकांना आपले म्हणणे ऐकले जाते, संस्था निष्पक्ष आहेत आणि सुधारणा शय आहेत असे वाटले, तरच बाह्य दुष्प्रचारासाठीची जमीन आपोआप कमी होते.

पान २ वरून

# सहभागाचा हक्क: मुलांचं मत...

हे सिद्ध केलं आहे. की, मुलांना संधी दिल्यास ते केवळ स्वतःचे प्रश्नच मांडत नाहीत, तर समाजाच्या प्रश्नांवरही संवेदनशीलपणे विचार करतात. डिजिटल युगाने मुलांना स्वतःचं मत व्यक्त करण्यासाठी नवी व्यासपीठं दिली आहेत. सामाजिक माध्यमं, विद्यार्थी मंच, ऑनलाईन मोहिमा आणि सर्जनशील माध्यमांमुळे मुलांचा आवाज अधिक व्यापक झाला आहे. त्याचबरोबर ऑनलाईन छळ, ट्रोलिंग, चुकीची माहिती आणि द्वेषपूर्ण भाषेचे धोकेही वाढले आहेत. त्यामुळे मुलांना केवळ अभिव्यक्तीच नव्हे, तर जबाबदार अभिव्यक्तीचं शिक्षण देणंही आवश्यक आहे. सहभागाचा हक्क हा बालसंरक्षणाशीही जोडलेला आहे. ज्या मुलांना आपलं मत निर्भयपणे मांडण्याची सवय असते, ती मुलं अत्याचार, छळ किंवा शोषणाविरोधात आवाज उठवण्याची अधिक शक्यता असते. उलट, सतत गप्प बसायला शिकवलेली मुलं अन्याय सहन करत राहतात. त्यामुळे मुलांना बोलण्याचा अधिकार देणं म्हणजे त्यांच्या सुरक्षिततेची एक महत्त्वाची हमी देणं होय. आपल्या संस्कृतीत मोठ्यांचा आदर ही महत्त्वाची मूल्यव्यवस्था आहे; आदर आणि मौन यांची गल्लत होता कामा नये. मुलांनी प्रश्न विचारणं म्हणजे उद्धटपणा नाही. मत मांडणं म्हणजे अवज्ञा नाही. असहमती व्यक्त करणं म्हणजे संस्कारांचा अभाव नाही. उलट, विचारपूर्वक मत मांडणारी मुलं ही सशक्त लोकशाहीची पायाभरणी करतात. यासाठी पालक, शिक्षक आणि प्रशासन या तिन्ही स्तरांवर बदल आवश्यक आहे. घरात मुलांसोबत नियमित संवाद, शाळांमध्ये प्रभावी विद्यार्थी प्रतिनिधित्व, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बालमित्र उपक्रम, बालकल्याण समित्या आणि न्यायव्यवस्थेत बालस्नेही पद्धती तसेच धोरणनिर्मितीत मुलांचा संरचित सहभाग या बाबी केवळ आदर्श म्हणून नव्हे, तर व्यवहाराचा भाग व्हायला हव्यात. महात्मा गांधी म्हणाले होते, 'भविष्य आज आपण काय करतो त्यावर अवलंबून असतं.' हे भविष्य ज्यांच्या हातात आहे, त्या मुलांना आपण केवळ ऐकण्याचा अभिनय करतो आहोत की खरंच त्यांचं म्हणणं ऐकतो आहोत, हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाने, प्रत्येक शाळेने आणि प्रत्येक शासन व्यवस्थेने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. कारण मुलांना आवाज देणं ही कृपा नाही; तो त्यांचा हक्क आहे. त्यांचं मत ऐकणं ही औपचारिकता नाही; ती लोकशाहीची मूलभूत अट आहे आणि ज्या समाजात मुलांचा आवाज ऐकला जातो, तिथेच उद्याचा नागरिक केवळ आज्ञाधारक नव्हे, तर जबाबदार, संवेदनशील आणि विचारशील घडतो. प्रत्येक मुलाला बोलण्याची संधी मिळतेच; पण त्याचं बोलणं मनापासून ऐकलं जातं का? याच प्रश्नाचं उत्तर आपल्या लोकशाहीची खरी गुणवत्ता ठरवणार आहे. मुलांना आपण भविष्य म्हणतो; पण भविष्याचा आवाज वर्तमानात ऐकत नाही. ज्या समाजात मुलांचं मत ऐकलं जातं, तिथेच लोकशाहीची खरी सुरुवात होते. कारण मुलांना बोलण्याची संधी देणं हा उपकार नाही; तो त्यांचा हक्क आहे. आणि त्यांच्या मताचा आदर करणं हीच आपल्या लोकशाहीची खरी परिपक्वता आहे.

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके



# सांख्य तत्त्वज्ञान

**कपिलाने 'सांख्यसूत्रे' नावाच्या ग्रंथातून हे दर्शन मांडले आहे. इ. स. पू. ८००-८५० हा या ग्रंथाचा काळ अंदाजिला जातो. यात एकूण चार अध्याय असून त्याची ५२७ सूत्रे आहेत. हा ग्रंथ उपलब्ध नाही म्हणून या दर्शनाची ओळख करून घेण्याकरिता ईश्वरकृष्णाचा 'सांख्यकारिका' हा ग्रंथ प्रमाणभूत म्हणून अभ्यासला जातो. यात असलेल्या ७० आर्या 'सांख्यकारिका' (कारिका म्हणजे श्लोक ) या नावाने ओळखल्या जातात. या ग्रंथाचे चिनी भाषेत शालिवाहनाच्या तिसऱ्या शतकात भाषांतर झाले असून ईश्वरकृष्णांचा काळ इ. स. २४० च्या सुमारचा होय, असे विद्वानांचे मत आहे. सांख्यकारिकेवर अनेकांनी टीका लिहिल्या आहेत. परंतु गौंडपादांचे भाष्य आणि वाचस्पती मिश्र यांची 'सांख्यतत्त्व कौमुदी' या दोन टीका विशेष प्रसिद्ध आहेत.**

सांख्य हा शब्द संख्या या शब्दापासून निघाला आहे. संख्या म्हणजे गणनेचे साधन. संख्या एकपासून सुरू होत नाही, ती दोनापासून होते. एक ही संख्या कोणताही भेद दर्शवीत नाही. भेददर्शन दोनच्या आकड्यापासून सुरू होते. सांख्यांनी जगदुत्पत्ती हे प्रकृती आणि पुरुष या दोन तत्त्वांपासून सांगितली आहे. प्रकृतीत असलेले तीन गुण म्हणजे त्रिगुण आणि जगताच्या मुळाशी असलेल्या तत्त्वांची संख्या सांगितली आहे २५. म्हणजे या दर्शनात जिकडेतिकडे संख्याच दिसत असल्यामुळे याला 'सांख्य' म्हटले गेले. सांख्यदर्शनात तत्त्वांची मीमांसा फार चांगल्या रीतीने केली आहे. यांच्या २५ तत्त्वांचे यथार्थ ज्ञान झाले असता कोणाही व्यक्तीला दु:खापासून मुक्ती म्हणजेच मोक्ष मिळतो, असे हे तत्त्वज्ञान सांगते. सांख्यांनी २५ तत्त्वांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

**(१) प्रकृती :** हे तत्त्व असे आहे की, ते सर्वांचे कारण असते म्हणजे यापासून सर्व उत्पन्न होत असते, परंतु स्वतः कोणाचेच कार्य नसते. यालाच प्रधान, अव्यक्त अशीही नावे आहेत.

**(२) विकृती :** काही तत्त्वे कोणाची तरी कार्ये असतात. परंतु इतर कोणाचीच कार्ये नसतात. म्हणजे त्यापासून काहीच उत्पन्न होत नाही. पंचज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंचमहाभुते व मन अशी १६ तत्त्वे विकृती आहेत.

**(३) प्रकृती- विकृती :** काही तत्त्वे कोणाची तरी कार्ये असतात आणि इतरांची कारणेही असतात. महत्, अहंकार व पंचतन्मात्रे अशी ही एकंदर सात तत्त्वे आहेत.

**(४) काही तत्त्वे कार्य व कारण:** या उभयविध संबंधविरहित असतात. त्यांची भूमिका शून्य असते. त्यांना 'न प्रकृती- न विकृती' असे नाव आहे. पुरुष या तत्त्वाचा समावेश यात होतो. या सर्वच तत्त्वांचा विचार करण्याची आवश्यकता नाही. प्रकृती आणि पुरुष हे जगन्निर्मितीला आवश्यक असलेली दोन तत्त्वेच तेवढी विचारात घेऊ. यापैकी प्रकृतीचा विचार मागील लेखात झालाच आहे. आता पुरुष तत्त्वाचा विचार करू...

'सांख्यिकारिके' च्या १७ व्या कारिकेपासून याबद्दलचे विवेचन आढळते. पुरुषाची म्हणजेच आत्म्याची सत्ता स्वयंसिद्ध आहे. 'मी आहे', 'हे माझे आहे' ही प्रतिक्षणाची भावना माझ्या आत्म्याचाच परिचय करून देत असते. कुणीही व्यक्ती आपल्या अस्तित्वाचा अस्वीकार करू शकत नाही की 'मी नाही'. कारण या अस्तित्वाचा अस्वीकार करण्याकरिताही 'माझी' म्हणजे माझ्या 'आत्म्या'ची आवश्यकता पडत असते. हा आत्मा चैतन्यरूप असतो. चैतन्य हा केवळ त्याचा गुण नाही तर त्याचा स्वभाव आहे. तो स्वयंसिद्ध आणि स्वतंत्र असतो. मानवी व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात अनेक घटक असतात. त्याचे मन, त्याचा देह, त्याची इंद्रिये, त्याचे मन किंवा चित्त. या चित्तात उद्भवणार्या चित्तवृत्तीची जाणीव माणसाला असते. सांख्य तत्त्वज्ञानाप्रमाणे ही जाणीव हेच केवळ व्यक्तीचे संपूर्ण आणि सम्यक स्वरूप असते. ज्याची जाणीव माणसाला असते- बाह्य पदार्थ आणि चित्तवृत्ती- ते विषय असतात आणि विषयांची जाणीव ज्याला असते तो विषयी. जाणिवेचा धनी असलेल्या या विषयीला 'पुरुष' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. पुरुषाला ज्यांची जाणीव, ज्ञान असते ते सर्व विषय पुरुषाहून भिन्न असतात आणि त्याला परके असतात. पुरुषाला ज्यांची जाणीव असते त्यांच्यात बाह्य, भौतिक पदार्थ आणि त्याच्या चित्तवृत्तीही असतात. या बाह्य पदार्थात व्यक्तीच्या देहाचीही गणना होते. व्यक्तीला त्याचा देहही परका असतो. जाणिवेचे हे जे सर्व विषय आहेत. भौतिक पदार्थ, चित्ते, चित्तवृत्ती. ते सर्व प्रकृतीत सामावलेले असतात. असे हे स्वरूपतः भिन्न असलेले पुरुष आणि प्रकृती एकत्र येतात आणि यांच्या संयोगाने विश्व निर्मिती होते. सांख्य प्रकृतिपुरुष हे द्वंद्व जगताच्या सुरुवातीस घेतात, ते अनादी मानतात. याचाच अर्थ या दोघांमध्ये पौर्वापर्य नसून दोन्ही एकदमच झाली हे म्हणणे युक्त आहे. प्रकृती आणि पुरुष इतक्या भिन्न भिन्न स्वभावाचे असता त्यांचा संयोग कसा होतो हा एक अवघड प्रश्न आहे. हा संयोग पंगू नि अंध यांच्या संयोगासारखा असतो.

**पुरुषस्य दर्शनार्थ कैवल्यार्थ तथा प्रधानस्य। पंगंधवदुभयोरपि संयोगस्तत्कृतः सर्गः।।**

(सांख्यकारिका २१ ) प्रकृती ही आंधळी व पुरुष हा लंगडा आहे. आंधळ्याला पाय आहेत, पण तो रस्ता पाहू शकत नाही. लंगडा पाहू शकतो, पण रस्ता चालू शकत नाही. अशा स्थितीत लंगडा आंधळ्याच्या खांद्यावर बसतो व त्याला रस्ता दाखवितो. अशा रीतीने दोघांचेही काम होते. याच न्यायाने प्रकृतीची कर्तृत्वशक्ती व पुरुषाचे चैतन्य यांची सांगड झाल्याने विश्व निर्मिती होते.

'सांख्या'त प्रकृतीला स्त्री आणि पुरुषाला 'पुरुष' म्हणून गृहीत धरले आहे. कविकुलगुरू कालिदासाने 'पार्वतीपरमेश्वरू' असे म्हणून सांख्यांना नमन केले आहे. पुरुष - स्त्रीची कार्ये वेगळी असतात, पण ते परस्परांना सहोपचारी असतात तसेच ती एकमेकांवर अवलंबून असतात. प्रकृती व पुरुष हे एकमेकांपासून झालेले नाहीत; पण त्यांचे अस्तित्व एकमेकांवर अवलंबून असते. दौत- टाक हे दोन निराळे, दोघांची कार्ये भिन्न. पण ते एकत्र आल्याशिवाय त्यांच्या स्वतंत्रपणाला काही अर्थ उरत नाही.

**सांख्य तत्त्वज्ञानातील प्रकृती-** पुरुषाबद्दल अप्रतिम विवेचन ज्ञानेश्वरांनी १३ व्या अध्यायात आणि 'अमृतानुभवा'च्या सुरुवातीला केले आहे. पुरुष हा निराकार (अभंग), लोळागोळा झालेला (पेंधा), कंगाल (निकवडा), एकलकोंडा (नुसधा), जीर्ण व अतिवृद्धाहून वृद्ध असा 'तया आडनाव पुरुष'. हात, पाय, कान, डोळे, रूप, रंग, नाव यातली कोणतीच गोष्ट ज्याच्या ठिकाणी सापडायची नाही, तो म्हणे प्रकृतीचा नवरा. याउलट प्रकृती रूपगुणांचा नवा साज लेवून त्या उदासीन पुरुषालाही भोग घडवित असते. प्रकृतीला गुणमयी म्हणतात. सर्व विद्या व कला येथून सुरुवात होतात. चमत्कारांचे हे माहेरघर आहे. सर्व खेळ हिचा असतो. पुरुष (शिव) झोपी गेल्यावर प्रकृतीचा पिंगा सुरू होतो. शिव जागा झाला म्हणजे किंवा शक्ती जागी झाली म्हणजे सर्व विश्व गिळले जाते. पुरुष हा मुळात अविकारी असतो, पण प्रकृतीच्या संगाने तो विकारी होतो.

प्रकृती पुरुषाला व्यापून त्याचे मूळ रूप आच्छादून टाकते व त्याला तेजोहीन करते. एकूण प्रकृतीतील त्रिगुणात्मक (सत्व, रज, तम) गुणातील एखादा गुण प्रबळ झाला म्हणजे मूळचा चेतन पण निष्क्रिय व अविकारी असलेला पुरुष सक्रिय व विकारी होतो आणि पुरुष व प्रकृती यांचा संयोग होऊन सर्ग (सृष्टीचा पसारा) निर्माण होतो हेच सांख्य तत्त्वज्ञान आहे.

पान २ वरून

# गुंता

रजिस्टरवर सह्या झाल्या. वकील मंदार आठवले यांनी लग्न झाल्याचे जाहीर केले. दोघांनी एकमेकांना हार घातले. पेढे भरवले. संध्याकाळी डेक्कनच्या सुकांता हॉटेलमध्ये सर्वांनी शाकाहारी जेवणाचा आस्वाद घेतला. कात्रजच्या गोयलगंगा पॅलेसमध्ये टू-बीएचके फ्लॅटमध्ये नवा संसार मांडला.नेहाच्या आयुष्यातला गुंता खऱ्या अर्थाने सुटला होता. त्या प्रसन्न सकाळी प्रशस्त गॅलरीतून वाफाळलेल्या चहाचा आस्वाद घेता घेता निरभ्र आकाशात भ्रमंती करणाऱ्या बहुरंगी पक्ष्याकडे पाहात नेहा हरवून गेली होती.

पान ३ वरून

# भारतात फिरताना... मार्को पोलो

पण तपकिरी रंगाचे 'अगर' वृक्ष मोठ्या प्रमाणावर आहेत; ज्यापासून अगरबत्ती बनवण्यात येते. येथील व्यापारी पेठेत कायम लगबग असते. वेगवेगळ्या प्रकारच्या उच्च दर्जाच्या चामड्याच्या वस्तू येथून सगळीकडे निर्यात होतात. कापूस आणि बकरमचे कापड येथून मोठ्या प्रमाणात निर्यात होते. या बदल्यात व्यापारी सोने- चांदी आणि पितळ गलबतांमध्ये भरभरून आणतात. समुद्री चाच्यांची येथे नेहमीच भीती असते. पण येथील राजाने चाच्यांशी करार केलेला आहे की लुटीतले घोडे तो स्वतः जवळ ठेवेल आणि इतर सोने- चांदी आणि मौल्यवान वस्तू समुद्री चाचे स्वतःजवळ ठेवतील. मार्को पोलोने हा प्रकार निंदनीय आहे, असे सांगितले आहे.

ठाण्यानंतर त्याने खंबायत (खंभात) आणि सोमनाथाचे वर्णन केले आहे. खंबायत ही गजबजलेली मोठी व्यापारीपेठ आहे. मार्को म्हणतो की, येथे कापडाचे एवढे असंख्य प्रकार आहेत की नाव घेता घेता माणूस थकून जाईल.



कमावलेल्या चामड्याची येथून निर्यात होते. येथे निळीचे उत्पादनदेखील मोठ्या प्रमाणावर होते. कापडाची निर्यात होते. येथील लोकांचे वर्णन त्याने प्रामाणिक असे केले आहे. सोमनाथाचे वर्णन करताना देवळाचा मात्र उल्लेख केलेला नाही. सोमनाथाचा परिसर एक मोठे व्यापारी केंद्र म्हणून त्याने नोंद केली आहे. तेथे जहाजे नाहीत, पण व्यापार मात्र जोरात आहे. तेथील लोक मूर्तिपूजक आहेत. व्यापार आणि उद्योगधंद्यांवर उपजीविका करणारे हे प्रामाणिक लोक आहेत. तांदूळ, गहू, मांस, दूध हे त्यांचे अन्न आहे. भारताच्या पश्चिम किनार्यावरचे शेवटचे शहर म्हणून तो बलुचिस्तानच्या सीमेवरच्या 'मकरान' शहराचा उल्लेख करतो. माबारपासून येथपर्यंतचा संपूर्ण प्रदेश 'ग्रेटर इंडिया' म्हणून ओळखला जातो.

मार्को पोलोने समुद्रालगतच्या भारतातील सर्व प्रदेशांचे वर्णन केले आहे. पण आतल्या भागांमध्ये तो गेला नसावा किंवा त्या प्रदेशांचे वर्णन त्याने केले नसावे. इ. स. १२९८ मध्ये लिहून झालेले त्याचे प्रवास वर्णन वाचत राहावेसे वाटते. धाडसी, चौकस, तटस्थ, धार्मिक ख्रिश्चन तरी इतर धर्मीयांमध्ये मिसळून राहणारा, मूर्तिपूजेविषयी आदर बाळगणारा, पक्का व्यापारी, स्वतःची कधीच तारीफ न करणारा असा हा १३ व्या शतकातील प्रवासी मार्को पोलो आपल्या चिकित्सक बुद्धीने, सहजशैलीने आणि तपशिलात्मक वर्णनामुळे मध्ययुगीन भारतीय इतिहासाचा महत्त्वाचा दुवा बनला.

पान ५ वरून

# चिऊताई आणि तिची गोष्ट आठवताना...

या शब्दातीत भावकल्लोळातून चिमणीच्या लोककथेचे अप्रत्यक्ष उपयोजन कवितेच्या आशयाला शब्दांच्या पलीकडचे अवकाश देणारे आहे.

भालचंद्र नेमाडे यांच्या या कवितेत कितीतरी मायमाउल्यांचे मूल मेल्याचे शब्दांच्या कवेत न मावणारे दुःख अक्षरशः साकळले आहे. ही कविता आपल्याला अस्वस्थ करते. चिऊ-काऊची कथा सांगणार्या माउल्या अन् चिमणे चिमणे घास खात ते ऐकणारी चिमुकली मुले आपल्याला आठवतात अन् त्याच वेळी मूल मेलेल्या आईचे शब्दांच्या पलीकडचे दुःखही आठवते. पण आता काँक्रीटच्या जंगलात कावळे, चिमण्या दिसतच नाहीत, चिऊताई आणि कावळ्याची लोककथा आई मुलांना सांगण्याची आवश्यकता उरलेली नाही. नबोलके हा शब्द मरून गेलाय पण मोबाईलच्या स्क्रीनवर तासनतास डोळे खिळवून बसणारी मुले मात्र निबोलकी झाली आहेत. चिऊताईची चिव चिव आणि कावळ्याची काव आता ऐकू येत नाही..

# हिमालय तापतोय, भवितव्य वितळतेय !

**नेपाळमधील अलिकडच्या जलप्रलयाने पुन्हा एकदा हिमालयातील पर्यावरणीय अस्थिरता, हवामान बदल, भूकंपीय हालचाली आणि मोठ्या धरणांच्या सुरक्षिततेचा प्रश्न केंद्रस्थानी आणला आहे. विशेषतः तिबेटमध्ये चीन उभारत असलेल्या महाकाय धरण प्रकल्पाकडे आता नव्या चिंतेने पाहिले जात आहे. हिमालय वाचवण्याची लढाई पर्वतांमध्ये सुरू असली, तरी तिचा निकाल मैदानातल्या जीवनावर ठरणार आहे.**

वेधक

प्रा. अशोक ढगे

नेपाळच्या आपत्तीने आणखी एक मोठा धडा दिला आहे. हिमालयाला 'जिंकण्याचा' किंवा 'काबूत आणण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा त्याच्या मर्यादा ओळखून विकासाचे नियोजन करणे आवश्यक आहे. पर्वतरांग ही केवळ खनिज, पाणी आणि ऊर्जा यांचा साठा नाही. ती जिवंत भूगर्भीय प्रणाली आहे. तिच्या प्रत्येक बदलाचा परिणाम लाखो लोकांच्या जीवनावर होतो. आज चीन तिबेटमध्ये महाधरण उभारत आहे, उद्या भारती जलविद्युत प्रकल्प वाढवेल आणि नेपाळ आपली जलसंपत्ती वापरण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे हा प्रश्न कोणत्या देशाने काय केले यापुरता मर्यादित राहू शकत नाही. हिमालयीन राष्ट्रांनी सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. मोठ्या धरणांच्या सुरक्षिततेसाठी वैज्ञानिक मंच, संयुक्त आपत्ती इशारा प्रणाली आणि नदीखोऱ्यावरील माहितीची पारदर्शक देवाण-घेवाण आवश्यक आहे. नेपाळच्या पुरातील मृत्यू आणि बेपत्ता झालेल्या नागरिकांची शोकांतिका ही आकडेवारीपुरती मर्यादित राहू नये. ती हिमालयाच्या भविष्यासंदर्भातील इशारा म्हणून स्वीकारली पाहिजे.

हिमालय म्हणजे केवळ बर्फाच्छादित पर्वतरांगांचे अप्रतिम सौंदर्य नव्हे. भारतीय उपखंडाच्या जलसुरक्षेचा तो विशाल जलकोष आहे. सिंधू, गंगा आणि ब्रह्मपुत्रासारख्या महत्त्वाच्या नदीप्रणालींच्या उगमाशी असलेला हिमालय शेती, पिण्याचे पाणी, उद्योग, ऊर्जा आणि कोट्यवधी लोकांच्या उपजीविकेशी थेट जोडलेला आहे, म्हणूनच हिमालयातील तापमानवाढ आणि बर्फाचा वेगाने होणारा ऱ्हास ही केवळ पर्यावरणीय बातमी नाही, अलिकडील वैज्ञानिक अभ्यासाने पश्चिम हिमालयातील परिस्थिती विशेष चिंताजनक असल्याचे स्पष्ट केले आहे. उत्सर्जनावर नियंत्रण न मिळाल्यास या शतकाच्या अखेरीस पश्चिम हिमालयातील हिवाळ्यातील तापमानात तब्बल ८.१८ अंश सेल्सिअसपर्यंत वाढ होऊ शकते आणि वसंत ऋतूतील बर्फाचे प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे. या इशाऱ्याकडे केवळ आणखी एका 'क्लायमेट रिपोर्ट' प्रमाणे पाहणे धोकादायक ठरेल. कारण हिमालयातील बदल भविष्यात घडणारी शक्यता राहिलेली नाही, तर ते बदल आजच्या वास्तवाचा भाग बनले आहेत. १९०१ ते १९३० या कालखंडातील सरासरीच्या तुलनेत १९९५ ते २०१४ या काळात पश्चिम हिमालयातील हिवाळी तापमानात १.०६ अंश सेल्सिअसची वाढ झाली. वसंत ऋतूत तापमानात सुमारे १.०८ अंशांची वाढ नोंदली गेली. याचा अर्थ असा की, हिमालयाच्या बर्फाळ जगात उष्णतेची घुसखोरी आधीच सुरू झाली आहे. प्रश्न फक्त एवढाच आहे की, ही वाढ आपण नियंत्रणात आणणार आहोत की तिला विनाशकारी टप्प्यावर पोहोचू देणार आहोत? या अभ्यासाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचा व्यापक कालावधी. संशोधकांनी १९०१ ते २०२० या १२० वर्षांच्या तापमान नोंदींचे विश्लेषण केले आणि भविष्यातील स्थितीचा अंदाज घेण्यासाठी आठ जागतिक हवामान मॉडेल्सचा वापर केला. पश्चिम, मध्य आणि पूर्व हिमालय अशी विभागणी करून प्रादेशिक फरकांचाही विचार करण्यात आला. हिमालयाला एकसंध भौगोलिक पट्टा समजून एकच धोरण आखणे पुरेसे ठरणार नाही, हा या संशोधनाचा महत्त्वाचा संदेश आहे.

पश्चिम हिमालयात लडाख, जम्मू- काश्मीर आणि हिमाचल प्रदेश; मध्य हिमालयात मुख्यतः उत्तराखंड; तर पूर्व हिमालयात सिक्कीम, अरुणाचल प्रदेश आणि ईशान्येकडील भागांचा समावेश करण्यात आला आहे. या संपूर्ण देशात १५ हजारांहून अधिक हिमनद्या आहेत आणि याच पर्वतरांगांशी सुमारे १५० कोटी लोकांच्या पाणी व उपजीविकेच्या गरजा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या जोडलेल्या आहेत. पश्चिम हिमालय सर्वाधिक संवेदनशील का ठरत आहे, हा प्रश्न आता अत्यंत गांभीर्याने विचारात घ्यावा लागेल. उच्च उत्सर्जनाच्या परिस्थितीत शतकाच्या अखेरीस पश्चिम हिमालयातील हिवाळी तापमानात ७.१८ अंशांपर्यंत वाढ होण्याचा अंदाज आहे. मध्य हिमालयात ही वाढ ६.७१ अंश तर पूर्व हिमालयात ५.८२ अंशांपर्यंत राहू शकते. वसंत ऋतूमध्येही पश्चिम हिमालय सर्वाधिक तापणार असल्याचे मॉडेल्स दर्शवतात. ही केवळ आकड्यांची स्पर्धा नाही. तापमानातील प्रत्येक अतिरिक्त अंश बर्फफाच्या साठ्यावर, हिमनद्यांच्या स्थैर्यावर, नदीप्रवाहांच्या वेळापत्रकावर आणि पर्वतीय परिसंस्थेच्या संतुलनावर परिणाम करणारा आहे. हिवाळ्यातील उष्णता ही या संकटाची सर्वात धोकादायक बाजू आहे. हिमालयात हिवाळा म्हणजे पुढील ऋतूंसाठी पाण्याचा नैसर्गिक साठा तयार होण्याचा काळ. बर्फ जमतो, साठतो आणि नंतर हळूहळू वितळत नदीप्रणालींना पाणी पुरवतो; पण हिवाळाच उबदार झाला, तर बर्फ साठण्याची प्रक्रिया कमकुवत होते. कमी बर्फामुळे जमिनीचा पृष्ठभाग अधिक सूर्यप्रकाश शोषून घेतो आणि त्यामुळे उरलेला बर्फही अधिक वेगाने वितळू लागतो. हा दुष्टचक्रात्मक परिणाम आहे. कमी बर्फ अधिक उष्णता निर्माण करतो आणि अधिक उष्णता आणखी बर्फ कमी करते. त्यामुळे हिमालयातील संकट एका सरळ रेषेत वाढत नाही, तर ते परस्परपूरक प्रक्रियांमुळे अधिक वेगाने तीव्र होऊ शकते. या अभ्यासातील आणखी एक दुर्लक्षित; पण अत्यंत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उष्ण होत चाललेल्या रात्री. पश्चिम आणि मध्य हिमालयात दिवसाच्या तुलनेत रात्रीचे तापमान अधिक वेगाने वाढत आहे. पश्चिम हिमालयात हिवाळ्यात रात्रीच्या किमान तापमानात १.२३ अंशांची वाढ झाली, तर दिवसाच्या कमाल तापमानातील वाढ ०.८७ अंश इतकी होती. वसंत ऋतूमध्येही रात्रीचे तापमान दिवसापेक्षा अधिक वाढले आहे. हे केवळ हवामानशास्त्रीय निरीक्षण नाही. थंड रात्री बर्फाचा काही भाग पुन्हा गोठण्यास मदत होते. त्यामुळे बर्फफसाठ्याची नैसर्गिक भरपाई होत राहते; पण रात्री उबदार झाल्यास ही 'रिफ्रीजिंग' प्रक्रिया कमकुवत होते आणि वितळण्याचा वेग वाढतो. म्हणजे हिमालयातील बर्फाला दिवसाची उष्णता तर सहन करावीच लागते; पण रात्री मिळणारी नैसर्गिक विश्रांतीही आता कमी होत आहे. बर्फाचे नुकसान वसंत ऋतूमध्ये सर्वाधिक होण्याचा अंदाज ही आणखी एक गंभीर बाब आहे. कमी उत्सर्जनाच्या परिस्थितीतही पश्चिम हिमालयातील वसंतकालीन बर्फात सातत्याने घट होण्याची शक्यता आहे, तर उच्च उत्सर्जनाच्या परिस्थितीत शतकाच्या अखेरीस ही घट ९५.९ किलोग्राम प्रति चौरस मीटरपर्यंत पोहोचू शकते. मध्य आणि पूर्व हिमालयात नुकसान तुलनेने कमी असले, तरी ते नगण्य नाही.

हिवाळ्यातील बर्फ साठ्यातही मोठी घट अपेक्षित आहे. या आकड्यांचा अर्थ असा की, हिमालयाचा नैसर्गिक जलसाठा हळूहळू कमकुवत होत आहे. आज नदीत अचानक अधिक पाणी दिसले, तरी ते दीर्घकालीन जलसुरक्षेचे लक्षण असेलच असे नाही. सुरुवातीला वाढलेले वितळणे नदी प्रवाह वाढवू शकते; परंतु हिमनद्या आणि बर्फसाठे कमी झाल्यावर भविष्यातील पाणीपुरवठाच अनिश्चित होऊ शकतो. यामुळे हिमालयातील बदलांचा प्रश्न थेट मैदानातील भारताच्या प्रश्नाशी जोडला जातो. शेतीसाठी पाणी, शहरांसाठी पेयजल, जलविद्युत प्रकल्प, उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांपैकी अनेक घटक हिमालयातून उगम पावणार्‍या नद्यांवर अवलंबून आहेत. नदीप्रवाहाची मात्रा आणि वेळ बदलल्यास संपूर्ण नियोजन व्यवस्था कोलमडू शकते. एखाद्या भागात अचानक पूर, तर दुसऱ्या काळात पाणीटंचाई अशी टोकाची स्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे हिमालयातील बर्फ वितळणे म्हणजे फक्त पर्वतारोहक, पर्यटक किंवा पर्वतीय समाजाची चिंता नव्हे. ती मैदानातील शेतकर्‍याची, महानगरातील नागरिकाची आणि देशाच्या अन्न जलसुरक्षेची चिंता आहे. पूर्व हिमालयातील तुलनेने कमी तापमानवाढ याचा अर्थ तिथे धोका कमी आहे, असे समजणेही चुकीचे ठरेल. संशोधनानुसार हिमनदीय तलाव फुटून येणाऱ्या अचानक पुराच्या धोक्याप्रति पूर्व हिमालय आधीच संवेदनशील आहे. हिमनद्या मागे सरकल्याने नवीन तलाव तयार होतात आणि त्यांचे नैसर्गिक बांध तुटल्यास खालच्या भागात प्रचंड विनाश होऊ शकतो.

हिमालयाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये संकटाचे स्वरूप वेगवेगळे आहे. कुठे तापमानवाढ आणि बर्फहानी अधिक, कुठे पूरधोका तर कुठे जलसाठ्याच्या दीर्घकालीन अनिश्चिततेचे आव्हान. म्हणूनच 'एक हिमालय, एक धोरण' हा दृष्टिकोन अपुरा आहे. या संशोधनातून सर्वात आशादायक संदेशही मिळतो, तो म्हणजे भविष्य पूर्णतः पूर्वनिश्चित नाही. कमी उत्सर्जनाच्या परिस्थितीत पश्चिम हिमालयातील हिवाळी तापमानवाढ सुमारे २.५५ अंशांपर्यंत मर्यादित राहू शकते; पण उच्च उत्सर्जनाच्या परिस्थितीत ते ७.१८ अंशांपर्यंत पोहोचू शकते. म्हणजे जग आज जी धोरणे स्वीकारेल, त्यावर पुढील पिढ्यांचा हिमालय अवलंबून आहे. उत्सर्जन कमी करणे ही पर्यावरणवाद्यांची भावनिक मागणी नसून वैज्ञानिकदृष्ट्या परिणामकारक हस्तक्षेपाची आवश्यकता आहे. उच्च आणि कमी उत्सर्जनाच्या मार्गांमध्ये आज तब्बल सुमारे ४.६ अंशांचा फरक दिसतो. हा फरक म्हणजे अब्जावधी टन बर्फ, बदललेले नदीप्रवाह आणि लाखो लोकांच्या सुरक्षिततेतील फरक असू शकतो; मात्र जबाबदारी केवळ जागतिक कार्बन उत्सर्जनावर टाकून भारत आणि हिमालयीन राज्ये स्वतःची कर्तव्ये टाळू शकत नाहीत. हिमालयातील अनियंत्रित बांधकाम, डोंगर उतारांवरील अतिक्रमण, बेफाम पर्यटन, रस्ते आणि पायाभूत प्रकल्पांमधील पर्यावरणीय दुर्लक्ष, जंगलतोड आणि नदीखोर्‍यांमधील असंतुलित विकास यांचाही गंभीर विचार करावा लागेल. हवामान बदल जागतिक असला, तरी त्याचे परिणाम स्थानिक पर्यावरणीय दुर्बलतेमुळे अधिक विध्वंसक होतात. म्हणून 'विकास विरुद्ध पर्यावरण' असा कृत्रिम संघर्ष उभा करण्यापेक्षा पर्यावरणीय मर्यादा लक्ष घेणारा विकास हा एकमेव शहाणपणाचा मार्ग आहे.



# इराणची नाकेबंदी अन् भारतासमोरील आव्हान

**अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी इराणविरुद्ध पुकारलेल्या 'ऑपरेशन इकोनॉमिक आऊटकास्ट'मुळे जागतिक राजकारणात मोठी खळबळ उडाली. इराणची अर्थव्यवस्था पूर्णपणे उद्ध्वस्त करण्याच्या या नव्या मोहिमेमुळे प.आशियातच नव्हे, तर भारताच्या ऊर्जासुरक्षेवर आणि विशेषतः चाबहार बंदराच्या भविष्यावरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

परराष्ट्रकारण

संजीव ओक

गेल्या अनेक दशकांपासून अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेला शीतयुद्धाचा आणि कुरघोड्यांचा संघर्ष आता एका अत्यंत निर्णायक आणि स्फोटक वळणावर येऊन पोहोचला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकतीच इराणविरुद्ध 'ऑपरेशन इकोनॉमिक आऊटकास्ट' या नावाने एका अभूतपूर्व आणि अत्यंत आक्रमक आर्थिक मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट इराणच्या अर्थव्यवस्थेला कमकुवत करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नसून, तिला जागतिक स्तरावर पूर्णपणे एकाकी पाडून तिची सर्व बाजूंनी नाकेबंदी करणे हे आहे.



अमेरिकेच्या अर्थमंत्र्यांनी याला आर्थिक 'डी- डे' असे संबोधले असून, इराणचे उरलेसुरले सर्व आर्थिक मार्ग, जसे की- डिजिटल चलने, सोने, तंत्रज्ञान, विमान वाहतूक, तेल आणि जहाजबांधणी, पूर्णपणे रोखण्याचा अमेरिकेचा मनसुबा आहे. यामागील अमेरिकेची रणनीती अतिशय स्पष्ट आहे. इराणवर याआधीही निर्बंध होतेच; पण त्यातून नवनव्या पळवाटा काढून इराण आपला गाडा हाकत होता. आता मात्र कोणत्याही परिस्थितीत 'झिरो लीकेज' (शून्य पळवाट) धोरण अवलंबून इराणची अर्थव्यवस्था धुळीला मिळविण्याची आणि त्यांना जागतिक अर्थव्यवस्थेतून कायमचे बहिष्कृत करण्याची अमेरिकेची ही आतापर्यंतची सर्वांत कठोर आर्थिक खेळी आहे.

अमेरिकेच्या या घोषणेमुळे संपूर्ण पश्चिम आशियातील भू- राजकीय समीकरणे मुळासकट हादरून गेली आहेत. इराणवरील अमेरिकन निर्बंधांचा इतिहास खूप जुना आणि गुंतागुंतीचा. याआधीच्या कठोर निर्बंधांमुळेही इराणचे अतोनात नुकसान झाले होते. विदेशी चलनाचा तुटवडा, गगनाला भिडलेली महागाई, वाढती बेरोजगारी आणि डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक नीचांकावर घसरलेला रियाल, यामुळे इराणची सामान्य जनता यापूर्वीपासूनच महागाईच्या वणव्यात होरपळत आहे. इराणमध्ये जीवनावश्यक वस्तू आणि औषधांचाही मोठा तुटवडा निर्माण झाला असून, प्रशासनाविरुद्धचा अंतर्गत असंतोष उफाळून येत आहे. मात्र, इतके करूनही इराणने आपली तेल निर्यात, विशेषतः चीन आणि इतर काही मोजक्या देशांना छुप्या मार्गांनी आणि गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक जाळ्यांचा वापर करून सुरूच ठेवली होती. त्यामुळे इराणची अर्थव्यवस्था डबघाईला येऊनही कशीबशी तग धरून होती. मात्र, आताच्या 'ऑपरेशन इकोनॉमिक आऊटकास्ट'मुळे इराणसमोरील परिस्थिती भयावह अशीच होणार आहे. अमेरिकेने आता इराणवरच नव्हे; तर इराणला मदत करणाऱ्या जगातील कोणत्याही देशावर, बँकेवर किंवा कंपनीवर दुय्यम निर्बंध लादण्याचा कठोर इशारा दिला आहे. जो कुणी इराणशी कोणत्याही प्रकारचा व्यापार करेल, त्याला अमेरिकन डॉलर प्रणालीतून कायमचे हद्दपार केले जाईल, असा हा जगाला दिलेला सज्जड इशारा आहे. यामुळे इराणची अर्थव्यवस्था आता पूर्णपणे कोसळण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. ऊर्जासुरक्षेचा विचार केल्यास, भारताने अमेरिकेच्या वाढत्या दबावामुळे आधीच इराणकडून थेट कच्चे तेल खरेदी करणे जवळपास पूर्णपणे थांबवले आहे. त्यामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्याच्या बाबतीत भारताला थेट फटका बसणार नसला, तरी याचे जागतिक परिणाम भारताला नक्कीच भोगावे लागतील. सध्या चीन हा इराणच्या कच्च्या तेलाचा सर्वांत मोठा आयातदार देश. जर ट्रम्प प्रशासनाने चीनच्या आयातीवर यशस्वीपणे निर्बंध लादले आणि चीनला इराणकडून मिळणारे तेल बंद झाले, तर साहजिकच चीन तेल खरेदीसाठी इतर देशांकडे (उदा. सौदी अरेब, रशिया) वळेल. यामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाची मागणी अचानक वाढेल आणि तेलाचे भाव भडकू शकतील. या वाढलेल्या किमतींचा फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला आणि पर्यायाने देशातील इंधन दरवाढीच्या रूपाने सामान्य ग्राहकांना बसेल. यासोबतच, इराणशी पेट्रोलियम पदार्थांचा छुपा व्यापार करण्याच्या संशयावरून अमेरिकेने नुकत्याच भारताशी संबंधित चार खासगी कंपन्यांवरही निर्बंध लादले आहेत. ही बाब भारतासाठी एक मोठा धोक्याचा इशारा आहे की, अमेरिका या प्रकरणात कोणत्याही देशाला सवलत देण्याच्या मनःस्थितीत नाही.

या संपूर्ण भू-राजकीय घडामोडीत भारतासाठी सर्वांत मोठी डोकेदुखी ठरणार आहे, ती म्हणजे चाबहार बंदराचे भवितव्य! इराणमधील चाबहार बंदर हे भारतासाठी निव्वळ एक व्यापारी बंदर नसून, ते अफगाणिस्तान आणि मध्य आशियात पोहोचण्याची एक अत्यंत महत्त्वाची सामरिक गुरुकिल्ली आहे. पाकिस्तानने भारताला जमिनीवरून व्यापारमार्ग नाकारल्यामुळे चाबहार हे भारतासाठी अफगाणिस्तान आणि पुढे युरोपपर्यंत (आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूकमार्ग) पोहोचण्याचे मुख्य प्रवेशद्वार बनले आहे. विशेष म्हणजे, नुकतेच भारताने इराणसोबत चाबहार बंदराच्या विकासासाठी आणि संचालनासाठी तब्बल दहा वर्षांचा दीर्घकालीन करार केला आहे.

२०१८ मध्ये अमेरिकेने चाबहार बंदराच्या विकासासाठी भारताला निर्बंधांमधून विशेष सूट दिली होती. मात्र, ट्रम्प प्रशासनाची आताची आक्रमक भूमिका पाहता, ही सवलत कायम राहील की नाही, यावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता या नव्या 'ऑपरेशन इकोनॉमिक आऊटकास्ट'मुळे चाबहार बंदराच्या विकासात गुंतलेल्या भारतीय कंपन्यांवर अमेरिकन निर्बंधांची टांगती तलवार अधिकच गडद झाली आहे. या निर्बंधांमुळे चाबहार प्रकल्पातील भारताची कोट्यवधी डॉलर्सची गुंतवणूक आणि भविष्यातील विस्तार धोक्यात आला आहे. भारताला अमेरिकेच्या दबावामुळे चाबहारमधून माघार घ्यावी लागली, तर तो भारताच्या प्रादेशिक धोरणासाठी आणि विशेषतः चीनच्या ग्वादर बंदराला शह देण्याच्या रणनीतीसाठी एक अत्यंत मोठा आणि न भरून येणारा धक्का ठरेल.

एका बाजूला अमेरिकेसारख्या जागतिक महासत्तेशी असलेले भारताचे अतीव महत्त्वाचे व्यापारी आणि सामरिक संबंध टिकवणे अत्यंत गरजेचे आहे, तर दुसर्‍या बाजूला चाबहार बंदरासारख्या आपल्या दीर्घकालीन भू-राजकीय हितांचे रक्षण करणेही तेवढेच आवश्यक आहे. या बदलत्या आणि अत्यंत ध्रुवीकृत होत चाललेल्या जागतिक परिस्थितीत भारताला आपल्या परराष्ट्र आणि आर्थिक धोरणात अत्यंत प्रगल्भ आणि लवचीक मुत्सद्देगिरीचा वापर करावा लागेल. इराणची ढासळती अर्थव्यवस्था आणि अमेरिकेचा वाढता दबाव, या दोन्ही गोष्टी भारताच्या संयमाची आणि जागतिक मंचावरील राजकीय मुत्सद्देगिरीची मोठी परीक्षा पाहणार आहेत. या कठीण परीक्षेतून भारत कसा मार्ग काढतो, यावरच आपले भविष्यातील सामरिक वजन आणि जागतिक नेतृत्व ठरणार आहे.



# नेपाळच्या महाप्रलयाचा धडा...

**हिमालयाच्या विस्तीर्ण पसरलेल्या हिमाच्छादित डोंगररांगांमध्ये वातावरण हे नेहमीच अनिश्चित असते आणि भूमी अधिक संवेदनशील. म्हणूनच हिमालयाच्या कुशीतील प्रदेशात विशाल पायाभूत सुविधा प्रकल्प उभे करणे, हे संभाव्य आपत्तीला आमंत्रण देणारे ठरते. याकडे साफ दुर्लक्ष करीत, चीनने हिमालयीन प्रदेशात महाकाय धरणे, जलविद्युत प्रकल्प उभे केले. नेपाळमधील परवाचा भीषण महाप्रलय हीच धोक्याची घंटा वाजवणारा ठरला आहे.**

आकलन

**प्रतिनिधी**

नेपाळमधील प्रलयंकारी महापुराने निसर्गापुढे मानवी जीवन किती क्षुल्लक आहे, त्याची नव्याने जाणीव करून दिली. नेपाळमधील ल्हेंडे खोला नदीमध्ये कोसळलेल्या हिमनदीच्या पाण्याने प्रचंड उत्पात घडविला असून, त्यात सुमारे ४०० जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. हिमालय ही अवाढव्य पर्वतरांग असली, तरी ती तितकीशी मजबूत पर्वतरांग नाही.

'भारतीय भूस्तर प्लेट' ही 'युरेशियन भूस्तर प्लेट'ला धडकल्याने हिमालय पर्वतरांग उत्पन्न झाली. ही प्रक्रिया अजूनही सुरू असल्याने हिमालय हा भूकंपप्रवण प्रदेश मानला जातो. हिमालय हा तुलनेने अधिक तरुण पर्वत असून, त्याच्या उंचीत दरवर्षी वाढ होत असते. म्हणूनच, 'माऊंट एव्हरेस्ट' हे शिखरही दरवर्षी काही मिमीने उंच होत आहे. परिणामी, भूगर्भातील हालचालींमुळे हिमालयात नेहमीच कडे कोसळणे किंवा नवी सरोवरे तयार होणे यांसारख्या भौगोलिक घटना घडत असतात. अशाच एका तयार झालेल्या हिमनदीच्या सरोवराचा बांध दोन दिवसांपूर्वी फुटला आणि त्यात साठलेले लक्षावधी गॅलन पाणी प्रचंड वेगाने उताराच्या दिशेने धावू लागले. ही घटना नेपाळ-तिबेटच्या सरहद्दीवरील पर्वतरांगेत घडली आणि त्याचा जबरदस्त फटका नेपाळला बसला. हे फुटलेल्या सरोवराचे पाणी नेपाळमधील नद्यांच्या प्रवाहाबरोबर खालच्या प्रदेशात प्रचंड वेगाने वाहात गेले आणि वाटेत येणाऱ्या प्रत्येक अडथळ्याला आपल्यासोबत गिळंकृत करीत गेले. अशा या भीषण परिस्थितीत भारताने २४ तासांच्या आत नेपाळला मदतीचा हात दिला. आजही नेपाळमध्ये आलेल्या या आपत्तीत भारताने तातडीची मदत उपलब्ध करून दिली आहे. कैलास-मानसरोवर यात्रेत भारताचेच सुमारे २०० यात्रेकरू तिबेटी भागात अडकले आहेत. त्यांना सुरक्षित स्थळी हलवून सुखरूप भारतात आणण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नेपाळमध्ये गतवर्षी झालेल्या हिंसक सत्तांतरानंतर आलेल्या नव्या सरकारने भारताबरोबर काहीशी अलिप्त भूमिका घेतली. पण, ताज्या आपत्तीत नेपाळला मदत करताना या राजकीय मतभेदांना भारताने आड येऊ दिलेले नाही. नवे पंतप्रधान बालेन शहा यांनाही आता भारताचे महत्त्व आणि भारताला नेपाळबद्दल वाटत असलेल्या आपलेपणाची जाणीव झाली आहे. म्हणूनच, त्यांनी भारतवगळता अन्य देशांना मदत कार्यात सहभागी करून घेण्यास नकार दिला. संकटकाळात भारतच आपली मदत करू शकतो, यावर त्यांचा विश्वास आहे, हेच त्यांच्या या निर्णयावरून दिसून येते. उलट, आता आलेल्या या पुराची कल्पना चीनने आपल्याला उशिरा दिली, असा आरोप नेपाळ सरकारनेच केला. एकप्रकारे या नैसर्गिक आपत्तीतील हानीला चीनची बेजबाबदार भूमिका कारणीभूत आहे, असे नेपाळचे मत. चीनने हिमालयात अनेक धरणे व जलविद्युत प्रकल्प हाती घेतले आहेत. त्यात ब्रह्मपुत्रा नदीवरील विशाल धरण प्रकल्पाचाही समावेश आहे. या प्रकल्पाचा विपरीत परिणाम भारतावर होण्याची शक्यता वर्तविली जाते. चीनने या प्रकल्पांचा वापर भारताविरोधात हत्यारासारखा करण्याचा प्रयत्न केला आहे. पण, त्याचा खरा धोका समस्त मानवजातीला जाणविणार. कारण, चीनने तंत्रज्ञानाच्या जोरावर जगातील सर्वांत मोठा 'थ्री गॉर्जेस' धरण प्रकल्प उभारला आहे. या विशाल धरणातील पाणीसाठ्याचा परिणाम पृथ्वीच्या गतीवरही झाल्याचे पुरावे भूगर्भ व खगोलशास्त्रज्ञांनी यापूर्वीच दिले आहेत. दुर्दैवाने भारतालाही हिमालयीन प्रदेशातील अनेक नैसर्गिक संकटांना नित्य सामोरे जावे लागते. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर, तसेच अरुणाचल प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये महामार्ग, बोगदे आणि जलविद्युत प्रकल्प उभारताना तंत्रज्ञांना अनेक अडचणी जाणवतात. गेल्या काही वर्षांत बद्रीनाथ, केदारनाथ वगैरे चारधामांना जोडणाऱ्या महामार्गांना तडे जात असल्याचे दिसून आले आहे.

नैसर्गिक अडचणींवर मात करणे आवश्यक असले, तरी निसर्गाच्या विरुद्ध जाऊन विकास प्रकल्प उभारल्यास ते कधीही सुरक्षित राहतील, असे नाही. कारण, शेवटी निसर्गाची ताकद सर्वोच्च. निसर्गाला आणि पर्यावरणाला सुरक्षित राखल्यासच मानवी जीवन चिरंतन राहू शकते. क्षणभरात होत्याचे नव्हते होणे म्हणजे काय, त्याचा अनुभव नेपाळमधील पुराने दिला. त्यावरून बोध घेणे हे माणसाच्याच हाती. पण, आपल्या बुद्धिमत्तेचा गर्व झालेला माणूस त्यातून काही धडा शिकण्याची अपेक्षा कमीच!

# भोटेकोशीचा महाप्रलय:
# निसर्गाचा कोप की मानवी चुकांचा हिशोब?

वेध

**डॉ. मयूरेश जोशी**

**माणूस आज चंद्रावर पोहोचला असला, तरी पृथ्वीवरील निसर्गाच्या रौद्ररुपासमोर तो किती खुजा आहे, याची प्रचिती नेपाळमधील महाप्रलयाच्या महाविनाशकारी दृश्यांनी अवघ्या जगाला करुन दिली. आपल्या वाटेत जे जे येईल, ते ते सगळे गिळंकृत करीत, या महापुराने नेपाळमधील गावेच्या गावे अक्षरशः नकाशावरुन कायमस्वरुपी उद्ध्वस्त करुन टाकली. अजूनही मृतांचा आकडा वाढत असून, शोधमोहीम, मदतकार्याचा ओघ सुरुच आहे. यानिमित्ताने हिमालयातील हिमनग-हिमनद्यांच्या वितळण्याचा वाढता धोका, तिबेटमधील चीनचे महाकाय प्रकल्प आणि एकूणच या महाभयाण आपत्तीमागील कारणांचा आढावा घेणारा हा लेख...**

बुधवार, दि. २६ ऑगस्टची ती सकाळ रसुवागढीच्या चिंचोळ्या दरीत नेहमीसारखीच उजाडली. पण, सकाळी अचानक एका गूढ, धडकी भरणाऱ्या आवाजाने ती संपूर्ण दरी थरथरली. तो पाण्याचा खळखळाट नव्हता, तर पर्वत आतून फुटल्याचा आणि खडक एकमेकांवर घासल्याचा एक भयानक आवाज होता. काही मिनिटांतच तिबेटच्या सीमेवरील ल्हेंदे- खोला नदीच्या पात्रातून एका काळ्या-राखाडी रंगाची महाकाय लाट खाली येताना दिसली. ती लाट पाण्याची नव्हती; तर बर्फ, बारीक झालेला ग्रॅनाईटसदृश खडक, माती आणि हजारो वर्षांचा गाळ एकत्र झालेला एक प्रवाह होता. या महाकाय लाटेने सीमा सुरक्षा चौकीवर थेट हल्ला चढवला. २०-२० टनांचे मालवाहू ट्रक प्लास्टिकच्या खेळण्यांसारखे कोलमडून वाहू लागले. नेपाळ आणि चीनला जोडणारा पक्का काँक्रीटचा 'मितीरी मैत्री पूल' एका क्षणात उद्ध्वस्त होऊन वाहत्या चिखलात गायब झाला. या भयानक संकटाची कोणतीही धोक्याची सूचना खालील गावांमध्ये नव्हती. नेपाळच्या जलविज्ञान आणि हवामान खात्याला सीमेपलीकडून तिबेटमधून कोणताही आपत्कालीन संदेश किंवा उपग्रहीय संदेश मिळाला नव्हता. रसुवा जिल्ह्यात आदल्या रात्री मुसळधार पाऊसही झाला नव्हता. त्यामुळे स्थानिक लोक बेसावध होते. त्रिशूली नदीची अवघ्या ३० मिनिटांत पातळी सुमारे ३० फूट वाढली. गावे, वीज उपकेंद्रे, शाळा आणि शेकडो स्वप्ने त्रिशूलीच्या काळवंडलेल्या पात्रात गाडली गेली.

### घटनाक्रम आणि पुराचा मार्ग

हा महाप्रलय तिबेटी स्वायत्त क्षेत्रातील लांगटांग पर्वतरांगांच्या पश्चिमेकडील मानवी वस्ती नसलेल्या अतिउंच भागात सुरू झाला. सकाळी दक्षिण आशियातील भूकंपमापन केंद्रांवर ४.४ रिश्टर स्केलच्या भूकंपासारख्या लहरी नोंदवल्या गेल्या. सुरुवातीला हा एक भूगर्भीय भूकंप असावा, असा अंदाज बांधला गेला. परंतु, नंतर उपग्रहीय चित्रे आणि प्रगत तरंगांच्या विश्लेषणावरून एका भयानक सत्याचा उलगडा झाला. हा भूकंप नव्हता, तर तो ५.२ रिश्टर स्केलच्या तीव्रतेचा एक हिम-खडक कोसळण्याचा आघात होता.

अंदाजे ५ हजार २०० मी. उंचीवर, एका उभ्या कातळाला शतकानुशतके घट्ट पकडून उभा असलेला हजारो टनचा हिमखंड आणि ग्रॅनाईटचा खडक अचानक वेगळा झाला आणि खाली कोसळला. अंदाजे १ हजार मीटर खाली, ल्हेंदे-खोलाच्या अरुंद पात्रात जेव्हा हा अब्जावधी टनांचा साठा आदळला, तेव्हा त्या आघाताच्या प्रचंड ऊर्जेने आणि निर्माण झालेल्या घर्षणाने बर्फाचे रूपांतर क्षणात पाण्याच्या महापुरात झाले. हा प्रवाह तिथेच थांबला नाही. अतिवेगाने खाली उतरत या पाण्याने दरीच्या तळाशी साचलेला दगड-धोंड्यांचा, मातीचा आणि हिमोढाचा प्रचंड साठा स्वतःमध्ये सामावून घेतला. पुढील दोन तासांत या प्रलयाने तिमुरे, अनेक जलविद्युत प्रकल्पांची धरणे आणि खाली नुवाकोट व धाडिंग जिल्ह्यातील गावे कवेत घेतली.

### जीवितहानी आणि बेपत्ता नागरिक

या भयंकर घटनेनंतर आता नेपाळ आणि चीन या दोन्ही देशांची आपत्कालीन यंत्रणा एका प्रचंड मानवी दुर्घटनेचा सामना करत आहे. नेपाळचे 'नॅशनल डिझास्टर रिस्क रिडशन अ‍ॅण्ड मॅनेजमेंट ऑथोरिटी', नेपाळी पोलीस आणि तिबेटमधील आपत्कालीन विभागाच्या संयुक्त अहवालानुसार, हा आजवरचा सर्वांत मोठा हिमप्रलय ठरला आहे. दोन्ही देशांत मिळून आतापर्यंत हजारो जणांच्या मृत्यूला अधिकृत पुष्टी मिळाली असून, त्रिशूलीच्या पात्रातून चितवनपर्यंत कित्येक मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. परंतु, खरी शोकांतिका पुढे आहे. दोन्ही बाजूंचे अनेक नागरिक अजूनही बेपत्ता आहेत.

### दुर्घटनेची वैज्ञानिक आणि पर्यावरणात्मक कारणे

'ग्रेटर हिमालय' हा भाग जागतिक सरासरीपेक्षा दुप्पट वेगाने तापत आहे, याची नोंद आपल्याला अनेक शोधनिबंधात मिळते. या वाढत्या उष्णतेमुळे पर्वतांची अंतर्गत रचना ढासळत चालली आहे. हिमालयात 'परमाफ्रॉस्ट' खडकांच्या भेगांमध्ये शतकानुशतके गोठलेला बर्फ या पर्वतांना एकत्र बांधून ठेवणाऱ्या सिमेंटसारखे काम करतो. परंतु, तापमानवाढीमुळे ज्या उंचीवर पाणी कायम गोठलेले राहते, ती उंची अधिकाधिक वर सरकत चालली आहे. यामुळे पर्वतांच्या पोटात साचलेला बर्फ वितळू लागला आहे. पाणी साचल्याने खडकांच्या भेगांमधील दाब वाढतो आणि हजारो टन वजनाचे खडक पर्वतापासून वेगळे होतात. यालाच जोड मिळाली आहे ती हिमनद्या झपाट्याने मागे सरकण्याची. गेल्या दोन दशकांत लांगटांग आणि जिरॉन्ग खोऱ्यातील हिमनद्यांचे आकारमान प्रचंड वेगाने कमी झाले आहे.

दि. २६ ऑगस्टच्या या प्रवाहाचे भौतिक स्वरूपदेखील सामान्य पुरापेक्षा भयंकर होते. हा साध्या पाण्याचा पूर नव्हता, तर सुमारे २ ग्रॅम प्रतिघनसेंटीमीटर घनता असलेला घट्ट चिखल होता. अशा प्रवाहाला इतका प्रचंड वेग आणि वजन असते की, पाण्याचा सामान्य पूर सहज सहन करू शकणारे काँक्रीटचे मोठे पूल आणि बंधारे या चिखलाच्या लाटेसमोर पत्त्यांसारखे मोडून पडतात.

### पायाभूत सुविधा आणि जलविद्युत प्रकल्पांचे नुकसान

निसर्गाने जरी या दुर्घटनेची ठिणगी टाकली असली, तरी माणसाने नदीपात्रात उभारलेल्या अमर्याद बांधकामांनी या विनाशाची तीव्रता अनेक पटींनी वाढवली. गेल्या दोन दशकांत भोटेकोशी आणि त्रिशूली नदीचे खोरे हे नेपाळचे सर्वांत मोठे ऊर्जा आणि व्यापार केंद्र बनले आहे. या अरुंद दरीमध्ये 'रन-ऑफ-द-रिव्हर' पद्धतीचे अनेक जलविद्युत प्रकल्प उभे केले आहेत. यात मोठे धरण न बांधता, नदीचे पाणी भुयारातून वळवून वीज निर्माण केली जाते. परंतु, या प्रकल्पांमध्ये पाणी अडवणारे बंधारे, गाळ उपसण्याच्या टाया आणि पॉवरहाऊस हे थेट नदीच्या सक्रिय पात्रातच बांधलेले असतात. नेपाळ वीज प्राधिकरणा'च्या अहवालानुसार, या एकाच लाटेने ७४८ मेगावॅट क्षमतेचे १४ जलविद्युत प्रकल्प उद्ध्वस्त केले आहेत. यात चिलिमे, संजेन- खोला, त्रिशूली आणि देवीघाट हे चालू प्रकल्प आणि निर्माणाधीन असलेला 'अपर त्रिशूली-१' (२१६ मेगावॅट) प्रकल्प यांचा समावेश आहे. सीमेवर असलेल्या रसुवागढी (१११ मेगावॅट) प्रकल्पाचे मुख्य प्रवेशद्वार आणि पॉवरहाऊस अनेक मीटर गाळाखाली आणि दगडांखाली पूर्णपणे गाडले गेले आहेत. त्याचप्रमाणे 'पासांग ल्हामू' महामार्गाची अवस्था बिकट झाली आहे. सध्या बेत्रावती ते रसुवागढीदरम्यानचा ४२ किमी रस्ता पूर्णपणे वाहून गेला आहे.

### तिबेटमधील चीनचे महाकाय प्रकल्प आणि माहिती देवाणघेवाणीचा प्रश्न

दुर्घटना घडल्यानंतर लागलीच सोशल मीडियावर आणि प्रादेशिक वर्तुळात अनेक उलटसुलट चर्चा सुरू झाल्या. परंतु, 'इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माऊंटेन डेव्हलपमेंट' सारख्या आंतरराष्ट्रीय संशोधन संस्थांनी आणि उपग्रहीय उपकरणांनी या अफवा फेटाळून लावल्या आहेत. ल्हेंदे-खोलाच्या तिबेटी भागात कोणतेही महाकाय पाण्याचे धरण अस्तित्वात नाही. या दुर्घटनेची सुरुवात पूर्णपणे नैसर्गिकरीत्या उच्च हिमालयातील पर्वतकडा आणि बर्फ कोसळल्यानेच झाली होती. मात्र, याचा अर्थ चिनी बांधकामांवर प्रश्न उपस्थित करता येत नाहीत, असे नाही. चीनने 'बेल्ट अ‍ॅण्ड रोड' उपक्रमांतर्गत 'जिरॉन्ग पोर्ट'च्या रक्षणासाठी ग्यिरॉन्ग झांगबो नदीच्या पात्रात विस्तीर्ण काँक्रीटच्या भिंती आणि 'चॅनेलायझेशन' केले आहे. भौतिकशास्त्रानुसार, जेव्हा तुम्ही नदीचे नैसर्गिक रुंद पात्र काँक्रीटच्या भिंती बांधून अति-अरुंद करता, तेव्हा पाण्याचा साचणारा भाग कमी होतो आणि त्याचा वेग अत्यंत प्रचंड होतो. चीनने ही काँक्रीटची भिंत चीनची महागडी कस्टम्स् केंद्रे, ड्राय पोर्ट्स (बंदरे) आणि त्यांच्या रस्त्यांचे रक्षण करण्यासाठी उभारली आहे. पण, त्यांनी इतरांचा बहुधा विचार केला नाही. हिमनदी फुटून चिखल आला, तेव्हा या काँक्रीटच्या पात्राने त्या चिखलाला थांबवण्याऐवजी त्याचा वेग वाढून अतिप्रचंड वेगाने थेट नेपाळच्या हद्दीत ढकलून दिले.

दुसरा सर्वांत महत्त्वाचा भू-राजकीय मुद्दा म्हणजे, माहितीची देवाणघेवाण न होणे. २०२५ मध्ये झालेल्या अशाच एका दुर्घटनेनंतर चीन आणि नेपाळमध्ये रिअल-टाईम माहिती देण्याचे करार झाले होते. परंतु, दि. २६ ऑगस्टच्या सकाळी तिबेटमध्ये डोंगर कोसळल्यापासून ते नेपाळमध्ये लाट येण्यापर्यंतच्या ४५ मिनिटांत नेपाळच्या जलविज्ञान विभागाला चीनकडून एकही आपत्कालीन फोन किंवा डिजिटल संदेश आला नाही.

### धोका टळला का? अनुषंगिक आपत्ती आणि प्रशासकीय दक्षता

दि. २६ ऑगस्टच्या प्रलयाची कथा बहुधा इथे संपली नसून, पुढे अधिक मोठ्या धोक्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तिबेटमधील दुर्घटनाग्रस्त भागाच्या सॅटेलाईट रडार मॅपिंगने दोन अत्यंत धोकादायक बाबी उघड केल्या आहेत.

पहिली बाब म्हणजे, उच्च हिमालयातील जो डोंगर कोसळला, त्याचा उरलेला भाग अजूनही अत्यंत कमकुवत स्थितीत आहे. मूळ खडक निघून गेल्यामुळे त्याच्या शेजारील हजारो टन वजनाचे खडक आणि हिमनद्या आता अस्थिर स्थितीत आहेत. येत्या काही दिवसांत तीव्र ऊन पडल्यास, छोटा भूकंप झाल्यास किंवा पाऊस आल्यास दुसरा हिमखडक कोसळण्याचा स्पष्ट धोका निर्माण झाला आहे. दुसरी आणि सर्वांत तातडीची भीती म्हणजे, 'नैसर्गिक चिखलाचे बंधारे'. डोंगर कोसळताना आलेल्या अब्जावधी टन ढिगाऱ्याने तिबेटमधील सोग्याल आणि पुरुपछियांगझांगबू या उपनद्यांच्या संगमावर सुमारे ५० ते ६० मी. उंच चिखल आणि दगडांची भिंत तयार केली आहे. मागे हिमनद्यांचे वितळणारे पाणी साचून एका प्रचंड तलावाची निर्मिती इथे झाली आहे. या नैसर्गिक बंधाऱ्याला कोणतेही दरवाजे नाहीत. हा फक्त दगडांचा आणि बर्फाचा बनलेला ढीग आहे. मागे साचलेल्या पाण्याच्या प्रचंड दाबामुळे हा कच्चा बंधारा कधीही फुटू शकतो.

### न शिकलेल्या धड्यांची पुनरावृत्ती...

दि. २६ ऑगस्टचा हा प्रलय म्हणजे, हिमालयाने दिलेला पहिला इशारा नाही. ऑगस्ट २०२४ मध्ये एव्हरेस्टजवळील नेपाळमधील थामे गाव अशाच एका हिमनदीचा तलाव फुटल्याने नकाशावरून पुसले गेले होते. जुलै २०२५ मध्ये तिबेटमधील प्युरेपू ग्लेशियरवरील सुपरग्लेशियल तलाव फुटल्यामुळे याच भोटेकोशी कॉरिडोरमध्ये एक विनाशकारी लाट आली होती. अशी अनेक उदाहरणे देता येतील. प्रत्येक दुर्घटनेनंतर काही दिवस चर्चा होतात, तज्ज्ञांच्या समित्या स्थापन होतात आणि निसर्गरक्षणाचे संकल्प केले जातात. परंतु, काही महिन्यांतच पुनर्रचनेच्या नावाने सर्वकाही पूर्ववत सुरू होते. रस्ते बांधणारे अधिकारी पुन्हा त्याच खचणाऱ्या नदीकाठून रस्ते उकरतात. वीज कंपन्या पुन्हा त्याच धोकादायक पात्रात अब्जावधींचे सिमेंटचे प्रकल्प उभारतात. निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करून हिमालयाकडे केवळ एक रिअल इस्टेट आणि ऊर्जानिर्मितीचे साधन म्हणून पाहिले गेले, तर अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती टळणे कठीण आहे.

### मदतकार्य आणि मोहिमेची सद्यस्थिती

अजूनही रसुवा आणि नुवाकोटच्या उद्ध्वस्त झालेल्या पात्रात बचावकार्य सुरू आहे. नेपाळ सैन्य, पोलीस आणि स्थानिक स्वयंसेवक वाळलेल्या चिखलातून मानवी अवशेष आणि मृतदेह शोधत आहेत.

अनेक कुटुंबांची घरे, दुकाने आणि शेतजमिनी काही तासांत या गाळाखाली विलुप्त झाल्या. पर्वतावर चढून जीव वाचवलेले भाविक आणि पर्यटक अजूनही धक्क्यातून सावरलेले नाहीत. हिमालयाने हजारो वर्षे दक्षिण आशियाला जीवन दिले आहे. तो नद्यांचा उगम आहे आणि संस्कृतींचा पाठीराखा आहे. परंतु, मानवाच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे आणि हवामान बदलामुळे ही पर्व तरांग संवेदनशील बनली आहे. भोटेकोशीच्या काठावर तुटलेले पूल पुन्हा बांधले जातील, रस्ते पुन्हा तयार होतील आणि वीजप्रकल्पही उभे राहतील. परंतु, ज्या कुटुंबांनी आपल्या प्रियजनांना गमावले आहे, त्यांच्या नुकसानाची भरपाई शय नाही. सीमेच्या दोन्ही बाजूंच्या देशांनी हिमालयाला केवळ व्यापारी आणि ऊर्जेचे माध्यम न मानता, एक संवेदनशील परिसंस्था म्हणून जपण्याची आणि रिअल- टाईम माहितीची देवाणघेवाण करण्याची नितांत गरज आहे.

